मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/पालघर | शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ | वर्ष- २९ | अंक - २०८ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## इंदिरा गांधी मोठ्या नेत्या, पण आमच्यासाठी व्हिलन होत्या-फडणवीस

**मुंबई:** अभिनेत्री कंगना राणावत यांचा 'इमर्जन्सी' हा चित्रपट 17 जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. सध्या 'इमर्जन्सी' चित्रपटाची देशभरात मोठी चर्चा सुरु आहे. या चित्रपटात कंगना राणावत यांनी भारताच्या दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारलेली आहे. आज इमर्जन्सी या चित्रपटाचं मुंबईत स्क्रीनिंग पार पडलं. या स्क्रीनिंगला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील उपस्थित होते. यावेळी बोलताना फडणवीस यांनी इमर्जन्सी चित्रपटाच्या सर्व टीमचं कौतुक केलं. तसेच फडणवीस यांनी यावेळी बोलताना एक मोठं विधान केलं. "इंदिरा गांधी मोठ्या नेत्या होत्या. पण तेव्हा आमच्यासाठी व्हिलन होत्या", असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. सविस्तर वृत्त पान 3



## अमेरिकेने 3 भारतीय आण्विक संस्थांवरील बंदी उठवली

पान ४




# नवाबावर जीवघेणा हल्ला

### सेलिब्रिटींमध्ये दहशतीचे वातावरण | सहा महिन्यांमधील तिसरी घटना | चाकूचा 6 वेळा वार अन् 1 कोटीची मागणी

**प्रतिनिधी**
**मुंबई**

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर आज पहाटे एका अज्ञात व्यक्तीने जीवघेणा हल्ला केला. मुंबईतील वांद्रे पश्चिम येथील निवासस्थानावर चोरी करण्याच्या उद्देशाने घरात शिरलेल्या एका व्यक्तीने हा हल्ला केल्याची माहिती समोर येत आहे. या हल्ल्यात सैफ अली खानला गंभीर दुखापत झाली आहे.

सैफ अली खानवर चाकूने तब्बल सहावेळा वार करण्यात आले. या हल्ल्यात त्याच्या मानेला, डाव्या मनगटाला, छातीला दुखापत



झाली आणि चाकूचा एक छोटासा भाग त्याच्या पाठीतून काढण्यात आला. तातडीनं सैफ अली खानवर ऑपरेशन करावं लागलं. ऑपरेशन यशस्वी झालं असून त्याती प्रकृती आता स्थिर असल्याचं म्हटलं जात आहे.

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानच्या घरी मध्यरात्री झालेल्या या हल्ल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्यानंतर सध्या पोलीस या प्रकरणी आरोपीचा शोध घेत आहे. सैफ अली खानवर हल्ला करणारी व्यक्ती कोण होती? त्याची सुरक्षा व्यवस्था इतकी कमजोर होती का? यात घरात काम करणाऱ्या व्यक्तींपैकी कोणी सहभागी होतं का? या हल्ल्यामागचा हेतू काय होता? पोलिसांच्या आरोपीला अटक कधी करणार? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. प्राथमिकदृष्ट्या असे निष्पन्न झाले की या आरोपीने चोरीच्या पान 8 वर

> **मुंबईमध्ये कायदा आणि सुव्यवस्था किती ढासळत आहे, याचे हे लक्षण आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींकडे मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, कारण त्यांच्याकडेच गृहखाते आहे.**
> **- शरद पवार,** ज्येष्ठ नेते

> **आता विरोधक सैफ अली खानवरील हल्ल्यामुळे सरकारवर हल्ला करत आहेत. ते याचा राजकीय मुद्दा बनवू इच्छितात. पण फक्त सैफचे आडनाव 'खान' असल्याने हे केलं जात आहे.**
> **- योगेश कदम,** गृहराज्यमंत्री महाराष्ट्र

## विजापूरच्या घटनेचा 10 दिवसांत घेतला बदला

# 12 नक्षलवाद्यांचा खात्मा

**वृत्तसंस्था**
**विजापूर**



काही दिवसांपूर्वी छत्तीसगडच्या विजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी पेरलेल्या IED स्फोटात आठ जवानांना वीरमरण आले होते. आता अवघ्या दहा दिवसांत सुरक्षा दलांनी या घटनेचा बदला घेतला आहे. आज सकाळपासून विजापूरच्या जंगलात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. या चकमकीत सुरक्षा दलांनी आतापर्यंत 12 नक्षलवाद्यांना ठार केल्याची माहिती समोर आली आहे.

विजापूर आणि तेलंगणाच्या सीमेवर असलेल्या तीन जिल्ह्यांमध्ये सुरक्षा दलांकडून ही मोठी कारवाई सुरू आहे. सकाळपासून नक्षलवादी आणि सुरक्षा दलांमध्ये झालेल्या गोळीबारात 12 नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले असून, हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. पोलिसांनी चकमकीच्या ठिकाणाहून एसएलआरसह अनेक हायटेक शस्त्रेही जप्त केली आहेत.

DRG विजापूर, DRG सुकमा, DRG दंतेवाडा, कोब्रा 204, 205, 206, 208, 210 आणि CARIPU 229 बटालियनचा या ऑपरेशनमध्ये सहभाग आहे. या सर्व बटालियनचे सैनिक नक्षलवाद्यांविरोधात मोठ्या कारवाया करत आहेत. अजूनही विजापूरमधील मरुधबाका आणि पुजारी कांकेर भागात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे.

## महत्त्वाचे

### बदमाश कंत्राटदारांमुळे गोवा हायवे रखडला



**मुंबई :** कोकणात जायचं म्हटलं तर मुंबई-गोवा महामार्गाने प्रवास करण्याऐवजी कोल्हापूरमार्गे जाण्याला पसंती दिली जाते. मुंबई-गोवा महामार्गावर ठिकठिकाणी असणाऱ्या खड्ड्यांमुळे कोकणवासीय नेहमी तक्रार करत असतात. गेल्या अनेक वर्षांपासून कोकणवासीय मुंबई-गोवा महामार्ग वाहतुकीसाठी योग्य कधी होणार याची वाट पाहत आहेत. त्यातच आता भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी यावर नेमकं भाष्य केलं आहे. नुकतंच भाजपने रविंद्र चव्हाण यांची महाराष्ट्र कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. एका खासगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अनेक मुद्द्यांसह मुंबई-गोवा महामार्गावरही भाष्य केलं. "मुंबई गोवा महामार्गाचं 80 टक्के काम पूर्ण झालं आहे. जे काम शिल्लक आहे त्यामध्ये रत्नागिरीमधील काही भाग आहे. काही बदमाश कंत्राटदारांमुळे गडबड झाली, ज्यामुळे रस्ता रखडला होता. पण 80 टक्क्यांपेक्षा जास्त काम पूर्ण झालं आहे," असं चव्हाण यांनी सांगितलं आहे.

### हैद्राबादच्या भाविकांचा अपघात, 4 ठार

**संभाजीनगर :** घृष्णेश्वराचं दर्शन करुन शिर्डीला परतणाऱ्या हैदराबादच्या भाविकांवर काळानं घाला घातला. या भाविकांची जीप उसाच्या ट्रॉलीवर धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात तब्बल 4 भाविकांचा मृत्यू झाला असून 11 भाविक जखमी झाले आहेत. ही घटना गंगापूर वैजापूर महामार्गावरील तांबोळगोटा फाटा इथं बुधवारी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास घडली. प्रेमलता श्यामशेट्टी (56), प्रसन्न लक्ष्मी ( 48), वैद्विक श्यामशेट्टी (6 महिने), अक्षिता श्यामशेट्टी (20) अशी अपघातात ठार झालेल्या भाविकांची नावं आहेत. हैदराबाद इथले 14 भाविक शिर्डी इथं दर्शनासाठी आले होते. यावेळी शिर्डीत साईबाबांचं दर्शन घेऊन ते बुधवारी सकाळी जीप क्रमांक एसएच 17, बीडी 1897 नं वेरुळ लेणी पाहून घृष्णेश्वराचं दर्शनाला गेले होते.

### दिल्लीत खलिस्तानी दहशतवादी घुसले ?

**नवी दिल्ली:** दिल्ली विधानसभेच्या निवडणुका 5 फेब्रुवारी रोजी होत आहेत. त्याचवेळी, संपूर्ण देश 26 जानेवारी रोजी 76 वा प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहे. यापूर्वीही गुप्तचर यंत्रणेला दिल्लीत खलिस्तानी घुसल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर दिल्ली पोलीस आणि सर्व केंद्रीय यंत्रणांना सतर्क करण्यात आले आहे. दिल्ली पोलिसांनी सांगितले की, दिल्लीत 5 फेब्रुवारीला विधानसभा निवडणुका आहेत. आणि त्याआधी 26 जानेवारीला प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम आहे. याआधी 3 खलिस्तानी दहशतवादी सक्रिय झाले आहेत. पोलिसांनी या दहशतवाद्यांचा शोध सुरू केला आहे. पोलिसांनी या तिन्ही दहशतवाद्यांचे पोस्टर दिल्लीत लावले आहेत.

## रस्त्याचं खराब बांधकाम करणं हा अजामिनपात्र गुन्हा ठरवा!

### नितीन गडकरींनी मांडलं स्पष्ट मत

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**



केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे आपल्या खात्यातील विषयांसह विविध विषयांवर आपलं रोखठोक मत व्यक्त करत असतात. देशामध्ये एक्स्प्रेसवे आणि महामार्गांचं जाळं विणतानाच रस्ता सुरक्षेवरही नितीन गडकरींकडून भर दिला जात आहे. दरम्यान, रस्ता सुरक्षेला अधिक मजबूत करण्यासाठी नितीन गडकरी यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण विधान केलं आहे. रस्त्यांचं खराब बांधकाम करणं हा अजामिनपात्र गुन्हा ठरवला पाहिजे, असं विधान मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे.

सीआयआयकडून आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमामध्ये नितीन गडकरी म्हणाले की, रस्ते अपघातामध्ये भारत जगामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. सदोष रस्ते बांधकाम हा अजामिनपात्र गुन्हा ठरवला गेला पाहिजे. तसेच रस्ते अपघातांसाठी ठेकेदार आणि इंजिनियरांना जबादार धरलं गेलं पाहिजे, तसेच त्यांची तुरुंगात रवानगी केली पाहिजे, असे गडकरींनी सांगितले.

2030 पर्यंत रस्ते अपघातामध्ये होणाऱ्या मृत्यूंचा आकडा कमी करून अर्ध्यापर्यंत खाली आणण्याचं रस्ते पान 8 वर

## महाराष्ट्र देशाची स्टार्टअप राजधानी

# 1 लाख 57 हजार स्टार्टअप

### राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार

**प्रतिनिधी**
**मुंबई**

सिडबी (SIDBI) स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्ट अपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक प्रादेशिक विभागाला तीस कोटी रुपयांची तरतूद करणार आहे. काळाची गरज ओळखून स्टार्ट अप धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राष्ट्रीय स्टार्ट दिवस कार्यक्रमात घोषणा**

उपलब्ध करून देण्यात आला आहे हे देशातील आधुनिक धोरण ठरणार तसेच राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग पान 8 वर

## केंद्राची 8 व्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी

### 2026 पासून लागू होतील शिफारशी

### केंद्रीय कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला केंद्र सरकारने गुरुवारी मंजुरी दिली. या आयोगाच्या शिफारशी 2026 पासून लागू केल्या जातील. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री आश्वनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, 2016 मध्ये सातवा वेतन आयोग लागू झाला, त्याच्या शिफारशी 2026 पर्यंत सुरू राहतील.

केंद्र सरकारने श्री हरिकोटा येथे तिसऱ्या लॉन्च पॅडलाही मान्यता दिली आहे. सध्या सुविधेत 2 लॉन्च पॅड आहेत. या दोन लॉन्च पॅडवरून आतापर्यंत 60 हून अधिक प्रक्षेपण करण्यात आले आहेत. तिसरे प्रक्षेपण पॅड तयार करून, उपग्रह आणि अंतराळ यान प्रक्षेपणांची संख्या वाढवता येईल. याद्वारे भारत आपल्या आवश्यक प्रक्षेपण मोहिमा



पूर्ण करू शकेल आणि जागतिक मागणी देखील पूर्ण करू शकेल. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे न्यू जनरेशन लॉन्च व्हेईकल कार्यक्रम पुढे नेण्यात मदत होईल. हे लॉन्च पॅड 3985 कोटी रुपये खर्चून बांधले जाणार आहे.


केंद्र सरकार दर 10 वर्षांनी नवीन वेतन आयोग आणते. सध्या 7 वा वेतन आयोग सुरू आहे, त्याचा कार्यकाळ 31 डिसेंबर 2025 रोजी संपणार आहे. 2026 पासून 8 वा वेतन आयोग लागू होईल अशी अपेक्षा आहे.

8 व्या वेतन आयोगाचे वेतन मॅट्रिक्स 1.92 च्या फिटमेंट फॅक्टर वापरून तयार केले जाईल.केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगाराचे 18 स्तर आहेत. लेव्हल-1 कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन 18,000 रुपये आहे आणि 1800 रुपये ग्रेड पे आहे. 8 व्या वेतन आयोगाअंतर्गत ते 34,560 रुपये केले जाऊ शकते. त्याचप्रमाणे, केंद्र सरकारमध्ये, कॅबिनेट सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांना लेव्हल-18 अंतर्गत कमाल मूळ वेतन 2.5 लाख रुपये मिळते. पान 8 वर

### चाकण-शिक्रापूर रोडवर भीषण अपघात

## कंटेनरनं धडाधड 25 वाहनांना उडवलं, रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा





**प्रतिनिधी**
**चाकण**

पुणे जिल्ह्यातील चाकणमध्ये आज भीषण अपघाताची घटना घडली. एका भरधाव कंटेनरने 25 वाहनांना धडक दिली. अपघाताची घटना चाकण-शिक्रापूर रोडवर घडली. कंटेनरने दोन महिला 5 वर्षाच्या मुलीला उडवलं.

चाकण येथे वाहनांना धडक दिल्यानंतर कंटेनर चालक वाहन घेऊन जाऊन पळून जात होता. त्यावेळी कंटेनरने अजून काही वाहनांना उडवलं. शेल पिंपळगावमध्ये सेलेरो आणि अजून एका गाडीला उडवलं. त्यानंतर बहुळ गावामध्ये पोलिसांच्या एर्टिगा कारला सुद्धा कंटनेरने धडक दिली. चौफुलामध्ये कंटनेरने टाटा एस गाडीला धडक दिली. यात धडकेमुळे एक महिला कारमधून खाली पडून कार खाली आली. चाकण ते चौफुला मधील अंतर 20 किमी अंतर आहे. जवळपास 20 किलोमीटरपर्यंत हा कंटेनर समोर येईल त्या गाड्यांना धडक देत होता. दरम्यान, पोलिसांनी सुद्धा त्याचा पाठलाग केला मात्र त्याने पोलिसांच्या वाहनाला सुद्धा धडक दिली. अखेर संतप्त नागरिकांनी त्या कंटेनरचा दुचाकीवरून पाठलाग केला. या अपघाताचा थरार कॅमेऱ्यात कैद झाला आहे. वाहनांना धडक देऊन पसार होणाऱ्या या कंटेनरला काही दुचाकीस्वारांनी पाठलाग करत पकडलं.चाकणमधील वाजेवडी येथे जवळपास 20 ते 30 दुचाकीस्वारांनी कंटेनरवर दगडफेक करत कंटेनरला थांबवलं. कंटेनर थांबवल्यानंतर संतप्त नागरिकांना कंटेनर चालकाला चोप दिला. हा कंटेनर (HR 55 AV 2283) शिक्रापूर दिशेने जात होता. चालकाचं नाव अकिब खान असून त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

नो. क्र. ई-०००७७३३ (जी.बी.आर.) TM
जीवनविद्या मिशन
तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार

"प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची, विश्वशांतीची"

|| सस्नेह निमंत्रण ||
प्रवेश विनामुल्य लाभ अमुल्य

थोर समाजसुधारक तत्वज्ञ सद्गुरू श्री वामनराव पै
जन्मशताब्दी वर्ष








थोर समाज सुधारक, तत्त्वज्ञ
सद्गुरू श्री वामनराव पै

|| विश्वप्रार्थना ||
"हे ईश्वरा,
सर्वांना चांगली बुध्दी दे, आरोग्य दे,
सर्वांना सुखात, आनंदात, ऐश्वर्यात ठेव,
सर्वांचं भलं कर, कल्याण कर, रक्षण कर,
आणि तुझे गोड नाम मुखात
अखंड राहू दे"
सद्गुरू श्री वामनराव पै



श्री प्रल्हाद वामनराव पै
B. Tech IIT Mumbai (Powai), MAM, TQM (Japan)

जीवनविद्या मिशन आयोजित
|| ५६ वा ज्ञानेश्वर माऊली पुण्यस्मरण सोहळा ||
शनिवार दिनांक १८ व रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५
कार्यक्रमाची वेळ : सायं. ५.०० ते ९.००
प्रबोधनाची वेळ : सायं. ८.०० ते ९.००
प्रबोधक : ज्ञानगुरु श्री प्रल्हाद वामनराव पै
B. Tech IIT Bombay (Powai), MAM, TQM (Japan)
विषय : सर्व सुखी सर्व भूती...
स्थळ: रेमंड ग्राऊंड, पोखरण रोड १,जे.के.ग्राम,
कॅडबरी कंपनीच्या समोर, ठाणे (प.)४००६०६
जीवनविद्या मिशन ठाणे मुलूंड ज्ञानसाधना केंद्र – कार्यकारिणी समिती
अध्यक्ष – श्री सुरेश परब ९८६९२०२६०८, सचिव – श्री दिलीप इंपाळ ९७०२९१९३७५, खजिनदार – श्री अक्षय दळवी ९५९४३२५६९१

जीवनविद्या मिशनकृत सामाजिक उपक्रम
- संस्कार शिक्षण अभियान
- अवयव दान अभियान
- वृक्षारोपण व संवर्धन अभियान
- व्यसनमुक्ती अभियान
- कृषी समृद्धी अभियान
- ग्राम समृद्धी अभियान
- अंधश्रद्धा निर्मूलन अभियान
- स्वच्छता अभियान
- विद्यार्थी मार्गदर्शन अभियान

www.jeevanvidya.org

*मुंबई: टी.एम.जी. क्रीयेशन्स आणि इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई येथे संपन्न झालेल्या अनूभुती महागौरव संमेलनात योगिनी शामकांत दुराफे यांना राज्यस्तरीय अनुभूती जनसेवा सन्मान पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी, प्रमुख पाहुणे. कर्नल रवींद्र त्रिपाठी . सचिव, फोरम फॉर इंटिग्रेटेड नॅशनल सिक्युरिटी हे होते.*



## थोडक्यात

### सीताराम मेस्त्री यांचा ठाकरे सेनेला जय महाराष्ट्र

**मुंबई:** स्थानिक अंतर्गत राजकारणाला कंटाळून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) वार्ड क्रमांक 41 चे शाखा समन्वयक सीताराम मेस्त्री यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह पक्षाला अखेरचा जय महाराष्ट्र केला. विधानसभा निवडणूकीनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला घरघर लागली असून पक्षातील आउटगोइंग सुरु असताना दिंडोशी मतदार संघातील वार्ड क्र 41 मधील पक्षातील शाखा समन्वयक सीताराम मेस्त्री यांनी पक्षाला सोड चिट्ठी देत आपल्या शेकडो कार्यकर्त्यासह अखेरचा जय महाराष्ट्र केला. त्याचबरोबर दक्षिण रायगड महाड विधानसभा समन्वयक व माणगाव तालुका संघटक पदाचादेखील राजिनामा काही दिवसांपूर्वी दिला होता. यावेळी त्यांनी पत्रकाराशी बोलताना सांगितले की, राज्यात शिवसेनेची उभी फूट पडल्याने अनेक लोक शिवसेना शिंदे गटाकडे गेले असता मी उद्धव साहेबांबरोबर राहण्याचा निर्णय घेतला. परंतु स्थानिक राजकारणात वेळोवेळी अपमान व गळचेपी होत होती. याबाबत स्थानिक वरिष्ठ नेत्यांना अवगत करूनदेखील याकडे दुर्लक्ष केले गेले. यामुळे अतिशय जड अंतःकरणाने बाहेर पडल्याचे सीताराम मेस्त्री यांनी सांगितले

### अटल सेवा केंद्रातर्फे कोलडोंगरी अंधेरी येथे रोजगार मेळावा

**मुंबई:** अटल सेवा केंद्र , मुंबई च्या वतीने यंदाच्या वर्षी हा रोजगार मेळावा रविवार दि 19 जानेवारी रोजी सकाळी 9 ते दु 2 वा पर्यंत नित्यानंद मनपा शाळा, गरवारे कपनी समोर, सहार रोड, कोलडोगरी, अंधेरी पूर्व येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती अटल सेवा केंद्र, मुंबईचे संचालक व प्रभाग क्र.84 चे माजी नगरसेवक अभिजित सामंत यांनी दिली. हा मेळावा equitas bank , रोटरी क्लब निओ ह्यांच्या सहकार्याने तसेच कौशल्य विकास मंत्रालय, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या सहभागाने होणार आहे. ह्यात CII (Confederation of Indian Industry), Axis Bank, ICICI Bank, AU bank, LIC, RK Controls ,TATA STRIVE, नवभारत फर्टीलायझर, फॉरट्यूना इनजियर्स, टेकनिक valves ई 30 हून अधिक विविध क्षेत्रातील कंपन्या , बँक ,insurnce co सहभागी होत आहेत . तरी ह्या मेळाव्याचा मुंबईतील रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या अनुनभवी तरुणांना वा पर्यायी नवीन नोकरी शोधणाऱ्या अनुभवीनी लाभ घ्यावा .तसेच या मेळाव्यात मोदी सरकारने एलआयसी द्वारा महिलांसाठी 3 वर्षे दरमहीना भत्ता देणाऱ्या योजनेची माहिती देण्यात येईल व महिलांची नोंदणी करण्यात येईल. असेही सामंत यांनी सांगितले.

**महत्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसई-विरारच्या ताफ्यात 100 इलेक्ट्रिक बस लवकरच सेवेत

**▸ नवघर, नालासोपारा बस आगाराचे काम वेगाने सुरू ▸ लांब पल्ल्याच्या आगारासाठी शिरसाड ठरणार महत्त्वाचे केंद्र**

**प्रतिनिधी**
**■ वसई**

वसई-विरार महानगरपालिकेच्या परिवहन विभागात मोठा बदल घडत असून, लवकरच १०० नव्या इलेक्ट्रिक बसेस सेवेत दाखल होणार आहेत. सध्या ४० इलेक्ट्रिक बसेस शहरातील नागरिकांसाठी उपलब्ध आहेत. नव्या बसेसच्या आगमनासाठी नवघर आणि नालासोपारा येथे बस आगारांच्या विकासकामांना गती देण्यात आली आहे.



पालिकेने याआधी वसई पूर्व सातीवली येथे शहरातील पहिला प्रशस्त बस आगार उभारला आहे. जिथे ४० इलेक्ट्रिक बसेस आणि ९० डिझेलवर चालणाऱ्या ठेकेदाराच्या बसेस व्यवस्थापित केल्या जात आहेत. परंतु वाढत्या लोकसंख्येला परवडणाऱ्या सार्वजनिक प्रवासाच्या सोयीसाठी १४० इलेक्ट्रिक बसेस ताफ्यात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच १०० बसेस नवघर व नालासोपारा येथील नव्या आगारांमध्ये समाविष्ट होतील. या बसेस शहरातील प्रवासाला नवे रूप देण्यास उपयुक्त ठरतील. स्वच्छ ऊर्जा आणि कमी खर्चामुळे नागरिकांना आर्थिक व पर्यावरणीय दोन्ही प्रकारचा लाभ होईल.

### शिरसाड येथे लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी नव्या युगाची सुरुवात

शहराच्या लांब पल्ल्याच्या प्रवासाला चालना देण्यासाठी पालिकेने शिरसाड येथे नवीन बस आगार उभारण्याची योजना आखली आहे. महामार्गालगत असलेल्या या आगारासाठी जागेचा शोध अंतिम टप्प्यात आहे. एकदा जागा निश्चित झाली की, लांब पल्ल्याच्या बसेससाठी हा आगार एक केंद्रबिंदू ठरेल. त्यामुळे प्रवाशांना आरामदायी आणि विश्वासाई प्रवासाचा नवा पर्याय मिळेल.पालिकेच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे वसई-विरारच्या सार्वजनिक वाहतुकीला आधुनिक स्वरूप मिळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# नायगावात रस्त्यांसाठी पुन्हा एकदा धरणे आंदोलन

**रविवारी साई दुर्गा मित्र मंडळ उतरणार रस्त्यावर**

**प्रतिनिधी**
**■ वसईवसई**

नायगाव शहर पुन्हा एकदा धरणे आंदोलनाच्या केंद्रस्थानी आले आहे. नागरिकांच्या मुलभूत समस्या, विशेषतः रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे साई दुर्गा मित्र मंडळाच्या नेतृत्वाखाली येत्या रविवारी (१९ जानेवारी) मोठ्या आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक, टीवरी फाटक रोड येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हे आंदोलन होणार आहे.

साई दुर्गा मित्र मंडळाचे अध्यक्ष चेतन घरत यांच्या पुढाकाराने आयोजित या आंदोलनाचा उद्देश प्रलंबित विकासकामांकडे प्रशासनाचे लक्ष वेधणे हा आहे. नायगाव पूर्वेतील बापाणे फाटा ते उमेळा फाटा रस्ता (३०६ कोटींचे प्रकल्प), टीवरी फाटा ते भोयदापाडा रस्ता (१५९ कोटींचे प्रकल्प) या रस्त्यांचे काँक्रीटीकरण व दुतर्फा गटार बांधणीची कामे रखडली आहेत. या कामांच्या प्रगतीसाठी आंदोलनकर्ते पालिकेला जागे करण्याचा निर्धार धरून आहेत.

### नायगावकरांचा वाढता असंतोष

गेल्या काही वर्षांत नायगावच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असली तरी आवश्यक सेवा-सुविधांचा अभाव जाणवतो. पायाभूत सुविधांमध्ये होणारा विलंब आणि प्रशासनाचा उदासीनपणा यामुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे. या संतापाला वाट मोकळी करून देण्यासाठी अनेक राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी आंदोलनाचे हत्यार उचलले आहे.

### रस्त्यांसाठी एकत्र येणारा नायगाव

राजकीय पक्षांच्या मागे-सोबत आता सामान्य नागरिकांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. दोन दिवसांपूर्वी उबाठा गटाच्या कार्यकर्त्यांनी सोपारा पुलाच्या रखडलेल्या कामावर आंदोलन करत सह्यांची मोहीम राबवली होती. याच आंदोलनाच्या पुढील टप्प्यात आता बहुजन विकास आघाडीच्या नेतृत्वाखाली साई दुर्गा मित्र मंडळाने उडी घेतली आहे.

### पालिकेवर दबाव टाकण्याचा निर्धार

रस्ते, पाणी, वीज या मुलभूत सुविधांच्या उपलब्धतेसाठी नायगावकरांचा प्रशासनावर दबाव वाढत आहे. यावेळी, आंदोलनाच्या माध्यमातून या मागण्यांकडे पालिकेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न होणार आहे. या आंदोलनामुळे नायगावच्या विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# आबिटघर हायस्कूल मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत



**■ जव्हार**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षे संबंधी प्रश्न भेडसावत असताना, आबिटघर ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन ग्रामसभा कोष समितीचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य .भरत गोविंद जाधव यांनी पुढाकार घेऊन सरपंच साक्षी संतोष साठे यांच्या शुभहस्ते आज रोजी "सीसीटीव्ही युनिटचे" थाटामाटाने उद्घाटन करून आम्ही विद्यार्थ्याप्रती कमालीचे संवेदनशिल असल्याचा प्रत्यय ग्रामपंचायत आबिटघरच्या कार्यकारिणीने दाखवून दिले.

आबिटघर ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.साक्षी संतोष साठे या नेहमीच नावीन्यपूर्ण गोष्टी करून सामाजिक,सांस्कृतिक,राजकीय तसेच शैक्षणिक उपक्रमाना प्राधान्य देत अंमलबजावणी करत असतात.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक .दिलीप पाटील सर यांनी ग्रामपंचायतीला धन्यवाद देऊन सुशिक्षित आणि कार्यतत्पर सरपंच व कार्यकारणी निवडून दिल्याबद्दल ग्रामस्थांना धन्यवाद देऊन विद्यार्थ्यांनी यातून बोध घ्यावा असे आवाहन केले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष - एकनाथ वेखंडे, सचिव - विठ्ठल जाधव सदस्य विलास पाटील,.लोडू पाटील,. प्रफुल्ल पाटील,उपसरपंच सुप्रिया पाटील,सदस्य सुरेश बोचल, धनश्री पाटील, कल्याणी साठे,.भावना रायात तसेच ग्रामपंचायत अधिकारी संजय पाटील शेकडो विध्यार्थी व शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.

# तुटक्या कचरा कुंड्यांमुळे नागरी आरोग्य धोक्यात

**वसई -विरारकर संतप्त**

**प्रतिनिधी**
**■ वसई**

वसई-विरार शहरात सध्या कचरा कुंड्यांचा अभाव असल्याने कचऱ्याच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. शहरातील अनेक सोसायट्या आणि गृहसंकुलांमध्ये असलेल्या कचरा कुंड्या तुटक्या-फुटक्या असून त्यातून कचरा बाहेर पडत आहे. यामुळे दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. भटक्या प्राण्यांमुळे हा कचरा जागोजागी पसरतो आहे, ज्यामुळे परिसर अधिक अस्वच्छ होत आहे.

बहुजन विकास आघाडीचे ॲड. दिनेश म्हात्रे यांनी वेळोवेळी वसई-विरार महापालिकेकडे कचरा कुंड्यांच्या व्यवस्थेसाठी पाठपुरावा केला आहे. मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. महापालिकेकडे सध्या कचरा कुंड्यांचा तुटवडा असल्याचे सांगण्यात आले आहे. परिणामी, नागरिक रस्त्यांच्या कडेला कचरा टाकण्यास भाग पडत आहेत.

पालिकेच्या दुर्लक्षामुळे शहरातील स्वच्छता सर्वेक्षणाचे मानांकन घसरले आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करून प्रशासनाने शहर स्वच्छतेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिक करत आहेत. तुटक्या कुंड्यांमुळे बाहेर पडणारे घाण पाणी आणि दुर्गंधीमुळे नागरी आरोग्य धोक्यात आले आहे.

भटक्या कुत्र्यांमुळे कचरा एका जागेवरून दुसऱ्या ठिकाणी पसरतो. यामुळे रस्त्यांवर कचऱ्याचे साम्राज्य तयार झाले आहे. वाढत्या दुर्गंधीमुळे आसपास राहणाऱ्या लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

### *नव्या कचरा कुंड्यांची मागणी*

*नागरिकांनी महापालिकेकडे त्वरित नव्या कचरा कुंड्यांची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. तुटलेल्या कुंड्यांची जागा नव्या, मजबूत कुंड्यांनी घेणे आवश्यक आहे. यामुळे कचरा व्यवस्थित साठवला जाईल आणि शहरातील अस्वच्छतेचे प्रमाण कमी होईल, असे नागरिकांचे म्हणणे आहे.पालिका प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष द्यावे आणि नव्या कचरा कुंड्यांची व्यवस्था करून शहर स्वच्छतेकडे लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.*

### श्रीकृष्ण नगर गणेशोत्सवाचा अमृतमहोत्सव उद्घाटन सोहळा

**मुंबई:** बोरिवली (पूर्व) येथील श्रीकृष्णनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे यंदाचे अमृतमहोत्सवी वर्ष असून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत या अमृतमहोत्सवी वर्षाचा उद्घाटन सोहळा आणि आनंद मेळाचे आयोजन शनिवार १८ जानेवारी रोजी चोगले हायस्कूल पटांगणात करण्यात येणार आहे. एका आकर्षक मानचिन्हाचे उद्घाटन तसेच खाद्यजत्रेच ही आयोजन करण्यात आले असून गणेश भक्तांनी वर्षभर चालणाऱ्या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन अध्यक्ष संजीव बावडेकर व कार्यवाह प्राजक्त सैतावडेकर यांनी केले आहे

# झोपडपट्टीमधील दुकानदारांकडून मालमत्ता कर वसूल करण्यास रवी राजा यांचा विरोध

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

झोपड्यांमधील व्यावसायिक गाळेधारकांचं सर्वेक्षण करून या गाळेधारकांकडून मालमत्ता कर वसूल करण्याच्या महापालिकेच्या प्रस्तावाला पालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते व भाजपचे मुंबई उपाध्यक्ष रवी राजा यांनी विरोध केला आहे.

मुंबई महापालिका प्रशासनाने उत्पन्नवाढीसाठी आता झोपड्यांमधील व्यावसायिक गाळेधारकांचं सर्वेक्षण करून या गाळेधारकांकडून मालमत्ता कर गोळा करणार आहे. महापालिकेच्या अंदाजानुसार जवळपास २०० कोटी रुपये यातून जमा होणार आहे. मुळात मुंबई अनेक मोठे बिल्डर, मोठे व्यावसायिक आणि व्यावसायिक आस्थापनांकडे शेकडो कोटींचा मालमत्ता कर थकला आहे. त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची महापालिकेची कधीही इच्छा नाही. त्यांना कधी दंड केला जात नाही. पण झोपड्यांमध्ये चरितार्थासाठी गाळे उभारून स्वतःच्या कुटुंबांच पोट भरणाऱ्या व्यावसायिकांकडून मात्र महापालिकेला मालमत्ता कर गोळा करायचा आहे... हा कुठला न्याय ? असा सवाल रवी राजा यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पत्र लिहून केला आहे.

मुळात झोपड्यांमध्ये व्यवसायिक गाळे उभारणाऱ्यांचं पोट हातावर असतं हे सारे जण जाणतात. त्यात कोरोनाचा सर्वाधिक फटका या वर्गाला बसला, आत्ता कुठे ते या संकटामुळे झालेल्या नुकसानीतून बाहेर येत आहेत आणि असं असताना त्यांना प्रॉपर्टी टॅक्सच्या जाळ्यात आणणं हे अतिशय चुकीचं आहे. असे नमूद करून रवी राजा यांनी, महापालिका प्रशासनाला जर खरंच उत्पन्न वाढवायचं असेल तर जवळपास ५००० कोटी रुपये हे मोठे बिल्डर आणि मोठ्या व्यावसायिक आस्थापनांकडे थकले आहेत, त्याची वसुली करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. अशी सूचना केली व मालमत्ता कर थकवणाऱ्या या बड्या थकबाकीदारांची संपत्ती देखील जप्त करावी. पण फक्त २०० कोटी रुपयांसाठी गरीब मुंबईकराला त्रास देऊ नये. त्यामुळे वरील प्रस्ताव महापालिकेने रद्द करावा अशी माझी आपणास विनंती रवी राजा यांनी आयुक्तांना केली आहे.

# भव्य लोकजागर व सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी**
**■ मोखाडा**

वाकडपाडा ता.मोखाडा येथे आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती च्या वतीने आयोजित केलेल्या लोकजागर व समाजातील गुणवंतांचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी जिल्हा परिषद शाळा वाकडपाडा येथे नवीन बांधण्यात आलेल्या स्टेज ला माजी आदिवासी विकास मंत्री व आदिवासी समाजाचे नेते निसर्गवासी वंदनीय मधुकरराव पिचड साहेब सांस्कृतिक कला मंच नामकरण करण्यात आले.या कार्यकर्माचे अध्यक्ष स्थानी प्रदीप वाघ होते.तर प्रमुख वक्ते म्हणून भरत गारे गुरूजी,.प्रियंका मेंरदे यांनी आदिवासी समाज संस्कृती व आद्य क्रांतिकारकांच्या जीवनावर मार्गदर्शन केले. तसेच लोकजागर कार्यक्रमात आदिवासी समाजाचे



लोकप्रिय गायक संदीप गवारी व मनोज गांगुर्डे यांनी आदिवासी गीतांच्या माध्यमातून समाज जागृती केली.

या कार्यक्रमात आदिवासी समाजाती आदर्श व गुणवंतांचा समाज भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रल्हाद काका कदम, डॉ मिठाराम कडव, पंचायत समितीच्या सदस्या आशा झुगरे, एकनाथ दरोडा, प्रभाकर पाटील, परीसरातील सरपंच, उपसरपंच, पत्रकार व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश दाते, संजय वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन विठ्ठल गोडे व सुत्रसंचलन अभिनया वाघ हिने केले.

# कऱ्हाडे ब्राम्हण संघाचा शतकोत्सव शुभारंभ 19 जानेवारीला रंगणार

**दादरच्या राजा शिवाजी विद्यालयात आनंदसोहळा**

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

१९२५ साली विजयादशमीच्या सुमुहूर्तावर आत्मोन्नती मंडळाच्या माध्यमातून गिरगावातील कऱ्हाडे ज्ञाती बांधवांची एक सभा भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या दिवाणखान्यात संपन्न झाली, या सभेत कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईची स्थापना करण्यात आली होती.ज्ञाती बांधवांचे आशीर्वाद, कार्यकर्त्यांनी निरपेक्ष बुद्धीने केलेली सेवा आणि सढळ हस्ताने संघासाठी अनेकांनी दिलेले आर्थिक योगदान यामुळेच आज मुंबईचा हा वटवृक्ष गेली ९९ वर्षे खंबीरपणे उभा आहे.या संस्थेचा शतकमहोस्तव यंदा साजरा होणार असून त्याचा शुभारंभ १९ जानेवारी रोजी दादर राजा शिवाजी विद्यालया संकुलाच्या भव्य पटांगणात धार्मिक अधिष्ठानाने होणार असून सायं. ५ वा. लिटल चॅपफेम प्रथमेश लघाटे व मुग्धावैशंपायन-लघाटे यांच्या सुमधूर "अभंगवाणी" या कार्यक्रमाने होणार आहे.

कऱ्हाडे ज्ञातीबांधवांसाठी स्थापन झालेली ही पहिली संस्था आहे. कऱ्हाडे ब्राह्मण संघांच्या माध्यमातून ज्ञातीतील गरजूंना तसेच इतर समाजातील गरजवंतांना शैक्षणिक मदत, वैद्यकीय मदत, नवीन उद्योजकांना मार्गदर्शन, वेदशास्त्रासाठी शिष्यवृत्ती, कलाकारांना उत्तेजन, समाजामध्ये विविध क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या मान्यवरांचा तसेच संस्थांचा गौरव, गरजू संस्थांना आर्थिक मदत, नैसर्गिक आपत्तीत सहाय्य, असे अनेक सेवाभावी उपक्रम केले जातात.अभिमानाची बाब म्हणजे गेली ९९ वर्षे मुंबई संघ ही कार्ये यशस्वीपणे करीत आहे. एखाद्या संस्थेचे कार्य अशा प्रकारे १०० वर्षे अखंडपणे सुरू आहे.आपण व आपल्या कुटूंबियांनी सहभागी होवून अनुभवावे व या सुवर्ण क्षणांच्या स्मृतींचे प्रत्यक्ष साक्षीदार व्हावे, या साठी वर्षभर कार्यक्रमांचे आयोजन करुन शतकोत्तर कार्यक्रम मोठ्या दिमाखात साजरा होणार आहे.असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष श्रीराम देव आणि कार्यवाह हेमंत किर्लोस्कर यांनी ज्ञातिबांधव आणि शुभचिंतकांना केले आहे.



*मुंबई: काल बेस्ट उपक्रमातील आयुर्मान संपलेल्या बस भंगारवाल्याकडे घेऊन जाताना. ओशिवरा आगारात १८ बस होत्या. अशाच प्रकारे मार्च मध्येही अनेक बसे स भंगारात जाणार आहेत. व केवळ ५०० बसेस शिल्लक राहणार आहेत.*

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार विरार (प.), ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१३०३.
दुरध्वनी : ०२५०-६६३००००/२५२७१०८ टोल फ्री क्र. : १८००२३३४३५३
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र :वविशम/मु.विद्युत/ ६५ / २०२५ — दिनांक : १५/०१/२०२५

**ई-निविदा सुचना क्र. ०७ (२०२४- २०२५)**

वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (एफ), धानिव / पेल्हार मधील पेल्हार डॅम्प येथे नादुरुस्त व बंद झालेले पथदिवे व केबल बदली करुन कार्यान्वीत करणे कामाकरीता निविदा सुचना व निविदा प्रपत्र https://mahatenders.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. १७/ ०१ / २०२५ पासून उपलब्ध होणार आहे.
निविदेबाबत सूचना व शुद्धीपत्रक असल्यास https://mahatenders.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेंत येईल.

सही/-
(अमोल जाधव)
प्र.क्रार्यकारी अभियंता (विद्युत)
वसई-विरार शहर महानगरपालिका

जावक क्र.: व.वि.श.म./मा. व.ज/३२/२०२५
दिनांक : १६/०१ /२०२५

**डहाणू नगर परिषद**
दुसरा मजला, कुमार कॉर्नर, मल्याण (प.), ता. डहाणू,
जि. पालघर ४०१ ६०२, दुरध्वनी : ०२५२८-२२४४६२
Website : www.dahanumc.comEmail-dme.dahanu@gmail.com

**विभाग: अग्निशमन व आणीबाणी सेवा**
जा.क्र./नप/अग्निशमन / ३१०१ /२०२५ — दिनांक- १६/०१/२०२५

**दरपत्रक नोटीस**

डहाणू नगर परिषद मार्फत 'डहाणू पर्यटन महोत्सव ३.०" हा कार्यक्रम सीव्यु पार्क, डहाणू बीच, डहाणू-आगर रोड येथे आयोजित करण्यात आलेला आहे. येथे वेगवेगळे पदार्थांचे स्टॅाल दि.३१/०९/२०२५ ते दि. ०२/०९/२०२५ पर्यंत लावण्यात येणार असून त्यांना अग्निप्रतिबंध करण्यासाठी अग्निशामक यंत्र (Fire Extinguishers) ABC ६kg. CO2 २. 4kg एकूण ३० नग पुरवठा करणे कामी खालील अटी शर्तीच्या अधीन राहून पुरवठादाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | फायर एक्सटिंगविशर | दर नमूद करावे. |
|---|---|---|
| १) | अग्निरोधक बंब ABC-6 kg. Dry Chemical Powder Store pressure type As per IS-15683 | |
| २) | अग्निरोधक बंब CO2-2.5 kg. As per IS- 2878 | |

**अटी व शर्ती**
१) निविदा फॉर्म वरील प्रमाणे प्रत्येकी नग करिता एकूण दर सर्व करासहित देणे आहे.
२) दरपत्रक सीलबंद लिफाफ्यात दिनांक /०१/२०२५ रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत स्वीकारली जातील.
३) उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.
४) कोणतेही दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर अथवा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी डहाणू नगर परिषद यांनी राखून ठेवले आहेत. त्याची कारणे दिली जाणार नाही.
५) दरपत्रक मंजूर झाल्यास लेखी कळविण्यात येईल तसेच योग्य त्या रकमेच्या स्टेम्प पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.

प्रत: डहाणू नगर परिषद, नोटीस बोर्ड वर प्रसिद्धी करिता.

सही/-
(अक्षय गुडधे)
मुख्याधिकारी
डहाणू नगर परिषद

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 208**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - २०८**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

मुंबई: परळ येथील ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते बच्चुभाई शहा यांच्या नेतृत्वाखाली संयोग ट्रस्टच्या माध्यमातून केईएम रुग्णालयाच्या दोन विभागाना लाखो रुपये किमतीची उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली. सर्जिकल विभागाला 26 लाख रुपये किमतीची ऑपरेशन थेटर लाईट तर नेत्र विभागाला बावीस लाख रुपयांची मशीन देण्यात आली. अनुक्रमे कुशल दिनेश वोरा व केईएम रुग्णालयातील माजी विद्यार्थी डॉ. महेश उपरकर यांनी या मशीन उपलब्ध करून दिल्या होत्या. डॉ. उपरकर यांनी दिलेली मशीन स्वीकारताना केईएम रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत तसेच डावीकडून संयोग ट्रस्टचे विश्वस्त डॉ. रामकृष्ण प्रभू, देणगीदार डॉ. महेश उपरकर, विश्वस्त डॉ. व्यंकटेश शिवणे तसेच संयोग ट्रस्टचे सचिव प्रकाश कोंडूरकर आदी छायाचित्रात दिसत आहेत.



# शेत वहीवाटीमध्ये वाहन वापरानुसार रस्ता करण्याबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर करा - महसूलमंत्री बावनकुळे

प्रतिनिधी
■ मुंबई

यांत्रिकीकरणामुळे सध्या शेत वहीवाटीमध्ये मोठ्या वाहनांचा वापर होत असल्याने वाहन प्रकारानुसार शेत जमीन वहिवाट रस्ता करण्याबाबत तहसिलदारांना निर्णय घेता यावा यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.





शेतजमिनीच्या खरेदी विक्रीच्या दस्त नोंदणीमध्ये शेत रस्त्याचा समावेश बंधनकारक करणे व शेत रस्त्यांच्या नोंदणी ७/१२ इतर हक्कात करण्याबाबत महसूल मंत्री यांच्या दालनात बैठक झाली. बैठकीस वित्त नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार अभिमन्यू पवार, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार, सहसचिव अजित देशमुख उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, शासनाने शेत रस्त्यांचे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. त्यानंतर त्यावर थेट अपील उच्च न्यायालयात केले जाते. थेट अपील होण्यापूर्वी अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता यावे यासाठी एक स्टेप मधी असणे आवश्यक असून त्यानुसार नियमात सुधारणा करण्यात याव्यात अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# 'इमर्जन्सी' चित्रपटातून ऐतिहासिक मागोवा - मुख्यमंत्री फडणवीस



प्रतिनिधी
■ मुंबई

'इमर्जन्सी' चित्रपटातून आणिबाणीच्या काळातील ऐतिहासिक मागोवा घेण्यात आला असून या कालावधीतील घटनाक्रम अचूकपणे टिपण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

इमर्जन्सी या चित्रपटाच्या विशेष शो चे आयोजन 'बीकेसी'तील पीव्हीआर येथे करण्यात आले. यावेळी चित्रपटाच्या नायिका कंगना राणावत, मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रसाद लाड, चित्रपटाची संपूर्ण टीम आणि प्रेक्षक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आणीबाणीच्या कालावधीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान बाजूला ठेवण्यात आले. मात्र ही घटना देशाच्या प्रत्येक नागरिकांस माहिती होणे आवश्यक आहे. आणीबाणीच्या कालखंडात नागरिकांचे अधिकार काढून घेण्यात आले होते. लोकशाहीवरील या संकटाची माहिती देशातील नागरिकांना कळणे गरजेचे आहे, असेही प्रतिपादन फडणवीस यावेळी केले.

अभिनेत्री कंगना राणावत यांनी स्वर्गीय इंदिरा गांधी यांची भूमिका अतिशय उत्तम रंगवली असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# धारावीवासियांच्या मालाडमधील पुनर्वसनास स्थानिकांचा विरोध

**गावकरी आक्रमक: जमीन मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना रोखले**



प्रतिनिधी
■ मुंबई

धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी जमिनींची मोजणी करण्यासाठी मालाड पश्चिम येथील आक्सा गावामध्ये गेलेल्या नगर भूमापन अधिकाऱ्यांना काल गुरुवारी गावकऱ्यांनमालाड पश्चिम चे आमदार अस्लम शेख यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येत जोरदार विरोध करत हुसकावून लावले. यावेळी गावकरी प्रचंड आक्रमक झालेले दिसले. जमीन मोजणीसाठी सकाळी ९.३० ची वेळ देऊन प्रत्यक्षात मात्र सकाळी ६ वाजताच प्रचंड पोलीस बंदोबस्तात आणि गावकऱ्यांना अंधारात ठेऊन भूमापन अधिकाऱ्यांनी जमीन मोजणी सुरु केल्याने गावकरी संतप्त झाले.

आमदार अस्लम शेख यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येत गावकऱ्यांनी काही काळ मढ-मार्वे मार्ग रोखून धरला. कोणत्याही परिस्थितीत भूमिपुत्रांच्या हक्काच्या जमिनी अदानीच्या घशात जावू देणार नाही, अशी आक्रमक भूमिका आमदार अस्लम शेख यांनी घेतली. यावेळी अस्लम शेख आणि पोलीस यांच्यामध्ये शाब्दीक चकमक देखील झाली. गावकऱ्यांना सोबत घेऊन अस्लम शेख यांनी थेट मालवणी पोलीस ठाणे गाठले.

जमिनीची मोजणी झाली नाही गावकऱ्यांना अंधारात ठेऊन केलेला सर्वे रद्द करा, अन्यथा भूमापन अधिकारी रणजित देसाई यांना जावू देणार नाही, अशी आक्रमक भूमिका आमदार अस्लम शेख यांनी घेतल्याने मालवणी पोलीस स्थानकाबाहेर देखील बराच काळ तणाव निर्माण झाला होता. यातील काही जमिनीबाबत मुक्तेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी व राज्यसरकार यांच्यामध्ये न्यायालयात वाद असताना व या जमिनीवर कोणतीही कार्यवाही करु नये, असे न्यायालयाचे स्पष्ट आदेश असताना देखील या जमीनीची मोजणी केली गेल्याने गावकऱ्यांनी यावर आक्षेप घेतला, व नगर भूमापन अधिकाऱ्यांना या मुद्द्यावरुन घेरले. शेवटी नगर भूमापन अधिकाऱ्यांनी जमिनीची मोजणी झाली नाही" असे लिखित स्वरुपात देण्याचे कबूल केल्याने ग्रामस्थ शांत झाले.



*मुंबई: बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या म्युनिसिपल मजदूर संघ युनियन कोड क्रमांक 52 या युनियनचे कार्यकर्ते व पालिकेच्या परिवहन खात्यात कार्यरत असलेले अंगद सूर्यकांत रणदिवे यांची अध्यक्ष म्हणून युनियनचे अध्यक्ष केंद्रिय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांनी नियुक्ती करुन आपल्या कार्यालयात सोमवारी त्यांना नियुक्ती पत्र देऊ केले. यावेळी रिपाई मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे ,चेंबूर तालुका अध्यक्ष रवीभाऊ गायकवाड, युनियनचे चिटणीस नितीन कांबळे, सरचिटणीस समाजभूषण प्रकाश कमलाकर जाधव आणि पदाधिकारी उपस्थित होते.*

# वारसा हक्काने नोकरी मिळण्याचा अधिकार अबाधित : आज पालिका कामगारांचा मेळावा

प्रतिनिधी
■ मुंबई

उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयामुळे लाड-पागे समितीच्या वारसाहक्काच्या शिफारशी सर्व जातीच्या सर्व ठिकाणी घाणीच्या सफाईचे काम करणाऱ्या कामगारांना नोकरी मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेतील घ.क. व्य., मेन्शुअर, ड्रेनेज, पंपिंग, मार्केट, देवनार कत्तलखाना, सर्व रुग्णालये येथे घाणीशी संबंधित सफाईचे काम करीत आहेत त्या सर्व कामगारांना उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयामुळे लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू होऊन नोकरी मिळणार आहे.

सदर निर्णयामुळे घ.क.व्य., मेन्शुअर, ड्रेनेज, पंपिंग, मार्केट, देवनार कत्तलखाना, सर्व रुग्णालये येथील कामगार-कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन त्यांचा आनंद द्विगुणीत झाला आहे. त्यानिमित्त शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २.०० वा. राष्ट्रीय मिल मजदुर संघ, जी. डी. आंबेकर रोड, भोईवाडा, परेल, मुंबई ४०००१२ येथे "भव्य मेळावा" आयोजित केला आहे.

सदर मेळाव्या प्रसंगी संपूर्ण महाराष्ट्रातील कामगारांना वारसा हक्काचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने संघर्ष करणारे व लढा देणाऱ्या महाराष्ट्र राज्य महानगरपालिका नगर पालिका नगरपरिषद कामगार व कर्मचारी फेडरेशनचे कामगार नेते व जेष्ठ विधितज्ञ वकिल ह्यांचा उचित सन्मान व सत्कार करण्यात येणार आहे.अशी माहिती म्युनिसिपल मजदुर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव यांनी दिली.

# 'आर्टी' मध्ये 85 टक्के सवलतीत विक्रीसाठी पुस्तके उपलब्ध

प्रतिनिधी
■ मुंबई

महागडी पुस्तके जर आपणाला शंभर- दीडशे रुपयात मिळाली तर आश्चर्य वाटेल, पण हे खरे आहे. नव्याने स्थापन झालेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत असणाऱ्या अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) या संस्थेने महापुरुषांचे विचार सर्वदूर पोहोचवण्याचा उपक्रम हाती घेतला असून, ८५ टक्के सवलतीत ही पुस्तके आर्टीच्या कार्यालयात उपलब्ध असल्याची माहिती आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी दिली.

देशातील अनेक महापुरुषांनी पुस्तकांच्या माध्यमातून आपले विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले. त्यांचे विचार नवीन पिढीपर्यंत घेऊन जाण्यासाठी बार्टीचे महासंचालक श्री. वारे आणि निबंधक इंदिरा आस्वार यांच्या संकल्पनेतून आर्टी संस्थेने महापुरुषांच्या पुस्तकांवर ८५ टक्के सवलत देण्याचा अभिनव उपक्रम सुरु केला आहे.

भारताचे संविधान, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले, अण्णा भाऊ साठे यांचे खंड आणि त्यांच्यावर लिहिलेली मराठी, इंग्रजी भाषेतील पुस्तके विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. सामाजिक, राजकीय, खासगी, शासकीय आणि शैक्षणिक संस्था तसेच प्रत्येकांनी संग्रहित ठेवावे, असे हे ग्रंथ या ठिकाणी उपलब्ध आहेत.

***पुस्तकाची मूळ किंमत व कंसात सवलतीत दर पुढील प्रमाणे***

*भारताचे संविधान ४५० रुपये (६३), शूद्र पूर्वी कोण होते? ३०० (४५), बुद्ध आणि त्यांचा धम्म ४०० (६०), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र चांगदेव खैरमोडे सेट ४ हजार (६००), समग्र आंबेडकर चरित्र बो. सी. कांबळे सेट २५०० (३७५), फकिरा १६० (२४), फकिरा इंग्रजी अनुवाद २५०० (३७५), अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान ४८० (७२), राजर्षी शाहू रयतेच्या राज्याचे चित्रमय चरित्र १५०० (२२५), साहित्यसम्राट १५० (२३), स्वराज्य ते स्वातंत्र्य आणि समता १२० (१८), कर्तृत्व आणि व्यक्ति महत्त्व. ११०० (१६५). एकूण किंमत ११ हजार ५२६ रुपये किमतीची पुस्तके सवलतीच्या दरात १७३० रुपयात उपलब्ध होणार आहेत.नोव्हेंबर, डिसेंबर या दोन महिन्यात ८० हजार रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली असल्याची माहिती वारे यांनी दिली आहे. आर्टी कार्यालयाचा पत्ता बी- 201/ 202, 2 रा मजला, 'बी' विंग, अर्जून सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (ईस्ट) येथे पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत. गोवंडी स्टेशनपासून पूर्वेकडे 5 मिनिटांच्या अंतरावर आर्टी ही संस्था आहे.*

# 'केईएम'च्या शतक महोत्सवाचा शुभारंभ शनिवारपासून

**पाच दिवस चालणार शतकमहोत्सवी सोहळा**

प्रतिनिधी
■ मुंबई

केईएम रुग्णालयाच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त १८ जानेवारी ते २२ जानेवारी २०२५ या पाच दिवस कालावधीत आयोजित विविध कार्यक्रमांपैकी पहिला दिवस माजी विद्यार्थ्यांसाठी, दुसरा दिवस निवासी डॉक्टर आणि विद्यार्थ्यांसाठी आणि तिसरा दिवस परिचारिका, प्रशासकीय कर्मचारी आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गासाठी असेल. तसेच, चौथा दिवस हा कार्यरत असणाऱ्या प्राध्यापक वर्गासाठी राहणार आहे. पाचव्या दिवशी मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा हे कर्मचारी, विद्यार्थी, अध्यापक वर्ग आणि डॉक्टर यांना संबोधित करणार आहेत. तसेच, यादिवशी सर्वोत्तम निवासी डॉक्टर, सर्वोत्तम वॉर्ड तसेच सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

या पाच दिवसांच्या कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत परिसंवाद होणार आहेत. तर, कर्मचारी वर्गासाठी मनोरंजनपर कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती डॉ. संगीता रावत यांनी दिली. केईएम रूग्णालयात कार्यरत डॉक्टर आणि कर्मचारी यांच्या राहण्यासाठी २१ मजली इमारत (दोन विंग) उभारण्यात येणार आहे. या इमारतीच्या कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या इमारतीमध्ये १२० खोल्या कर्मचारी वर्गासाठी आणि ६३ खोल्या डॉक्टरांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अस्थिव्यंग उपचार विभागाच्या आवारातील जागेत ही इमारत उभारण्याचे नियोजित आहे.

जानेवारी २०२५ ते जानेवारी २०२६ या वर्षभराच्या कालावधीत प्रत्येक आठवड्यात शैक्षणिक कार्यक्रम आयोजनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. रूग्णालयाच्या गौरवशाली इतिहासाचा लघूपट तयार करण्यात आला आहे. तसेच रूग्णांच्या शिक्षणासाठी १०० लघूपट निर्मिती करण्यात येणार आहे. प्रत्येक बाह्य रूग्ण विभागाच्या ठिकाणी हे लघूपट प्रदर्शित करण्यात येतील, असेही अधिष्ठाता डॉ. संगीता रावत यांनी सांगितले.

# महाराष्ट्र फाउंडेशनचा नरेंद्र दाभोलकर स्मृति पुरस्कार देबेंद्र सुतार यांना जाहीर

**शनिवारी पुण्यात पुरस्कार वितरण**

प्रतिनिधी
■ मुंबई

.सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) समाजकार्य पुरस्कार समितीच्या वतीने यावर्षी चा 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति पुरस्कार' देबेंद्र सुतार (कटक, ओरिसा) यांना जाहीर झाला आहे. एक लक्ष रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार माजी पोलीस कमिशनर मीरा बोरवणकर यांच्या हस्ते पुणे येथे या शनिवारी १८ जानेवारीला सायंकाळी पाच वाजता एस.एम. जोशी सभागृह, गांजवे चौक येथे प्रदान करण्यात येणार आहे.



डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार प्राप्त देबेंद्र सुतार (वय ५०) हे ओरिसा रॅशर्नॅलिस्ट सोसायटी या संघटनेचे राज्य सेक्रेटरी आहेत. ते गेली २५ वर्षे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करतात. ओरिसा रॅशर्नॅलिस्ट सोसायटी ही ओरिसातील विवेकवादी संघटना आहे. ती गेली २५ वर्षे कार्यरत आहे. या संघटनेच्या वतीने 'वैज्ञानिक चर्चा' या नावाने एक त्रैमासिक निघते." त्याचे संपादक देबेंद्र सुतार आहेत. त्यांच्या संघटनेच्या वतीने आतापर्यंत ४५ विषयांची पुस्तके प्रकाशित केली आहेत. १० रुपये किमतीच्या पुस्तकांना मोठी मागणी असते. 'शिवाजी कोण होता?' हे कॉ. गोविंद पानसरे यांचे पुस्तकही त्यांनी ओडिया भाषेत प्रकाशित केले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे चरित्र ओडिया भाषेत प्रकाशित करायची त्यांची तीव्र इच्छा आहे. अनेक विवेकवादी कार्यकर्ते हे लेखन, प्रबोधन या अंगाने काम करतात. पण कटक येथील देवेंद्र सुतार हे रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे कार्यकर्ते आहेत.देवेंद्र सुतार यांना नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार मिळाले बद्दल त्यांचे अंनिसचे कार्यकर्ते डॉ. हमीद दाभोलकर, मिलिंद देशमुख, राहुल थोरात, अण्णा कडलास्कर यांनी अभिनंदन केले आहे.

# अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्सबाबत जनजागृतीसाठी पहिली बैठक एल विभाग येथे संपन्न



प्रतिनिधी
■ मुंबई

उच्च न्यायालयाच्या नुकत्याच प्राप्त झालेल्या आदेशान्वये प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावर अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स हटवण्याबाबत जनजागृतीसाठी पहिली समन्वय बैठक गुरुवारी एल विभाग कार्यालय येथे पार पडली. अशी पार पडलेली ही पहिली बैठक होती. जनजागृती निर्माण करण्यासाठी तसेच यंत्रणांमधील समन्वयाच्या अनुषंगाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

एल विभागाचे सहायक आयुक्त धनाजी हेर्लेकर, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वरिष्ठ निरिक्षक (अनुज्ञापन) आणि कुर्ला विभागातील स्थानिक नागरिक तसेच सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. अनधिकृतपणे लावण्यात येणाऱ्या बॅनर्स, पोस्टर्स, फलक आदींबाबत तक्रारीसाठी आणि निष्कासन कार्यवाहीबाबत समन्वय साधण्याच्या अनुषंगाने स्थानिक पातळीवरील मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

उच्च न्यायालयाने १९ डिसेंबर २०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार आणि सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय (महाराष्ट्र शासन) यांच्याकडून २० डिसेंबर २०२४ रोजी प्राप्त निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांत अनधिकृत पोस्टर, बॅनर्स, फलक आदींवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगानेच विभागीय स्तरावर बैठकीचे आयोजन करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.

**मध्य रेल्वे**
**विविध कामे**

**अनु. क्र. १. कामाचे नाव:** पुनर्मागणी – वरी. डीईएन (एस) अधिकारक्षेत्राअंतर्गत ८.० टन ट्रॅक्ड एक्सकॅव्हेटर वापरून यार्डमध्ये तुटलेल्या/मोडलेले आणि काढून टाकलेले स्लीपर्स बदलणे आणि रचणे. **अंदाजे मूल्य:** रु. ४८.७३ लाख, **इरठे:** रु. ९७५००, **पूर्तता कालावधी:** ४ महिने. **अनु. क्र. २. कामाचे नाव –** १ वर्षासाठी हाजीबंदर भंगार यार्डसाठी वरी. डीईएन (एस) अंतर्गत सीएसएमटी-केव्हायएन अनुभागामधील विविध स्थानके आणि यार्डसमधून स्वीच, एसईजे, रेल/ क्रॉसिंग आणि फिटिंग्जचे लोडिंग, अनलोडिंग आणि वाहतूक. **अंदाजे मूल्य:** रु. ११६.६५ **लक्ष इरठे:** रु. २०८३०० पूर्तता **कालावधी:** १२ महिने. I) उपरोक्त निविदेचा निविदा समाप्तीचा दिनांक आणि वेळ : अनु. क्र. १ आणि २ साठी ३१.०१.२०२५ रोजी ११.०० वा. पर्यंत आणि ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील. II) प्रस्तावित बोलीदारांना निविदेच्या आणि जर असल्यास शुद्धिपत्रकाच्या तपशीलासाठी www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे. III) निविदाकार उपरोक्त ई-निविदेमध्ये केवळ www.ireps.gov.in संकेतस्थळाद्वारे ई-निविदेमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सहभागी होऊ शकतात आणि सदर ई – निविदेमध्ये प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करता येणार नाहीत. जर प्रत्यक्ष सादर करण्यात आल्यास ते नाकारण्यात येतील किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. IV) बोली सुरक्षा ई-पेमेंट गेटवे द्वारे रोख स्वरूपात किंवा भारतामधील शेड्युल्ड व्यावसायिक बँकेकडील बँक गरंटी बॉडच्या स्वरूपात सादर किंवा निविदा कागदपत्रामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे सादर करावे. V) अधिक माहितीसाठी संपर्क करा: विभागिय रेल्वे व्यवस्थापक (कार्ये) ह्यांचे कार्यालय: मध्य रेल्वे दूरध्वनी क्र. ०२२ ६७४५५३२३ VI) सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश दिनांकित १६-९-२०१७ अनुसार मान्यताप्राप्त आहे. निविदेचा पूर्ण तपशिल www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. निविदेचा पूर्ण तपशील विभागिय रेल्वे व्यवस्थापक (कार्ये) ह्यांचे कार्यालय, मुंबई सीएसएमटी ह्यांच्या सूचना फलकावर देखील उपलब्ध आहे.

**खुला ई-निविदा सूचना क्र. सीआर-डीआरएम (डब्ल्यू)-बीबी-२०२४-३३ दि. १३.०१.२०२५**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है
698

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**मुख्य अभियंता (यांत्रिकी आणि विद्युत) ह्यांचा विभाग**
क्र. ई. ई. यांत्रिकी/३८९७/ रेफ दि. १५.०१.२०२५

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | मुख्य अभि. (एम आणि ई) |
| उप विभाग | उप मुख्य अभि. (एम आणि ई) शहर/ कार्य. अभि. यांत्रिकी (रेफ्रिजरेशन) |
| बोली क्रमांक | १) २०२५_एमसीजीएम_११३८१२६_१<br>२) २०२५_एमसीजीएम_११३८११३_१<br>३) २०२५_एमसीजीएम_११३८०७०_१ |
| विषय | १) ०१.०२.२०२५ पासून ३१.०१.२०२७ पर्यंत बृमनपामधील विविध ठिकाणी प्रिसिजन आणि अन्य प्रकारच्या एसी युनिटसचे सीएसएमसी.<br>ई. ई. यांत्रिकी/ रेफ/ टी-५१ दिनांकित १५.०१.२०२५<br>२) ०१.०४.२०२५ पासून ३१.०३.२०२८ पर्यंत महानगरपालिका मुख्यालय येथे ११ टीआर क्षमतेच्या चिलर आणि वॉटर प्युरिफिकेशन प्लांटचे सीएसएमसी<br>ई. ई. यांत्रिकी/ रेफ/ टी-५२ दिनांकित १५.०१.२०२५<br>३) ०१.०४.२०२४ पासून ३१.०३.२०२८ पर्यंत मुख्य अभि. (घकव्य) ग्रांट रोड (प) च्या कार्यालायामधील डकटेबल आणि स्प्लिट प्रकारच्या एसी युनिटसचे सीएसएमसी.<br>ई. ई. यांत्रिकी/ रेफ/ टी-५३ दिनांकित १५.०१.२०२५ |
| बोली सुरु दिनांक आणि वेळ | १७.०१.२०२५ रोजी स. ११.०० वा. |
| पूर्व बोली बैठक | --- |
| बोली समाप्ती दिनांक आणि वेळ | २३.०१.२०२५ रोजी १६.०० वा. |
| संकेतस्थळ | http://portal.www.mcgm.gov.in |
| संपर्क अधिकारी नाव | श्री. ए. के. जामभोरे |
| दूरध्वनी क्र. | ०२२-२३०९६४३३ |
| मोबाईल क्र. | ९९३०१२८३८७ |
| ई-मेल | eemechref.me@mcgm.gov.in |

पीआरओ/२२४६/जाही/२०२४-२५

सही/-
(ए. के. जामभोरे)
ई. ई. यांत्रिकी (रेफ्रिजरेशन)

झाडे लावा, झाडे जगवा

तर्कशक्ती आणि निर्णयक्षमता हे उत्तम नेत्याचे गुण आहेत.



- पब्लियस कॉर्नेलियस टॅसिटस
रोमन इतिहासकार

वृत्तमानस
मुंबई, शुक्रवार, १७ जानेवारी २०२५

# महारेराचा फेरा आवळतोय!

मानवाच्या मूलभूत हक्कांमध्ये घराच्या अधिकाराला वरचे स्थान आहे. त्यामुळे या हक्काला तमाम मानवाच्या जीवनामध्ये अत्यंत महत्त्व आहे. मानवाच्या जीवनातील हे महत्त्वाचा या अधिकाराला देखील तेवढेच महत्त्व निर्माण झाले आहे. घर बांधून घेणारा मोठा घटक निर्माण झाला आहे. घर घेणारा आणि विक्री करणाऱ्यांचे मोठे जाळे जगभरात उभे राहिले आहे. नफा कमवणारा घटक उभा राहिला आहे. त्यामुळे जास्त नफ्यासाठी फसवणारे देखील निर्माण झाले आहेत. घर विक्रीच्या नावे ग्राहकांना फसवले जात आहे. आकर्षक अमिषे दाखवून ग्राहकांना गंडा घातला जात आहे. हक्काचे स्वतःचे घर असावे अशी सर्वांची इच्छा असली तरी त्याला अनेकदा अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. एखाद्या ठिकाणी घराची नोंदणी करून ठेवल्यास ते घर कधी मिळणार याची यापूर्वी कोणतीही शाश्वती नव्हती. अर्थात दशकापूर्वीच्या काळात अनेकांना हे अनुभव आले आहेत. बिल्डरने एखादा प्रकल्प वेळेत पूर्ण न करता मध्येच अर्धवट सोडून दिल्याने अनेकांना झालेले आर्थिक नुकसान त्याकाळात पाहावयास मिळत असे. या नैराश्यामधून अनेकांनी स्वतःचे जीवनसुद्धा संपवले आहे. अर्थात याला चाप बसला तो महारेरा या कायद्याने. महारेराचा रेटा असल्याने बिल्डरांना कोणतेही कारणे देण्याची सोय नसल्याने घर वेळेत मिळण्याची खात्री गेल्या काही वर्षात निर्माण झाली असे म्हणणे वावगे ठरू नये. अलीकडेच महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने म्हणजे महारेराने राज्यातील तब्बल साडेदहा हजार गृहप्रकल्पांवर नोटीसा बजावल्या आहेत. गृहप्रकल्पांवर नियमन करणारी महारेरा ही यंत्रणा असल्यामुळे या नोटीसा संबंधित विकासकांनी गांभीर्याने घेतल्या नाहीत तर त्यांच्यावर प्रकल्पाची नोंदणी रद्द होण्याची कारवाई होऊ शकते. याचा खरेदीदारांना फटका बसणार का याबाबतच्या चर्चेने वेग घेतला असला तरी त्यात खरेदीदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही ही यातील जमेची बाजू मानावी लागेल. महारेराची स्थापना झाल्यापासून नोंदविलेल्या सुमारे दहा हजार 773 प्रकल्पांतील विकासकांनी प्रकल्प पूर्ततेच्या तारखेनंतरही त्या प्रकल्पाचे काय झाले, याविषयी आवश्यक माहिती संकेतस्थळावर अद्ययावत केली नसल्याचे आढळून आले. हे प्रकल्प व्यपगत (लॅप्स) झाले आहेत. याचा अर्थ या प्रकल्पाची संबंधित विकासकांना जाहिरात करण्यावर बंदी आली आहे. या अनियमिततेची महारेराने गंभीर दखल घेतली असून या सर्व प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत. महारेरा नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करताना प्रत्येक विकासकाला प्रकल्प प्रत्यक्षात कधी पूर्ण होणार याची तारीख नोंदविणे बंधनकारक असते. या घोषित प्रकल्प पूर्ततेच्या तारखेनंतर प्रकल्प पूर्ण झालेला असेल तर भोगवटा प्रमाणपत्र सादर करणे वा प्रकल्प अपूर्ण असल्यास नवीन पूर्तता तारीख घ्यावी लागते. पूर्तता तारखेनंतर वर्षभराची मुदतवाढ महारेराकडून दिली जाते. मात्र त्यानंतर विकासकांनी सादर केलेली कारणे पटली तरच मुदतवाढ मिळते. प्रकल्प सुरू करण्यातच काही अडचणी आलेल्या असल्यास त्याबाबतही माहिती देणे आवश्यक असून प्रकल्प रद्द करण्यासाठी अर्ज करणे बंधनकारक असते. स्थावर संपदा कायद्यातील तरतुदीनुसार विकासकाला तिमाही आणि वार्षिक विवरण प्रपत्रे संकेतस्थळावर अद्ययावत करणे आवश्यक असले तरी साडेदहा हजार प्रकल्पांतील विकासकांनी ती अजिबात गांभीर्याने घेतली नसल्याने त्यांना महारेराने नोटीसांडरे कारवाईचा इशारा दिला आहे. यामध्ये मुंबईसह महाप्रदेशातील सर्वाधिक म्हणजे पाच हजार 231 प्रकल्पांचा समावेश आहे. त्या खालोखाल पुणे परिसर (3406), नाशिक (815), नागपूर (548), संभाजीनगर (511), अमरावती (201), दादरा आणि नगर हवेली (43) आणि दमण दिव (18) या प्रकल्पांचा समावेश आहे. उपलब्ध माहितीनुसार नोटीस बजावण्यात आलेल्या दहा हजार 773 प्रकल्पांपैकी पाच हजार 324 प्रकल्पांतील विकासकांनी नोटीसांना उत्तरे देऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात आली. तर काहीही प्रतिसाद न देणाऱ्या तीन हजार 499 प्रकल्पांवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. केंद्रात स्थावर संपदाकायदा 2016 मध्ये अमलात आला. त्यानुसार प्रत्येक राज्याने स्वतंत्र नियमावली करून या कायद्यातील तरतुदीनुसार स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाची स्थापना करणे बंधनकारक होते. महाराष्ट्राने मे 2017मध्ये महारेरा हे प्राधिकरण स्थापन केले. या प्राधिकरणामुळे राज्यातील खरेदीदारांना फसवणूक करणाऱ्या विकासकांकडून वा रखडलेल्या बांधकामाबाबत तक्रारी करणे शक्य झाले. या तक्रारींची महारेराने दखल घेऊन संबंधित विकासकांना नुकसानभरपाई वा परताव्यापोटी वसुली आदेश जारी केले. यापैकी काही आदेशांची अंमलबजावणी झाली. मात्र अनेक वसुली आदेश आजही अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत असले तरी विकासकांना या आदेशांची आज ना उद्या पूर्तता करावीच लागणार आहे. महारेराचा विकासकांनीही धसका घेतला असून आवश्यक ती पूर्तता केली आहे. महारेरामुळे आता खरेदीदाराला संकेतस्थळावर माहिती मिळणे शक्य झाले आहे. महारेराने 2017 मध्ये जारी केलेल्या नोटीशीची दखल घेऊन विकासकांनी कार्यवाही केली तर व्यपगत झालेला गृहप्रकल्प पुनरुज्जीवीत होऊ शकतो. या नोटीशीकडे दुर्लक्ष केल्यास प्रकल्पाची नोंदणी रद्द केली जाऊ शकते. मात्र कायद्यातील तरतुदीनुसार महारेरा अशा प्रकल्पांना एकूण खर्चाच्या पाच वा दहा टक्के इतका दंड आकारू शकते. याशिवाय प्रकल्पाची नोंदणी रद्द वा स्थगित होऊ शकते. त्यामुळे या प्रकल्पातील खरेदीदारांना त्याचा निश्चितच फटका बसू शकतो. खरेदीदारांनी बँकांकडून गृहकर्ज घेतलेले असते. अशावेळी खरेदी-विक्री करारनामा जिल्हा निबंधकांकडे नोंद होण्यात अडचणी निर्माण होऊ शकते वा ज्यांनी कर्ज घेतले आहे त्यांना काम बंद पडल्यामुळे कर्जाचा वाटा मिळण्यात अडचण निर्माण होते. अशा प्रकल्पात अन्य विकासक आला तरच खरेदीदारांना हक्काचे घर मिळू शकते. तोपर्यंत खरेदीदारांना नुकसान सहन करावे लागू शकते. विकासकांच्या वरील कारवाईचा थेट फटका हा खरेदीदारांना बसू नये यासाठी महारेराने अजूनही व्यापक प्रयत्न करणे आवश्यक आहे. अर्धवट राहिलेला अथवा सोडून दिलेला प्रकल्पाचे पुढे काय होणार यांची चिंता अनेकांना नेहमीच सतावत असते. यासाठी खरेदीदारांनी सुद्धा सतर्क राहणे आवश्यक आहेच. खरेदीदाराने आपण गुंतवणूक करीत असलेला प्रकल्प या यादीत नाही ना, याची खातरजमा करूनच घरासाठी नोंदणी करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महारेरा प्रमाणपत्र घेतल्याशिवाय विकासकाला घरांची आगावू नोंदणी करता येत नाही याची अजूनही अनेकांना कल्पनासुद्धा नाही. त्याबाबत जनजागृती झाली तरच त्याचा फायदा होऊ शकतो. गृहप्रकल्पात घरासाठी नोंदणी केल्यानंतर विकासकाला दहा टक्के रक्कम भरून करारनामा करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. महारेरा क्रमांक उपलब्ध असला तरी तो संकेतस्थळावरून तपासून पाहावा. महारेरा क्रमांकावरून संबंधित प्रकल्पाची संपूर्ण माहिती एका क्लिकवर उपलब्ध होऊ शकते. तशी माहिती उपलब्ध नसेल तर घराची नोंदणी करू नये. महारेराकडे संबंधित प्रकल्पाबाबत ऑनलाइन तक्रार नोंदवावी. म्हणजे फसवणुकीचे प्रकार टळू शकतील. महारेरा कायदा जरी मजबूत असला तरी घर खरेदीदारकांनी सुद्धा डोळे झाकून घर नोंदी करणे टाळले तरच अपेक्षित परिणाम दिसू शकतील. अन्यथा हा सिलसिला सुरूच राहण्याची शक्यता आहे. आपल्या आयुष्यभराची कमाई घरात लावली जात असल्यामुळे ही कमाई लावणाऱ्यांनी अधिक सजगपणे घर खरेदीचे व्यवहार करायला पाहिजेत.

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज **डॉ. एन डी पाटील**



फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
पुणे

# कुंकूचे महत्व जाणा !



नुकताच मकर संक्रांत सण पार पाडला. त्यानंतर आता सर्वत्र हळदी कुंकू समारंभ साजरे केले जात आहेत. रथसप्तमी पर्यंत चालणाऱ्या या उत्सव काळात सर्वत्रच्या स्त्रिया उत्साहाने सहभागी होतात. विविध महिला मंडळे, सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्था यांसह राजकीय पक्षांच्या वतीने हळदी कुंकू समारंभ साजरे केले जातात. त्यानिमित्ताने स्त्रियांचे संघटन पाहायला मिळते. यावेळी स्त्रियांना तिळगुळ वाटपासह वाण म्हणून काहीनाकाही वस्तू दिली जाते. या सर्वांत प्रमुख कृती असते ती हळद आणि कुंकू लावण्याची. सौभाग्याचे आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून कपाळी हळद आणि कुंकू लावले जाते. स्त्रियांच्या दोन भुवयांमध्ये आज्ञाचक्राच्या स्थानी लावले जाणारे हळद कुंकू श्रद्धने लावले जाते. प्रत्येक स्त्रीमध्ये दुर्गादेवीचे तत्व असते त्यामुळेच स्त्रीला शक्ती असेही म्हणतात.

स्त्रिया एकमेकींना हळद कुंकू लावतात म्हणजे एकमेकांतील दुर्गादेवीच्या तत्वाचे पूजन करतात. संपूर्ण चेहऱ्याच्या संवेदनांसाठी जबाबदार असणारा मज्जातंतू हा याच भागात असतो. दोन भुवयांच्या मध्यभागी मज्जातंतूच्या एकूण तीन शाखा असतात. या जागेवर दाब पडल्याने सायनसचा त्रास कमी होतो. डोळ्यांच्या महत्त्वाच्या नसा देखील याच भागात असतात आणि या नसा डोळ्यांच्या स्नायुंशी जोडलेल्या असतात. या ठिकाणी थोडासा दाब दिल्यास दृष्टीही चांगली राहते आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते. माणसाच्या मनावर ताण आला कि कपाळावर आठ्या पडतात. शरीरातला सगळ्या गोष्टींचा ताण हा कपाळावरील त्या बिंदूच्या ठिकाणी जमा होतो. म्हणूनच त्या बिंदूला थोडीशी उत्तेजना दिल्यास आपला ताण कमी होतो, दृष्टी सुधारते आणि निद्रानाशही कमी होतो. त्यामुळे बिंदूदाबन, योगशास्त्रदृष्ट्या आणि आध्यात्मिकदृष्ट्याही कुंकू लावण्याचे अनेक लाभ आहेत. हळद आणि चुना किंवा हळद आणि लिंबू यांच्या मिश्रणतून कुंकू बनवले जाते. त्यामुळे कपाळी कुंकू लावण्याचे आयुर्वेदिक लाभही आहेत. या सर्वांमुळे भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांसह पुरुषांनीही कपाळाला कुंकू लावण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आधुनिकतेच्या नावाखाली पूर्वापार चालत आलेल्या लाभदायक प्रथा हळूहळू लोप पावत चालल्या असून जसे हल्लीच्या स्त्रिया साडी केवळ सांस्कृतिक कार्यक्रमांना नेसतात तसे कुंकूही केवळ हळदी कुंकू समारंभातच लावू लागल्या आहेत.

कुंकूची जागा आता टिकलीने घेतली असून हळूहळू तिही नष्ट होण्याच्या मार्गांवर आहे. हल्लीच्या स्त्रियांवर हिंदी चित्रपटातील अभिनेत्रीनचा प्रभाव अधिक असल्याने आज अनेक स्त्रिया उजाड माथ्याने वावरताना दिसतात. काहीजनी टिकली लावली तरी ती दुर्बीणीने शोधावी लागेल अशा आकाराची लावतात. आपल्या हिंदु प्रथा परंपरा या मानवाचे सर्वांगीण हित साधणाऱ्या असून त्या सर्वांमागे शास्त्र दडलेले आहे. आज ते विज्ञानाच्या आधारावरही सिद्ध होत आहे. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी जाऊन त्यांना त्यागण्यापेक्षा त्यांचा अवलंब करणे हिताचे आहे. हळदी कुंकू साजरी करण्याच्या प्रथेतील व्यापक दृष्टिकोन लक्षात घेऊन स्त्रियांनी प्रतिदिन कपाळावर कुंकू लावण्याची सवय स्वतःला लावून घायला हवी.

- मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

## पत्र मानस

### वाल्मिक कराड नेमके कोण आहेत?

वाल्मिक कराडप्रकरणी राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणात खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा आरोप होत आहे.खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.वाल्मिक कराडवरही महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कलमान्वये (मकोका) कारवाई करण्यात आल्यानंतर वाल्मिक कराडला एसआयटीने ताब्यात घेतले आहे. वाल्मिक कराड समर्थकांनीही त्यांच्या सुटकेसाठी आंदोलन सुरूच ठेवले आहे. बीड जिल्ह्यातील परळीमध्ये कराडच्या कार्यकर्त्यांकडून बंदची हाक देण्यात आली आहे. महिलानी अंगावर पेट्रोल टाकून आत्मदहनाचा प्रयत्न केला आहे.वाल्मिक खूनी की ऋषी,गुन्हेगार की नेता आहे? मोठ्या संख्येने समर्थक त्यांच्या पाठीमागे उभे आहेत. वाल्मिक कराड यांची सुरुवात गोपीनाथ मुंडे त्यांच्यासोबत झाल्यानंतर आता धनंजय मुंडे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी आहेत.विरोधकांची वाल्मिक कराड ला कडक शिक्षा व्हावी अशी मागणी आहे.तर सत्ताधारी हे प्रकरण लांबवत आहेत.राजकारण व समाजकरण करणारे वाल्मिक कराड फरार का होते?

**- विवेक तवटे, कळवा, ठाणे**

### गुन्हेगारांना राजकीय आश्रय ?

सध्या महाराष्ट्रात गुन्हेगारी कमालीची वाढली असून बीड मधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे ती अजूनही चर्चेत आहे. त्यावर मात करण्यात आलेले आहे. याप्रकरणी आता एका राजकीय पक्षाच्याच पदाधिकाऱ्यांवर संशयाची सुई फिरू लागल्याने त्यांना पोलिसांच्या चौकशीला सामोरे जावे लागत असल्याची बातमी वाचनात आली. अलीकडच्या काळात अनेक बलात्कारी गुन्हेगारांना सत्ताधाऱ्यांचा राजाश्रय मिळाल्याने ते मोकाट फिरत असल्याचे दिसून येते. तर काही संशयित गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नेत्यांना थेट मंत्रिमंडळात स्थान मिळाल्याचे आपण पाहतो. अर्थात यावर राज्याचे गृहमंत्री कोणतीच ठोस भूमिका घेत नसल्याचे दिसते. याप्रकरणी कदाचित त्यांची हतबलताच असावी असे वाटते. तसेच त्यांचा गृह खात्यावर धाक नसल्यानेच गुन्हेगारीवर नियंत्रण राहिलेले दिसत नाही. विशेष म्हणजे याप्रकरणी पूर्वी विरोधी पक्षातील ज्या वाघिणी रान उठवत होत्या, त्यांचा आवाजच अलीकडे लुप्त झाल्याचे वास्तव समोर आहे. सध्या तर ज्यांच्यावर संशयित आरोपी म्हणून कारवाई होत असताना, चक्क त्यांच्यासाठी समर्थक आंदोलन करतात हे दुर्दैवी आहे. खुनातील आरोपींना अटक करून कडक शिक्षा व्हावी, म्हणून न्याय मागणाऱ्यांनाच रस्त्यावर उतरावे लागते हे वास्तव समोर आहे. खून, खंडणी व अपहरण करणाऱ्या तथाकथित गुन्हेगारांकडे शस्त्र परवाने आहेत का ? हे तपासणे गरजेचे आहे. कारण याच शस्त्रांनी अपराध केले जात असून त्यांना राजकारण्यांचे अभय मिळते. अर्थात सत्ताधारी पक्षांतील काही नेत्यांनी अलीकडेच शस्त्राचे धाक दाखवल्याचे दादर व कल्याण येथील पोलीस स्थानकांमध्ये दिसून आले आहे. तर काहीजण भडक वक्तव्य करून गुन्हेगारी प्रवृत्तीस हातभार लावताना दिसतात. अशा घटनांना सरकार पाठीशी घालत असेल तर रानबाजार हा होणारच ! परिणामी संपूर्ण बीड जिल्ह्यातील वातावरण आज अशांत दिसत असल्यामुळे, येथील लोकप्रतिनिधींनी याचे आत्मचिंतन करायला हवे. अन्यथा हाच प्रघात राज्यातील इतर भागातही पसरायला वेळ लागणार नाही. आज राज्यात महिला व बालके यांची सुरक्षा धोक्यात आल्याचे प्रकर्षाने दिसून येते. बीडमध्ये बंदुकीचे राज्य चालणार असेल, तर आपण उत्तर प्रदेश व बिहारच्या वाटेने जातोय असेच म्हणावे लागेल. सभ्यता व सुसंस्कृतपणा अंगीकारलेल्या भाजपला हे नक्कीच शोभादायी नसून, यावर योग्य ती कारवाई करून लवकरात लवकर शांतता व सुव्यवस्था राखणे गरजेचे आहे. अन्यथा सरकारमधील समन्वयाचा अभाव, नाराजी व गुन्हेगारांना राजकीय आश्रय मिळत असल्याची भावना जनतेत पसरण्याची शक्यता वाटते.

**- पांडुरंग भाबल, भांडुप.**

### मित्रपक्षही नकोत ?

लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्रात सपाटून मार खाल्यानंतर गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्रात फिरकले नव्हते पण विधानसभा निवडणूकीत भाजपला यश मिळाल्यानंतर मात्र त्यांची पाऊले पुन्हा महाराष्ट्रात येण्यास धजावली .शिर्डी येथे नुकतेच भाजपचे महाअधिवेशन पार पडले यावेळी अमित शहानी विरोधकाना बसायलाही जागा ठेऊ नका.पंचायत ते संसद सर्व भाजपमय करा असा संदेश आपल्या कार्यकर्त्याना दिला.लोकशाहीत सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवण्यासाठी विरोधक हे हवेतच हे सविधांन मानणा-या शहाना का समजत नाही ? विरोधक नसले तर सत्ताधारी मनमानी कारभार करण्यास मोकळे होतील. आपल्याच पक्षातील नेत्याना भ्रष्टाचार करण्यास मोकळीक मिळेल.कोणावरही कारवाई होणार नाही.संपुर्ण यंत्रणा आपल्याच ताब्यात राहील असे तर अमित शहाना म्हणायचे आहे काय ?उद्धव ठाकरेवर दगाबाज अशी टीका करणा-या अमित शहानी निवडणूकीपूर्वी बंद दरवाजा आड सत्तेत अड़ीच वर्षाचा शब्द देऊनही तो फिरवला मग खरे दगाबाज कोण ?हे जनतेला सांगायची गरज नाही. महाराष्ट्रात संपुर्ण भाजप हवा असे आदेश देणा-या अमित शहानी मित्रपक्षानाही धोक्याचा संदेश दिला आहे.राज्यात महायुतीचे सरकार आहे.सत्तेत मित्रपक्ष बरोबर असतील तर अनेक अडचणी येतात म्हणून अमित शहाना विरोधकाप्रमाणे मित्रपक्षही नकोत असे समजल्यास वावगे ते काय ?

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

### रंगवैखरीचे पुढे काय झाले ते कळलेच नाही.

राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत यंदापासून प्रथमच राज्यस्तरीय महाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. अशी घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अँड आशिष शेलार यांनी केल्याचे कळते. ही चांगली बाब आहे. पण अशा प्रकारची स्पर्धा ही प्रथमच होत नाही आहे. या अगोदर २०१७ आणि २०१८ या वर्षी महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेमार्फत रंगवैखरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गायन, नृत्य, नाट्य, शिल्प आणि चित्र या कलांचा संगम असलेला कलाविष्कार या स्पर्धेतून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मांडता आला होता. महाविद्यालयीन विश्वात अल्पावधीतच लोकप्रिय झालेली रंगवैखरी कलाविष्कार स्पर्धा २०१९ मध्ये मात्र ऐनवेळी स्थगित करण्यात आली. महाविद्यालयांनी जोरदार तयारी केल्यानंतर प्राथमिक फेरीच्या केवळ दोन दिवस अगोदर ही स्पर्धा स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर पाठपुरावा करुनही या स्पर्धेबाबत नंतर काहीच कळले नाही आणि ती अनिश्चित काळासाठी बंदच झाली. एकांकीका स्पर्धेच्या घोषणेमुळे नव्या स्वरुपात का होईना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ उपलब्ध होईल हीच अपेक्षा.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### दहिसर पूर्व रस्त्यामधील ड्रेनेज वरील झाकणाची दुरुस्ती कधी होणार?

दहिसर पूर्व भागात आनंद नगर येथील उड्डाण पूला जवळ बीएमसीने सर्विस रोडच्या मधोमध पावसाळ्याचे पाणी निकामी करण्या साठी स्ट्रॉम वॉटर ड्रेन बनवून नाल्यांना जोडले आहे. गेल्या एक महिन्या पासून तेथील त्रिमूर्ति बिल्डिंग ते आकृती बिल्डिंग च्या मुख्य सर्विस रोडवर थोडे - थोडे अंतराने बनवण्यात आलेल्या स्ट्रॉम वॉटर ड्रेन गटारांची सहा चेंबरच्या झाकणाची आडवे - उभ्या लोखंडी पट्टीचे( ग्रिल ) तुटून निघून गेले आहे, ज्यामुळे ये - जा करणारे मोठ्या बस, ट्रक ,टँकर सारख्या वाहनांसाठी समस्या निर्माण झाली आहे. झाकणाच्या पट्टी निघालेल्या जागांवरून जाणारी स्कूटर व सायकल छोट्या दुचाकी वाहनचालकांना कधीही अपघात होऊ शकतो. गेल्या एक महिना पासून लोकांच्या समस्यांची तक्रार बृ. मु. म.पालिका आर उत्तर विभागीय अधिकाऱ्यांकडे केलेली असतानाही ती झाकणे अद्याप दुरुस्ती करण्यात आलेली नाही. अधिकारी दुर्लक्ष का करीत आहेत?.

**- राजेश पंड्या, सामाजिक कार्यकर्ते**

## सकाळी 8.24ची एसी लोकल राहणार सुरु

**भाईंदर :** भाईंदर रेल्वे स्थानकावरून सकाळी ८ वाजून २४ मिनिटांनी सुटणारी वातानुकुलीत लोकल कायम सुरू ठेवणार असल्याचे पश्चिम रेल्वेने स्पष्ट केले आहे. ही लोकल एसी ऐवजी सर्वधारण करावी यासाठी रेल्वे प्रवाशांनी आंदोलन केले होते. मात्र प्रवाशांना दिलासा देण्यासाठी भाईंदर स्थानकातून सकाळी ८ वाजता सुटणारी सर्वसाधारण लोकल ट्रेन १२ ऐवजी १५ डब्यांची केली जाणार आहे. भाईंदर रेल्वे स्थानकातून दररोज सकाळी ८ वाजून २४ मिनिटांनी चर्चगेटला जाणारी लोकल ट्रेन सुटत होती. मात्र नोव्हेंबर महिन्यात ही लोकल ट्रेन वातानुकूलीत (एसी) करण्यात आली. त्यामुळे प्रवाशांनी जोरदार विरोध केला होता. ही लोकल पुन्हा सुरू करावी यासाठी सह्यांची मोहीम घेण्यात आली. विविध राजकीय पक्षांनी यासाठी आंदोलने देखील केली होती. मात्र एसी लोकल रद्द करता येणार नसल्याचे पश्चिम रेल्वेचे अतिरिक्त व्यवस्थापक प्रकाश बुटणी यांनी सांगितले. याबाबत रेल्वने लेखी स्पष्टीकरण दिले आहे. दररोज सकाळी ७.५९ वाजता विरारवरून चर्चगेटला जाण्यासाठी एसी लोकल सुटते. मात्र त्यात गर्दी होत असल्याने भाईंदर, मिरा रोड, दहिसर स्थानकातील प्रवाशांना त्यात चढणे अवघड होत होते. त्यामुळे भाईंदरवरून एसी लोकलची आवश्यकता होती. भाईंदर स्थानकातून सकाळी ८ ते ८. ३० दरम्यान चर्चगेटच्या दिशेने जाण्यासाठी साधारण ९ गाड्या आहेत. त्यामुळे फक्त ८. २४ ची एक सर्वसाधारण लोकल वातानुकुलित करण्यात आली आहे.

## म ह त्त्वा चे

### 'कोल्डप्ले'साठी लहान मुलांना घेऊन जाण्यावर निर्बंध

**नवी मुंबई :** नवी मुंबईत प्रथमच जागतिक कीर्तीच्या 'कोल्डप्ले' या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १८ ते २१ जानेवारी दरम्यान होणाऱ्या या कार्यक्रमाला अनेक महत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित राहणार असून जागतिक कीर्तीच्या कलावंतांचा सहभाग या कार्यक्रमात असणार आहे. लहान मुलांना संगीत कार्यक्रमातील आवाजामुळे होणारा त्रास लक्षात घेता ही आयोजकांना अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे.'कोल्डप्ले' हा संगीत कार्यक्रम नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमानिमित्त मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. संगीत क्षेत्रासह अन्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला असणार आहे. कार्यक्रमा दिवशी स्टेडियमला येणारे कलावंत व महत्वांच्या व्यक्ती व प्रेक्षक यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव आणि वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना ये-जा करण्यास तसेच पार्किंग करण्यास मनाई आदेश देण्यात आले आहेत. कार्यक्रमात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विविध खबरदारी घेत असताना आता या संगीत कार्यक्रमाला लहान मुलांना घेऊन जाण्यावर निर्बंध लावण्यात आले आहे.

### गुळगुळीत जिन्याच्या पायऱ्यांवर प्रवाशांची घसरगुंडी

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील कल्याण डोंबिवली पालिकेच्या स्कायवॉकच्या जिन्याची एक मार्गिका उर्सेकरवाडीतील भाजी मंडईजवळ उतरते. या जिन्याच्या पायऱ्या आणि त्यावरील लोखंडी पट्ट्या गुळगुळीत आणि खिळखिळ्या झाल्या आहेत. या लोखंडी पट्ट्यांमध्ये प्रवाशांचे पाय, चपला अडकून प्रवासी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. पालिकेने या जिन्याची डागडुजी करण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. डोंबिवली रेल्वे स्थानकात उतरल्यानंतर किंवा रेल्वे स्थानकात जाण्यासाठी अनेक प्रवासी, नागरिक उर्सेकरवाडीतील भाजी मंडईजवळील जिन्याचा वापर करतात. या जिन्याच्या पायऱ्यांना आधार म्हणून लावलेल्या लोखंडी पट्ट्या सिमेंट काँक्रीट निघून गेल्याने खिळखिळ्या झाल्या आहेत. प्रवासी या जिन्यावरून उतरत असेल आणि त्याचे लक्ष पायऱ्यांकडे नसेल तर अनेक वेळा प्रवाशाचा पाय, चप्पल लोखंडी पट्टीत अडकतो. प्रवासी तोल जाऊन खालच्या दिशेने पडतो.

### पाणी चोरणाऱ्या सर्व्हिस सेंटर विरोधात गुन्हा

**भिवंडी :** भिवंडी महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बांधकाम वाढत आहे. बांधकाम ठिकाणांसह असंख्य हॉटेल्स खानावळ यांच्याकडून अनधिकृत नळजोडणी करून पाणीचोरी केली जात आहे. अशाच प्रकारे पाणीचोरी करणाऱ्या सर्व्हिस सेंटर चालकाविरोधात भिवंडी पालिकेच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील दूधबावडी नाका या परिसरात असलेल्या गोल्डन हॉटेल परिसरात आतिक खान यांचे सर्व्हिस सेंटर आहे. याप्रकरणी पालिकेच्या वतीने पाणीपुरवठा विभागातील विराज भोईर यांनी दिलेल्या तक्रारीवरून भोईवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कल्याणमधील बोरगावकरवाडी वाहनतळ पालिकेच्या ताब्यात

### सव्वाकोटीचे भाडे थकविले

प्रतिनिधी
■ कल्याण

काल सायं. महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांचे निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे व मालमत्ता विभागाचे उपआयुक्त रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता विभागाचे अधिक्षक जयराम शिंदे व लिपिक प्रशांत धिवर, प्रविण घिगे व इतर कर्मचारी वर्गाने कल्याण रेल्वे स्थानकाजवळील बोरगांवकर वाडी वाहनतळ संबंधित ठेकेदाराकडील रु. 1,28,02,440/- इतक्या रक्कमेच्या थकबाकी पोटी महापालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही केली. बोरगांवकर वाडी बांधिव वाहनतळ (पे ॲन्ड पार्क) या धरतीवर 3 वर्षाच्या कालावधीकरीता, भाडेतत्वावर चालविण्यासाठी मे.श्री.समर्थ



एंटरप्रायझेस यांस दि. 16/11/2023 रोजीच्या कार्यादेशान्वये देण्यात आले होते. सदर वाहनतळ पे ॲन्ड पार्क तत्वावर सुरु करण्यापूर्वी संबंधित ठेकेदाराने पहिल्या 3 महिन्याचे भाडे रु. 59,20,976/- इतकी रक्कम महापालिका फंडात भरणा केली होती.

तद्नंतर सदर परिचालक हे करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे महापालिकेचे भाडे नियमित भरणा करीत नसल्यामुळे, त्यांस बोरगांवकर वाडी वाहनतळाचे भाडे भरण्यासाठी नोटीसा बजाऊन देखील, संबंधित ठेकेदाराने भाडे रक्कम महापालिकेत भरणा केली नाही.

महापालिकेच्या मालमत्ता विभागाने दि. 29 ऑगस्ट 2024 रोजी दुपारी प्रत्यक्ष वाहनतळाची पाहणी केली असता, बेसमेंटमधील पार्कींगसाठी वापर सुरु असल्याचे, त्याचप्रमाणे पार्कींग शुल्क आकारणी करीत असल्याचे निदर्शनास आले होते. यामध्ये सुमारे 1000 दुचाकी वाहने पार्कींग केल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर ठिकाणी पार्कींग होत नसल्याची सबब पुढे करुन संबंधित ठेकेदार वाहनतळाचे भाडे भरणा करण्यास टाळाटाळ करुन, महापालिकेचे आर्थिक नुकसान करीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे बोरगांवकर वाडी वाहनतळावर पे ॲन्ड पार्क धरतीवर चालविणेबाबतचा मे.श्री.समर्थ एंटरप्रायझेस यांचे सोबतचा करारनामा संपुष्ठात आणून, निविदाकाराने महापालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत, इसारा रक्कम जप्त करणेबाबत आदेश मालमत्ता विभागाचे उपआयुक्त रमेश मिसाळ यांनी निर्गमित केले आहे.

संबंधित मे.श्री.समर्थ एंटरप्रायझेस यांस काळ्या यादीत टाकण्यात येत असून, त्यांस अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे व्यवसाय करण्यास मनाई करण्यात येत आहे.

## गणपत गायकवाड गोळीबार प्रकरणातील फरार असलेल्या सहाव्या आरोपीला अटक

### वैभव गायकवाड अद्यापही फरार

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याणमधील शिवसेना नेते महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार प्रकरणात माजी आमदार गणपत गायकवाड यांना अटक झाली होती. परंतु या प्रकरणात इतर आरोपी काही वर्षापासून फरार आहेत. आता गोळीबार प्रकरणात फरार असलेल्या साहाव्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. नागेश बडेराव या आरोपीला कल्याण क्राईम ब्रँचने नाशिकमधून अटक केली आहे.

उल्हासनगरमध्ये पोलीस स्टेशनमध्ये आमदार गणपत गायकवाड यांनी महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला होता. या प्रकरणात गणपत गायकवाड व इतर चार आरोपी आधीच जेलमध्ये आहे. परंतु गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव गायकवाड व आणखी एक आरोपी



अद्याप फरार आहे. 2 फेब्रुवारी 2024 रोजी उल्हासनगर पोलिस ठाण्यात महेश गायकवाड यांच्यावर आमदार गणपत गायकवाड यांनी गोळीबार केला होता. त्या घटनेनंतर एकच खळबळ उडाली होती. महेश गायकवाड यांची प्रकृती गंभीर होती. त्यांना रुग्णालयात दाखल केले होते. त्या घटनेतून ते बचावले. या प्रकरणात गणपत गायकवाड आणि इतर चार आरोपींना अटक झाली आहे. परंतु गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव गायकवाड अजूनही फरार आहे. या प्रकरणात फरार असलेला नागेश बडेराव याला गुरुवारी अटक झाली.

दोन दिवसांपूर्वी महेश गायकवाड यांनी पत्रकार परिषद घेतली होती. त्यात त्यांनी वैभव गायकवाड याच्यावर अनेक आरोप केले होते. वैभव गायकवाड हा भाजपचा पदाधिकारी आहे. त्यामुळे पोलीस राजकीय दबावात काम करत आहेत. ज्या पोलिसांनी वैभव गायकवाड त्याला पकडले, त्यांना २५ हजारांचा पुरस्कार देण्याची घोषणा महेश गायकवाड यांनी केली होती. आरोपी आमदार महेश गायकवाड तळोजा कारागृहात आहे. परंतु ते अनेकवेळा पनवेल येथील फार्म हाऊसवर येतात, असा आरोप महेश गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत केला होता. त्या आमदाराचे नाव मात्र महेश गायकवाड यांनी सांगितले नव्हते.

## दासगावमधील सरपंचांवर बडतर्फीची कारवाई

### कामातील हलगर्जीपणाचा ठेवला ठपका

प्रतिनिधी
■ महाड

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यामधील प्रसिद्ध अशा दासगाव ग्रामपंचायत सरपंच तपस्या महेंद्र जंगम यांच्यावर ग्रामपंचायत सदस्य विराज वसंत दळवी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांनी सरपंच पदावरून काढून टाकण्याचा आदेश बजावला आहे.

दासगाव ग्रामपंचायत सदस्य विराज वसंत दळवी यांनी ग्रामपंचायतीचे कामकाज करताना कर्तव्यामध्ये कसूर करत ग्रामपंचायत नियमांचा भंग केल्याची तक्रार कोकण विभागीय आयुक्तांकडे दाखल केली होती. याप्रकरणी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालावरून निर्णय देण्यात आला आहे.

सरपंच तपस्या महेंद्र जंगम यांना प्राथमिक शाळा गृहाच्या दुरुस्तीचे बिल पंचायत समितीकडून ग्रामपंचायतच्या खात्यात जमा झालेले दिसून येते परंतु सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी सदर रक्कम संबंधित ठेकेदार यांना आदा न करता इतर बाबींवर खर्च केलेली दिसली.

## खासगी शिकवणी चालिकेच्या भावाचा बालिकेवर लैंगिक अत्याचार

प्रतिनिधी
■ डोंबिवली

डोंबिवली जवळील एका गावात एका खासगी शिकवणी चालिकेच्या भावाने शिकवणी वर्गासाठी येत असलेल्या एका आठ वर्षाच्या बालिकेवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीला आला आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार कायद्याने तात्काळ गुन्हा दाखल केला. संबंधित इसमाला पोलिसांनी अटक केली आहे. त्याला कल्याण जिल्हा व न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक राम चोपडे यांनी दिली.

वैभव जितेंद्र सिंग (१९) असे अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. बालिका आपल्या कुटुंबीयांसह राहते. नेहमीप्रमाणे बालिका आपल्या घर परिसरात असलेल्या खासगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षिकेच्या घरी गेली होती. संध्याकाळच्या वेळेत हे शिकवणी वर्ग घेतले जातात. बुधवारी बालिका शिक्षकेच्या घरी गेल्यावर तेथे खासगी शिकवणी चालिका नव्हत्या. त्या बाहेर गेल्या होत्या. त्यांचा भाऊ वैभव घरी होता.

घरात कोणी नाही पाहून वैभव यांनी बालिकेचा हात पकडून तिला शयनगृहात नेले. तेथे तिच्या मनाविरुध्द जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. बालिकेने त्यास प्रतिकार केला. पण वैभवने तिचे ऐकले नाही. घडल्या प्रकाराने बालिका घाबरली होती. हा प्रकार कोणाला न सांगण्याची तंबी वैभवने बालिकेला दिली.बालिका घरी आल्यावर तिने खासगी शिकवणी वर्गात घडलेला प्रकार आपल्या आईला सांगितला. हा प्रकार ऐकून पालक हादरले. त्यांनी तातडीने मानपाडा पोलीस ठाण्यात वैभव सिंग विरुध्द तक्रार केली.पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याने गुन्हा दाखल करून घेतला. तातडीने वैभवला त्याच्या राहत्या घरातून अटक केली. त्याला गुरुवारी कल्याण न्यायालयात हजर करण्यात आले.

## प्राजक्ताला रेल्वेकडून 8 लाखांची भरपाई

■ कल्याण



कल्याणच्या प्राजक्ता गुप्ते लोकलमध्ये दरवाजात उभ्या होत्या. त्यांच्या हातामध्ये पर्स आणि मोबाईल होता. सिग्नल नसल्याने पत्रीपुलाजवळ लोकली थांबली. रेल्वे मार्गालगत घुटमळत असलेल्या चोरट्याने लोकलच्या दारात उभ्या असलेल्या प्राजक्ता यांच्या हातामधून मोबाईल, पर्स हिसकावून पळ काढला. रेल्वे मार्गातून चोरट्याचा पाठलाग सुरू केला. त्यावेळी सीएसएमटीकडे जाणारी लोकल त्यांच्या लक्षात न आल्याने लोकलची धडक बसून प्राजक्ता यांचा जागीच मृत्यू झाला होता.

सीएसएमटी येथील रेल्वे न्यायाधीकरण न्यायालयात गुप्ते कुटुंबीयांनी नुकसान भरपाईचा दावा दाखल केला होता. या दाव्यात रेल्वे न्यायालयाने सुरुवातीला चार लाख भरपाई मंजूर केली होती. रेल्वेच्या नवीन कायद्याप्रमाणे न्यायालयाने प्राजक्ताच्या कुटुंबीयांना आठ लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश प्रशासनाला दिले. आठ लाख रुपयांची रक्कम सुरुवातीला ७२ महिने बँकेत ठेवली जाणार आहे.

प्राजक्ता यांनी स्वताहून जीव धोक्यात घालून रेल्वे मार्गात उडी मारली होती. या अपघाताला रेल्वे प्रशासन जबाबदार नाही, असे युक्तिवाद रेल्वेकडून करण्यात आले. दावेदाराचे वकील ॲड. रिहाल काझी यांनी रेल्वे मार्गांच्या आसपास चोरटे फिरत असतात. तेथे गस्त नसते. पोलिसांची निष्क्रियता अशा घटनांना कारणीभूत आहे. असे मुद्दे उपस्थित केले होते.

## अस्वच्छतेच्या मुद्यावर रायगड शिव आरोग्य सेनेची अलिबाग शासकीय रुग्णालयाला धडक

प्रतिनिधी
■ अलिबाग

अलिबाग शासकीय रुग्णालयामधील स्वच्छतागृह अस्वच्छता आणि त्यामुळे निर्माण झालेल्या शेवाळवरून घसरून दोन महिला जखमी होऊन पाय फ्रॅक्चर झाल्याचे समजले त्यावरून शिव आरोग्य सेनेचे कार्याध्यक्ष डॉ किशोर ठाणेकर, उपाध्यक्ष डॉ जयवंत गाडे, महाराष्ट्र राज्य समन्वयक जितेंद्र दगडू(दादा) सकपाळ यांच्या सूचनेनुसार आणि रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ परेश चंद्रकांत देशमुख यांच्या उपस्थितीत शिव आरोग्य सेना रायगड अलिबागच्या पदाधिकाऱ्यांनी अलिबाग शासकीय रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ मेश्राम ह्यांना निवेदन देऊन रुग्णालयातील अस्वच्छतेबाबत




जाब विचारला.

त्यावेळी रुग्णालयात पुरेशे पाणी नसल्याचेही कळाले, त्याबाबतही विचारणा करून लवकरात लवकर सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत पावले उचलावीत तसेच वेळोवेळी स्वच्छतागृह अस्वच्छतेबाबत निदर्शनास आणून देखील रुग्णालयीन प्रशासन दुर्लक्ष करीत आहे,वेळ पडली तर सहकार्याची भूमिका घेऊ पण जाणून बुजून जर मूलभूत प्राथमिक गरजेबाबत रुग्णालय प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास जनआंदोलनही उभारू, तशी वेळ आणून द्यायची नसेल तर लवकरात लवकर स्वच्छतेबाबत उपाय योजना राबवावेत आणि संबंधितांवर कार्यवाही करावी असे शिव आरोग्य सेनेतर्फे इशारा वजा विनंती करण्यात आली, त्याला सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच त्याबाबत उपाययोजना राबवल्या जातील असे आश्वासन रुग्णालयतर्फे देण्यात आले.

## तरुणांनी उद्योग व्यवसायाकडे वळणे गरजेचे - दिक्षा सोनावणे

प्रतिनिधी
■ बदलापूर

नवीन तंत्रज्ञान व यंत्र आधुनिकीकरण मुळे जागतिक स्तरावर नोकऱ्यांचे प्रमाण कमी होत आहे. तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता नवनवीन व्यवसाय,उद्योगाच्या नवीन संधी शोधणे गरजेचे आहे असे आदर्श सिद्धांत वेल्फेअर फाउंडेशनच्या संचालिका दिक्षा शैलेश सोनावणे यांनी बदलापूर येथील कॅफे शॉपच्या उद्घाटन सोहळा प्रसंगी तरुणांना आवाहन केले आहे. बदलापूर पश्चिम माजर्ली येथे द स्पाइस जंक्शन ०१ कॅफेचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष राजन घोरपडे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास समाजसेवक तेजस म्हसकर,योगेश म्हसकर,प्रदीपकुमार



दुबे,प्रियांशू दुबे, ऋषिका दुबे,आदित्य दुबे,आर्यन सिंह,धैर्य सिंह, संतोषकुमार शुक्ला,विवेक शुक्ला,वामिका शुक्ला,विपीन रॉय आदी सामाजिक कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय मोरे, यांनी कार्यक्रमास हजेरी लावली. कॅफे शॉपचे मालक शिवम शुक्ला यांनी पुढील चार दिवस भरपूर ऑफर्स असल्याची माहिती दिली नागरिकांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

## 'उड्डाण' वार्षिक स्नेहसंमेलनात प्रितम म्हात्रेंची उपस्थिती

प्रतिनिधी
■ पनवेल

जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या हिमांशू दिलीप पाटील इंग्रजी माध्यमिक शाळेच्या "उड्डाण" या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून शेकापचे पनवेल महानगरपालिका माजी विरोधी पक्षनेते प्रीतम जे एम म्हात्रे यांनी भेट दिली.

यावेळी त्यांच्या सोबत शाळा कमिटी चेअरमन दिलीपशेठ पाटील,




शाळेच्या मुख्यधापिका निशा पोलेकर, संजय सांगळे उपस्थित होते.

यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक महोत्सवात विविध कलाकृती सादर केल्या. आज ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेत आपल्या विद्यार्थ्यांकडून कलेचा वारसा जोपासला जात आहे हे पाहून शाळा देत असलेल्या शिक्षण सेवेबाबत समाधान वाटले.

## फुलांच्या वाहतुकीआड गांजाची तस्करी, चौघांना अटक

### पाच दिवसांची पोलीस कोठडी

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाण्याच्या चितळसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पीसीआर मोबाईल व्हॅनवरील गस्तीच्या पोलिसांना संशयास्पद दोन व्यक्ती आणि एक कार आढळले. कार चालकाची चौकशी केल्यानंतर सदर कारमध्ये अंमली पदार्थ गांजा आढळून आला. यावेळी संशयास्पद वावरणारे दोघेजण पळून केले. पळालेल्या आरोपी मुन्ना पांडे याच्या मालकीची आहे. तर या गांजा प्रकरणात पोलिसांनी चौघांना अटक करीत कारसह ८ लाखाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले. त्याच्या विरोधात चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून त्यांना न्यायालयात नेले असता पाच दिवसाची पोलीस कोठडी न्यायालयाने ठोठावली.

अटक आरोपी रोहीतकुमार विजयकुमार पटेल (२४ रा, लोकमान्यनगर), सिध्देश दत्तात्रय शिंदे (३५), सुदर्शन सखाराम वाणी (२६), राजेश प्रभाकर लोखंडे (२९) तिघे रा. मुपो गोळेगाव, ता. जुन्नर जि. पुणे यांचा समावेश आहे. घटनेच्या दिवशी १० जानेवारी, २०२५ रोजी ते ११ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारापर्यंत ठाणे पोलिसांची पीसीआर मोबाईल गस्तीवर असताना पहाटे ५ वाजता गस्ती पथक व्हॅन ही पोखरण रोड क्रं २ वरील सुभाषनगर येथे एक पांढऱ्या रंगाची मारुती कंपनीची मोटारकार संशियास्पद दिसुन आली. कारचे बाजुला फुटपाथवर २ इसम दिसुन आले.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा शुभारंभ कार्यक्रमात पालिका कर्मचाऱ्यांनी घेतले कार्यालयीन सुलेखनाचे धडे

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार 14 ते 28 जानेवारी 2025 या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचे उत्साही आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये मराठी भाषेची समृध्द परंपरा सांगणारे विविध कार्यक्रम आयोजनासोबतच महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रतिभागुणांना वाव देणारे विविध साहित्यिक स्पर्धात्मक उपक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.

यामध्ये आज पहिले




व्याख्यानपुष्प गुंफताना शासकीय कामकाजात सुयोग्य मराठी भाषेचा वापर या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे सेवानिवृत्त उपसचिव वसंत चौधरी यांचे 'कार्यालयीन टिप्पणी व मराठी सुलेखन' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. यामध्ये त्यांनी अत्यंत सोप्या पध्दतीने फाईल अर्थात नस्तीचे स्वरुप, प्रशासनिक लेखन, टिप्पणीलेखन, पत्रलेखन, कार्यालयीन कागदपत्रे मांडणीची सहा गठ्ठे पध्दती तसेच अभिलेखाचे वर्गीकरण अशा महत्वपूर्ण विषयांवर सविस्तर माहिती दिली.

यामध्ये त्यांनी शासनाकडील पत्रव्यवहाराचे निरनिराळे प्रकार सांगत त्यावरील सुयोग्य कार्यवाहीविषयी विवेचन केले. परिपूर्ण नस्ती कशी असावी हे सांगताना त्यांनी टिप्पणी व पत्रलेखनाच्या तांत्रिक बाजूंविषयी सविस्तर भाष्य केले तसेच पत्राचा मसुदा कसा असावा याविषयीही मार्गदर्शन केले. शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या पध्दतीविषयी वसंत चौधरी यांच्यासारख्या शासनातील कायदेविषयक अनुभवसंपन्न व्यक्तिमत्वाच्या मार्गदर्शनाचा लाभ मराठी भाषा पंधरवडयाच्या निमित्ताने नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारीवृंदाला होत असल्याचा आनंद व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आजच्या प्रशिक्षणाचा उपयोग महानगरपालिकेच्या अंतर्गत कार्यालयीन लेखन व कामकाजातील सुधारणांसाठी होईल असा विश्वास व्यक्त केला.

## कोपरखैरणे विभाग कार्यालयात अचानक भेट देत आयुक्त शिंदेंनी केली पाहणी

### लोकाभिमुख कार्यप्रणाली राबविण्याचे दिले आदेश

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबईकर नागरिकांची महानगरपालिकेशी संबंधित सर्व कामे सुलभ व सोप्या पध्दतीने विनासायास व्हावीत याकडे आयुक्त डॉ.कैलास शिंदे विशेष लक्ष देत असून त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासकीय कामकाजाला गती देण्यावर भर दिला जात आहे.

यामध्ये 'शून्य प्रलंबितता' अर्थात 'झिरो पेन्डसी' हे सूत्र प्रमाण मानून त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

या अनुषंगाने प्रत्येक विभागामध्ये उपलब्ध असलेल्या नस्ती, कागदपत्रे



यांचे डिजीटलायझेशन करण्याचे सूचित करण्यात आले असून कार्यालयांतील उपलब्ध अभिलेखाचे पुनर्विलोकन करणे तसेच शासकीय नियमानुसार अ, ब, क, ड कागदपत्रे स्वरूपात वर्गीकरण करणे याबाबत मोहीम राबविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यासोबतच विहित कालावधीनंतर नष्ट करावयाची कागदपत्रे यांचे निर्लेखन करून ते नियमानुसार नष्ट करण्याची कार्यवाही करावी तसेच जतन करून ठेवावयाचा अभिलेख वर्गवारीनुसार स्वतंत्ररित्या जतन करण्यासाठी मध्यवर्ती अभिलेख कक्षात पाठविण्याची कार्यवाही करण्याचीही प्रक्रिया जलद पूर्ण करून घेण्याचे निर्देशित करण्यात आलेले आहे.

## अजिंठा वेरूळ चित्रपट महोत्सवात सई परंजपेंना 'पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार'

**संभाजीनगर :** अजिंठा - वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील उद्घाटन सोहळ्यात 'कालिया मर्दन' या चित्रपटानं 105 वर्षांनी पुन्हा प्रेक्षकांना भुरळ घातली. मोहत्सवाच्या पहिल्या दिवशी आगळ्या वेगळ्या पद्धतीने चित्रपट दाखवण्यात आला. यावेळी पहिल्या मुक चित्रपटाला लाईव्ह संगीत देण्यात आले. तर 'पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ दिग्दर्शिका सई परांजपे यांना देण्यात आला. यावेळी कुठलेही व्यावसायिक शिक्षण न घेता मला अनुभवातून इतका मोठा पल्ला गाठता आला याचा आनंद आहे. उशिरा का होईना माझा सन्मान झाला याबद्दल समाधान असल्याचं, त्यांनी यावेळी सांगितलं. तर अजिंठा लेणी अनेक चित्रपटांचे उगमस्थान असल्याचं मत दिग्दर्शक आशितोष गोवारीकर यांनी व्यक्त केलं. भारतीय चित्रपटाचे जनक दादासाहेब फाळके यांनी तयार केलेल्या 'कालिया मर्दन' या पहिल्या मुक चित्रपटाने तब्बल 105 वर्षांनी पुन्हा एकदा प्रेक्षकांची मनं जिंकली. शंभर वर्षांपूर्वीचा मुकपट प्रत्यक्ष संगीताद्वारे रसिकांना अनुभवता यावा म्हणून 'कालिया मर्दन' हा मुकपट कोलकाता येथील 'सतब्दीर सब्द' या वाद्यवृंद समूहातर्फे सादरीकरणाद्वारे दाखवला गेला.




### महत्त्वाचे

## पुण्यात 23 लाखांचे अमली पदार्थ जप्त

**पुणे :** पुणे शहरात पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात ड्रग्सचा साठा सापडलाय. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने कारवाई करत एमडी ड्रग्सचा साठा जप्त केलाय. या ड्रग्सची किंमत २३ लाख रुपये असून याप्रकरणात अहमद खान नावाच्या व्यक्तीला अटक करण्यात आलीय. अहमद खान कोणत्या ड्रग्स रॅकेटचा भाग आहे का? याबाबत पोलीस चौकशी करण्यात येत आहे. दरम्यान पुणे शहरात याआधीही ड्रग्स सापडले होते. आता परत शहरात ड्रग्स सापडल्याने खळबळ उडालीय. गुन्हे शाखेने अहमद खानकडून ११० ग्रॅम वजनाचा MD ड्रग्सचा साठा जप्त केलाय. अटक करण्यात आलेल्या अहमद खान हा येरवडा भागातील राहणार आहे. त्याचा कोणत्या रॅकेटशी संबंधित आहे का याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. ड्रग्स माफिया ललित पाटीलमुळे पुणे शहर चर्चेत आले होते. ललित पाटील पुण्यातील ससून रुग्णालयातून ड्रग्ज रॅकेट चालवत होता. ललित पाटील ससून रुग्णालयात आजारपणाचं कारण देत ड्रग्स रॅकेट चालवत होता. त्यावेळी ससून रुग्णालयातील गेटवर २ कोटी १४ लाखांचे ड्रग्स सापडले होते, त्यानंतर पुण्यातील ड्रग्स रॅकेट उघडकीस आले होते.

## 72 हजार व्यापाऱ्यांना एलबीटी अंतर्गत नोटिसा

**पिंपरी :** स्थानिक संस्था कर (एलबीटी) लागू असताना नोंदणीकृत व्यापारी, उद्योजक यांनी एलबीटी योग्य प्रकारे भरला आहे की नाही, हे तपासण्यासाठी महापालिकेने गेल्या चार वर्षांत ७२ हजार उद्योजक, व्यापाऱ्यांना नोटिसा बजावल्या आहेत. एलबीटी बंद होऊनही व्यापाऱ्यांच्या मागील नोटिशींचे शुक्लकाष्ट सुरूच आहे. एलबीटीची आकारणी ३० जून २०१५ पासून बंद झाली. मात्र, सन २०१३ मध्ये नोंदणी केलेल्या ज्या उद्योजक, व्यापाऱ्यांनी एलबीटीची रक्कम भरली आहे. त्यांच्या कागदपत्रांची तपासणी केली जात आहे. त्यांनी भरलेली रक्कम योग्य आहे की नाही, हे तपासण्यात येत आहे. त्यासाठी सन २०२० पासून व्यापारी, उद्योजकांना नोटिसा दिल्या जात आहेत.

## डोक्यात गोळी झाडून पोलिसाची आत्महत्या

**गोंदिया :** अर्जुनी मोरगाव तालुक्यातील धाबेपवनी एओपी येथे कार्यरत असलेल्या एका पोलिस हवालदाराने स्वत:च्या डोक्यात बंदुकीने गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी (दि.१६) दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली. जयराम पोरेटी (४८) असे गोळी झाडून आत्महत्या करणाऱ्या पोलिस हवालदाराचे नाव आहे. जयराम कोरेटी हे देवरी तालुक्यातील मिसपिरी येथील रहिवासी आहेत. ते २००१ च्या बॅच मध्ये पोलिस खात्यात नोकरीला लागले. सुरुवातीला बराच काळ त्यांनी सी ६० येथे नोकरी केली. त्यानंतर त्यांची बदली नवेगावबांध पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या धाबेपवनी एओपीमध्ये झाली होती. पण काही दिवसांपूर्वीच त्यांची पोलिस विभागाद्वारे तिरोडा येथे बदली झाली होती. अद्याप ते बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नव्हते. धाबेपवनी एओपी येथून तिरोडा येथे बदली झाल्याने ते काही दिवसांपासून तणावात असल्याची माहिती आहे.

# मुंबईत 18 व 19 रोजी होणार पहिले अखिल भारतीय भजन संमेलन

### नामांकित गायक, वादकांच्या कलाविष्कारासह परिसंवादाचे विशेष आयोजन

प्रतिनिधी
■ मुंबई

अखिल भजन सांप्रदाय हितवर्धक मंडळ (रजि.) महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने प्रथमच देश पातळीवरील अखिल भारतीय भजन संमेलन २०२५ चे आयोजन शनिवार १८ व रविवार १९ जानेवारी २०२५ रोजी दादर माटुंगा कल्चरल सेंटर(DMCC), यशवंत नाट्यगृह शेजारी,माटुंगा (प.), मुंबई येथे करण्यात आले आहे.

या पहिल्या भजन संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अशिष शेलार हे करणार असून या भजन संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध भजनकार आणि अखिल भजन सांप्रदाय हितवर्धक मंडळ अध्यक्ष बुवा भगवान लोकरे तर संमेलनाध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे हे आहेत.

शनिवार, १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ८.०० वाजता भजन दिंडी शोभायात्रा स्वर्गीय कोकण कला भूषण भजन सम्राट चंद्रकांत कदम बुवा यांच्या निवास स्थानापासून स्वर्गीय भजन रत्न भजनकार विलास पाटील बुवा व स्व. संगीतकार/ भजनकार बुवा स्नेहल भाटकर यांचे निवासस्थान आणि संमेलन स्थळापर्यंत सर्वोदय कॉलनी, पोर्तुगीझ चर्च जवळ, दादर (प) येथे निघणार आहे. सकाळी ९.३० वाजता स्वागत / उद्घाटन समारंभ आणि प्रकाशन सोहळा संपन्न होईल. या प्रकाशन सोहळ्यात लोककला अभ्यासक प्राध्यापक वैभव खानोलकर, सिंधुदुर्ग यांचे दशावतार लोककलेचे सर्वांगीण शोध घेणारे संशोधनात्मक पुस्तक एक समृद्ध लोककला दशावतार मुखपृष्ठ प्रकाशन होणार आहे. या सोहळ्यात जेष्ठ मालवणी कवी दादा मडकईकर हे सुद्धा सहभागी होणार आहेत. तर सकाळी ११.०० वाजता भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

दुपारी ०२.०० वाजता अखिल भारतीय भजन संस्कृती परिसंवाद होणार आहे. या परिसंवादात श्री. वल्लभभाई सावलीया (भजन अभ्यासक कीर्तनकार, गुजरात), अनंतम लोकनाथ (भजन अभ्यासक कीर्तनकार, तामिळनाडू राज्य), प्रशांत धोंड (प्राचार्य भजन अभ्यासक कीर्तनकार, महाराष्ट्र), लोकेश चतुर्वेदी (भजन अभ्यासक, मथुरा उत्तरप्रदेश), सुसंवाद : रिद्धी म्हात्रे (वृत्तनिवेदिका) हे सहभागी होणार आहेत. दुपारी ४.०० वाजता रेल्वे प्रवासी भजनी मंडळातील प्रसिद्ध भजन गायक अविनाश आंग्रे व भजन गायिका सानिका कणसे यांचे गायन व चर्चा होणार असून याचे निवेदन पत्रकार मनश्री पाठक या करणार आहेत. संध्याकाळी ६.०० वाजता परिसंवाद ध्वनी योजना आणि ध्वनी संयोजन याचे आयोजन करण्यात आले असून यात अनंत बाईत (ज्येष्ठ ध्वनी संयोजक) व श्रीकृष्ण सावंत (ज्येष्ठ ध्वनिमुद्रक) सहभागी होणार आहेत. निवेदन प्रा. वैभव खानोलकर हे करणार आहेत.

# 'आका' दर महिन्याला ठराविक लोकांना पैसे द्यायचा!

### आमदार सुरेश धस यांचा दावा

प्रतिनिधी
■ बीड

संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचे असलेले वाल्मीक कराड यांच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. तसेच राष्ट्रवादी पक्षात देखील आता दबाव वाढला असल्याचे दिसून येत आहे. यावर भाजप आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आकाचा बाका दर महिन्याला ठराविक लोकांना पैसे वाटायचा

आमदार सुरेश धस म्हणाले, आका जो आहे हा सोपा आका नाही. हा 17-17 मोबाईल वापरत होता. आता तुम्ही नावीन्यपूर्ण योजना सांगितली की अमेरिकेतून धमकी देत होता, तेही करत असेल. आका काय काय नाही करू शकत? आकाचा



बाका दर महिन्याला ठराविक लोकांना काहीतरी ठराविक रक्कम पाठवत होता. ठराविक शब्द वापरतो मी, ठराविक लोकांना आता तुमचे तुम्ही समजून जा.

आमदार सुरेश धस म्हणाले, राष्ट्रवादी कॉंग्रेसवर दबाव वाढला आहे की कमी झाला आहे की दबावच नाही हे मी कसे सांगणार? मी भाजपचा माणूस आहे. परंतु त्यांनी जो काही विचार करायचा आहे तो त्यांनी करावा. राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, प्रफुल्ल पटेल आहेत, भुजबळ साहेब आहेत, तटकरे साहेब आहेत या वरिष्ठ नेते मंडळी जे आहेत आहेत त्यांनी काय तो निर्णय करावा, अशी प्रतिक्रिया आमदार सुरेश धस यांनी दिली आहे.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर प्रश्न विचारला असता आमदार सुरेश धस म्हणाले, माझ्या सारख्या पामराने राष्ट्रवादीतल्या अंतर्गत प्रश्नाच्या बाबतीत काय बोलावे. पुढे बोलताना धस म्हणाले, एखादी जरी त्रुटी पोलिसांकडून राहिली तर न्यायालयीन चौकशीमध्ये कसल्याही प्रकारची त्रुटी राहू शकत नाही.

# काळा किल्ला आगारातील कंत्राटी चालकांचा संप, प्रवाशांचे हाल

■ मुंबई

बेस्टमध्ये कंत्राटी बसवर काम करणाऱ्या कामगारांकडून दररोज होणाऱ्या संपामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत.त्यांच्या समस्या वाढत आहेत. सध्या बेस्टमध्ये प्रवाशांची दुर्दशा आणि समस्या ऐकून घेणारे कोणीही वरिष्ठ अधिकारी नाही. पूर्ण वेळ सनदी अधिकारी नाही. त्यामुळे बेस्ट मध्ये उद्भवलेल्या समस्या सुटल्या जात नाहीत. अशी परिस्थिती आहे.

काल धारावीतील काळा किल्ला बस आगारामध्ये पगार न मिळाल्याने गुरुवारी दुपारपासून ओलेक्ट्रा बस कंपनीचे ६० हून अधिक कंत्राटी चालक संपावर गेले. या बसेस काळा किल्ला बस आगारातून वेगवेगळ्या मार्गांवर बस धावतात. इतक्या बसेस बंद पडल्यामुळे प्रवाशांना अडचणी येत होत्या. चालकांचे म्हणणे आहे की, आमचे पगार त्यांच्या खात्यात जमा होईपर्यंत आमचा संप सुरूच राहील. दोन दिवसांपूर्वी प्रतीक्षा नगर आणि धारावी डेपोच्या ११० बसेस सकाळपासून दुपारपर्यंत रस्त्यावर आल्या नव्हत्या. आता धारावी काळा किल्ला आगरातून येणाऱ्या बसेसही रस्त्यावर आल्या नव्हत्या. गेल्या पाच वर्षांपासून बेस्टची स्थिती खालावत चालली आहे. दररोज ३५ लाख प्रवासी बेस्ट बसेसमधून प्रवास करतात. संपामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. बेस्टला महसुलाचे नुकसान होते. बेस्टच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले की, ऑलेक्ट्रा कंपनीला चालकांच्या खात्यात लवकरात लवकर पगार जमा करून बसेसचे कामकाज सुरू करण्यास सांगण्यात आले आहे.

# एस.टी.बस दुचाकी अपघातात 3 ठार

### जेजुरी- बेलसर फाटा उड्डाण पुलाजवळची घटना

प्रतिनिधी
■ जेजुरी

आळंदी पंढरपूर पालखी महामार्गावर बेलसर फाटा जवळ एस. टी. बस व दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकी वरील तिघे जण जागीच ठार झाल्याचे समजत आहे. या अपघातात रमेश किसन मेमाणे ( वय 60),संतोष दत्तात्रय मेमाणे (वय 40) व पांडुरंग दामोदर मेमाणे (वय 65) हे तिघे जण बोरमाळ वस्ती ,पारगाव मेमाणे ,ता पुरंदर जि पुणे येथील रहिवाशी आहेत.

या बाबत माहिती अशी की सासवड जेजुरी रस्त्यावर



बेलसर फाटा दरम्यान उड्डाण पुलाचे काम सुरू आहे. दुचाकीवर असणारे तिघे जण रस्ता क्रॉस करून जात असताना एस टी बस व या दुचाकीचा अपघात झाला. ही घटना दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास घडली.

एस टी चालकाने गाडीचा वेग कमी करून बस रस्त्याच्या खाली घेण्याचा प्रयत्न केला मात्र दुचाकी गाडी बस खाली गेल्याने दुचाकीला फरफट नेले. या अपघातात दुचाकी वरील तिघेजण जागीच ठार झाले. तिघांना जेजुरीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिघांचा जागीच मृत्यू झाला होता. एकाच वस्तीवरील तिघांचा या अपघातात मृत्यू झाल्याने पारगाव मेमाणे गावावर शोककळा पसरली आहे.

# दिग्विजय मिल्स चाळीचा काही भाग ढासळण्याच्या मार्गावर

### इमारतीतील रहिवाश्यांमध्ये भीतीचे वातावरण ; पुनर्विकासाची प्रतीक्षा

प्रतिनिधी
■ मुंबई

काळाचौकी येथील दत्ताराम लाड मार्गावर असलेल्या दिग्विजय मिल्स चाळीची अवस्था दयनीय असून इमारतीचा काही भाग कोसळत असल्याने येथील रहिवासी भीतीच्या छायेत राहत आहेत. एनटीसी अंतर्गत येणाऱ्या या चाळीचा केंद्र व राज्य सरकारने समन्वयातून मार्ग काढून लवकरात लवकर पुनर्विकास करावा, अशी मागणी येथील रहिवाशांनी केली आहे.

दिग्विजय मिल्स चाळ ही सुमारे १३० वर्ष जुनी आहे. तीन मजल्याची ही इमारत असून १२० रहिवासी वास्तव्याला आहेत. अनेकदा या इमारतीची रिपेरिंग करण्यात आली. मात्र आता इमारतीचा काही भाग कोसळण्यास सुरुवात झाली आहे. तर काही रहिवाशांच्या घरातील जमीन खचलीय, तर काहींच्या घरात पाण्याची गळती लागली आहे. अशा परिस्थितीत येथील रहिवाशी आपले जीवन जगत आहेत. नुकतीच म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून या इमारतीची पाहणी करण्यात आली. यावेळी म्हाडा अधिकाऱ्यांनी तुमच्या इमारतीसाठी असलेला फंड संपला असून रहिवाशांनी वर्गणी काढून इमारतीची डागडुजी करावी, असे उत्तर दिल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. त्यामुळे एनटीसी अखत्यारीत असलेल्या या इमारतीचा केंद्र व राज्य सरकारने समन्वयातून मार्ग काढून आम्हाला पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करून द्यावा, अशी मागणीही येथील रहिवाशांनी केली आहे.

# पुण्याच्या सावंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे इलेक्ट्रिक, हायड्रोजन व्हेईकल्स चर्चासत्र

प्रतिनिधी
■ पुणे

जेएसपीएम भिवराबाई सावंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च महाविद्यालयात एआयसीटीई अटल प्रायोजित इलेक्ट्रिक व्हेईकल्स अँड हायड्रोजन फ्युएल सेल व्हेईकल्स हे सहा दिवसांचे चर्चासत्र दिनांक १३ जानेवारी पासून सुरू झाले असून १८ जानेवारीला संमेलनाचा समारोप होणार आहे.

या चर्चासत्राचा उद्देश शिक्षकांना, विद्यार्थ्यांना व संशोधकांना इलेक्ट्रिक व हायड्रोजन फ्युएल सेल व्हेईकल्स च्या रचनेबाबत ज्ञान मिळवण्यासाठी होईल. या चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी जेएसपीएम युनिव्हर्सिटीचे





प्रेसिडेंट डॉ. आर. एस. जोशी, संकुल संचालक डॉ. सचिन आदमाने, प्राचार्य डॉ. टी.के. नागराज, विभाग प्रमुख डॉ.आर.टी. उगले सी ओ इ पी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी तसेच भिवराबाई सावंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च चे विद्युत विभाग प्रमुख डॉ. नीलम घुगे व इतर विभाग प्रमुख उपस्थित होते. ह्या चर्चासत्राला मार्गदर्शन करण्यासाठी सीओ ई पी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी पुणे, व्ही एन आय टी नागपूर , सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मुंबई मधील वरिष्ठ प्राध्यापक व इलेक्ट्रिक व्हेईकल बनवणाऱ्या कंपन्या टाटा मोटर्स पुणे, टाटा ऑटो कॉम पुणे, रिप्लेस एनजी टेक, सी सी इ बेंगलुरु येथील संशोधक व इंजिनियर्स मार्गदर्शन करतील.

# देशमुख हत्याकांडातील आरोपी विष्णू चाटेची लातूर कारागृहात रवानगी

प्रतिनिधी
■ बीड

संतोष देशमुख खून प्रकरणातील आठ आरोपींपैकी 07 आरोपी पोलिसांच्या जाळयात सापडले आहेत, तर एक आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. यामध्ये मुख्य आरोपी म्हणून ओळखला जाणारा विष्णू चाटे याला गेवराई इथल्या कोठडीत ठेवण्यात आलं, मात्र विष्णू चाटे यानं न्यायालयाकडं मला लातूर कारागृहात ठेवावं, अशी मागणी केली. त्यामुळे न्यायालयानं विष्णू चाटेची लातूर कारागृहात रवानगी केली आहे. एकीकडं बीड जिल्ह्यात कृष्णा आंधळे याला अटक करा या मागणीसाठी आंदोलनं केली जात आहेत.

खंडणी प्रकरणात विष्णू चाटे



याच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर त्याला गेवराई इथल्या कारागृहात ठेवण्यात आलं. मात्र त्यानंतर वेगवेगळी आंदोलनं करण्यात आली. त्यानंतर आता या घटनेत मोठा खुलासा झाला आहे. खंडणी प्रकरणातील आरोप विष्णू चाटे यानं आपल्याला लातूर कारागृहात ठेवण्यात यावं, यासाठी विनंत अर्ज दाखल केला. त्यामुळे त्याला लातूर इथल्या कारागृहात हलवण्यात आलं आहे. उर्वरित 06 आरोपी हे गेवराई इथल्या कोठडीतच ठेवण्यात आलं. यामध्ये सुदर्शन घुले, जयराम चाटे, प्रतीक घुले, सिद्धार्थ सोनवणे, महेश केदार, सुधीर सांगळे हे आरोपी गेवराई इथल्या कोठडीत ठेवण्यात आले आहेत.

खंडणीच्या गुन्ह्यात आरोपी म्हणून अटक असलेला वाल्मिक कराड याच्यावर 302 चा गुन्हा दाखल करा, अशी मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे.

# बीडमधील बंदुकांबाबत 162 जणांचे परवाने रद्द

प्रतिनिधी
■ बीड

बीडचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर बीडमधील गुन्हेगार आणि त्यांच्याकडं असणाऱ्या बंदुका यांची चर्चा सुरु झाली आहे. जिल्ह्यात सर्रास बेकायदा पद्धतीनं कमरेला बंदुका लावून गुन्हेगार मंडळी फिरत असल्याचे अनेक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यावरुन राज्यभरातच नव्हे तर देशभरात या प्रकरणांची चर्चा सुरु झाल्यानंतर आता बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी शस्त्र परवान्यांबाबत महत्वाची कारवाई केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील १६२ जणांचे बंदुकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

१६२ परवाने रद्द, बहुतेक जण गुन्हेगारजिल्हाधिकाऱ्याकडून १६२ लोकांचे बंदुक परवाने रद्द करण्यात आले आहेत, यांपैकी २० जणांचा यापूर्वीच मृत्यू झालेला आहे. खरंतर मृत्यूनंतर परवान्यासह शस्त्र सरकारकडं जमा करणं गरजेचं असताना ते करण्यात आलेलं नव्हतं. त्यामुळं या मृत्यू पावलेल्या लोकांचे देखील परवाने जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द केले आहेत.

दरम्यान, ज्या १६२ लोकांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आले आहेत, त्यांपैकी १४० जण गुन्हेगार आहेत. या लोकांवर विविध प्रकारे गुन्हे दाखल असल्याचं चौकशीत समोर आलं आहे. विशेष म्हणजे यांचा राजकीय लोकांशी संबंध असल्याचंही समोर आलं आहे.

# प्रियकराच्या मदतीनेच पतीला संपवणाऱ्या आरोपींच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या

प्रतिनिधी
■ दापोली

आपला पती बेपत्ता झाल्याची तक्रार दापोली पोलीस स्थानकात दाखल करून आपण जणू काही केलेच नाही असं भासवणाऱ्या पत्नीनेच पतीचा आपल्या प्रियकराच्या साथीने गळा आवळून अत्यंत निर्घृणपद्धतीने खून करून मृतदेह विहिरीत टाकून दिल्याचा धक्कादायक व संतापजनक प्रकार दापोली तालुक्यात घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पती बेपत्ता झाल्याची तक्रार देणाऱ्या पत्नीवरच



दापोली पोलिसांचा संशय होता, त्या दिशेने तपास करून अवघ्या ४८ तासातच दापोली पोलिसांना या हत्या प्रकरणाचा छडा लावण्यात मोठे यश आले आहे. केशकर्तनालयाचा व्यवसाय करणाऱ्या नीलेश दत्ताराम बागकर याचा कट रचून खून झाल्याच आता स्पष्ट झाल आहे. याप्रकरणी नेहा बागकर पालगड येथील एसटी चालक प्रियकर मंगेश चीजगरकर या दोघांनाही अटक करण्यात आली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, दापोली शहराजवळ की, गिम्हवणे येथे नीलेश बागकर व त्याचा भाऊ या दोघांचाही केशकर्तनालयाचा पारंपारिक व्यवसाय आहे. मृत नीलेश याची पत्नी नेहा बागकर हीच्याजवळ अनेकदा काही घरगुती कारणावरून वाद सुरू होते.

# धनंजय मुंडे रिलॅक्स, प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेत कामाला सुरुवात

प्रतिनिधी
■ परळी

मंत्रीपदावर टांगती तलवार,विश्वासू सहकारी वाल्मीक कराड एसआयटी च्या ताब्यात, परळी आणि बीड जिल्ह्यात तणावाचे वातावरण अन् सरपंच खून प्रकरणात नाव येत असतानाही राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे आज रिलॅक्स दिसले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत काल मुंबईत झालेल्या बैठकीत अनुपस्थित राहून परळीला रवाना झालेले आणि काल दिवसभर कुणालाही न भेटलेले धनंजय मुंडे आज मात्र सकाळपासून कामाला लागल्याचे दिसले.

सकाळीच प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेत धनंजय मुंडे यांनी अभिषेक केला आणि तिथून थेट आपले जगमित्र संपर्क कार्यालय गाठत



लोकांच्या प्रश्नांना हात घालत कामाचा धडाका सुरू केला. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाने गेल्या दीड महिन्यापासून राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. अवादा या पवनउर्जा प्रकल्पाच्या अधिकाऱ्याकडून दोन कोटींची खंडणी मागितल्या प्रकरणी धनंजय मुंडे यांचा राईट हॅन्ड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाल्मीक कराड याच्यावर आधी खंडणीचा आणि त्यानंतर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाला. मंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांना हा मोठा धक्का होता. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा खून वाल्मीक कराड याच्या सांगण्यावरूनच झाल्याचा आरोप विरोधकांसह सत्ताधारी भाजपच्या आमदारांनी करत नागपूरमधील हिवाळी अधिवेशन दणाणून सोडले. तेव्हापासून ते वाल्मीक कराडला मकोका लागेपर्यंत विरोधकांनी हे प्रकरण लावून धरले. वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांच्या जवळचा सहकारी असल्याने या प्रकरणामागे त्यांचा देखील हात असल्याचा आरोप करत या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत त्यांना मंत्रिपदाहून हटवा, अशी मागणी राज्यभरातून करण्यात आली. खंडणी आणि देशमुख खून प्रकरणात सरकारने वाल्मीक कराडसह सर्व आरोपींच्या मुसक्या आवळल्या. सीआयडी, एसआयटी कडून या प्रकरणाचा तपास सुरू असताना आता न्यायालयीन समिती स्थापन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खंडणी आणि खून प्रकरणातील सर्व आरोपींना शिक्षा होईल, हा आपला शब्द पुर्ण करण्याच्या दिशेने पाऊल टाकले.

# देवगडमधील कातळशिल्पावर लॅटराईट जातीच्या दगडावरील काही जंगली प्राण्यांची कातळचित्रे

प्रतिनिधी
■ देवगड

दोन वर्षांपूर्वी देवगड तालुक्यातील साळशी येथे उभ्या लॅटराईट जातीच्या दगडावरील काही जंगली प्राण्यांची कातळचित्रे इतिहास संशोधन मंडळाच्या संशोधकांना सापडली होती. तेथून परतत असताना संध्याकाळच्या अंधारात शिरगाव येथील वाघबावली नावाच्या ठिकाणी एक नवे कातळशिल्प सापडले होते. त्याविषयीचा आपला रिसर्च पेपर पुरातत्व अभ्यासक रणजीत हिर्लेकर यांनी भारतीय- मूर्तीशास्त्र आणि स्थापत्य संशोधन परिषदेच्या पाचव्या आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय अधिवेशनात सादर केला.

पुणे येथील सिंहगड इन्स्टिट्यूटच्या श्रीमती काशीबाई



नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे भारतीय मूर्तीशास्त्र व स्थापत्य संशोधन परिषदेचे दोन दिवसीय पाचवे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच पार पडले. या परिषदेला देशभरातील अनेक राज्यांमधील संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. त्यामध्ये पुरातत्व अभ्यासक रणजित हिर्लेकर यांनी आपला शोधनिबंध सादर केला. त्यावेळी सत्रप्रमुख म्हणून आर. एच. कुलकर्णी व डेक्कन कॉलेजचे डॉ. श्रीकांत गणवीर हे उपस्थित होते.

हिर्लेकर म्हणाले, शिरगाव येथील कातळशिल्प समतल करण्यासाठी कलाकाराने कोणते साधन वापरले असेल? कसल्याही लोखंडी हत्याराविना असे अचूक कोरीव काम करणे अवघड आहे. हे चित्र काढण्यासाठी माणसाला भूमितीची व गणितीय ज्ञानाची आवश्यकता आहे? त्याविना अशी भौमितिक चित्र कोरणे कसे शक्य व्हावे? असे अनेक प्रश्न उपस्थित करीत आपले निष्कर्ष मांडले.

## आत्माराम मोरे स्मृती आंतर हॉस्पिटल क्रिकेट स्पर्धा 10 फेब्रुवारीपासून

**मुंबई :** विविध खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत असलेल्या आत्माराम मोरे प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ पत्रकार स्व. आत्माराम मोरे यांच्या स्मृती दिनानिमित्त आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धा भरविण्याचे ठरविले आहे. ही स्पर्धा १० ते १९ फेब्रुवारी २०२५ दरम्यान एमजेएससी ग्राउंड, शिवाजी पार्क, मुंबई-४०० ०२८ येथे होणार आहे. स्पर्धेप्रसंगी टाटा हॉस्पिटलचे नामवंत माजी क्रिकेटपटू डॉ. जाफरी यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. जखमी क्रीडापटूंना रुग्णालयीन सेवा त्वरित उपलब्ध करण्यासाठी विविध हॉस्पिटलचे क्रिकेटपटू सहकार्य करीत असल्यामुळे त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अश्विनीकुमार मोरे यांनी स्पर्धेचे सातत्य कायम राखले आहे. स्व. आत्माराम मोरे स्मृती आंतर हॉस्पिटल क्रिकेट स्पर्धा बाद पध्दतीने आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीद्वारे आयोजित केली जाणार आहे. टॉप-१० संघांना रोख पुरस्कारासह आकर्षक चषक दिला जाणार आहे. सर्वोत्तम क्रिकेटपटू, उत्कृष्ट फलंदाज व उत्कृष्ट गोलंदाज तसेच प्रत्येक सामन्यातील दोन्ही संघातील उत्कृष्ट खेळाडूला सामनावीर पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. रुग्णालयीन सेवेत कायम स्वरूपी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना तसेच डॉक्टर स्टाफला त्यांच्या हॉस्पिटल संघातून खेळता येईल. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णालयीन क्रिकेट संघांनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा प्रदीप क्षीरसागर (७९७७४७१९४३) यांच्याकडे १८ जानेवारीपर्यंत संपर्क साधावा.




'चिंतामणी चषक -२०२५' कबड्डी स्पर्धा

## लायन्स स्पोर्टस्, विजय क्लब, शिवशक्ती क्रीडा यांची विजयी सलामी



प्रतिनिधी
■ मुंबई

लायन्स स्पोर्टस्, विजय क्लब, शिवशक्ती क्रीडा यांनी चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाने आयोजित केलेल्या "७व्या चिंतामणी चषक" कबड्डी स्पर्धेच्या प्रथम श्रेणी पुरुष गटात, तर हिंदमाता सेवा, वीर संताजी क्रीडा, शिवनेरी सेवा यांनी कुमार गटात विजयी सलामी दिली. मुंबई येथील चिंचपोकळी लोहमार्ग स्थानका जवळील सदगुरू भालचंद्र महाराज क्रीडांगणावर झालेल्या प्रथम श्रेणी पुरुषांच्या उद्घाटनिय सामन्यात लायन्स स्पोर्टस् ने सूर्यकांत व्यायाम शाळेचा प्रतिकार २७-२१ असा मोडून काढला. हर्ष मोरे, शुभम मटकर, यश सायगावकर यांच्या चढाई पकडी च्या खेळाच्या जोरावर पूर्वार्धात लोण देत १६-०५ अशी भक्कम आघाडी लायन्सने घेतली. उत्तरार्धात सूर्यकांतच्या साहिल तूपारे, मंदार ठोंबरे यांनी आपला खेळ गतिमान करीत लायन्स संघावर लोण देत ही आघाडी कमी केली. पण वेळेचे गणित साधता न आल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. दुसऱ्या सामन्यात विजय क्लबने साऊथ कॅनरा स्पोर्टस् चा ३२-२२ असा पाडाव केला. विश्रांतीला १७-०९ अशी विजय क्लब कडे आघाडी होती. रोहन तिवारी, निखिल शेट्टी यांच्या दमदार चढाया त्याला शुभम रहाटे, आयुष साळवी यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे शक्य झाले. साऊथ कॅनराच्या अमन शेख, करण गरजे यांनी विश्रांतीनंतर बऱ्यापैकी लढत दिली.

याच गटात शिवशक्ती क्रीडाने चुरशीच्या लढतीत विजय नवनाथचे आव्हान ३७-३३ असे संपविले. मध्यांतराला १६-११ अशी शिवशक्ती कडे आघाडी होती. साई चौगुले, वैष्णव सूर्यवंशी, विराज सोहनी शिवशक्ती कडून, तर मयूर खामकर, धीरज मेघे विजय नवनाथ कडून उत्कृष्ट खेळले. कुमार गटाच्या अत्यंत अतितटीने खेळल्या लढतीत स्थानिक हिंदमाता सेवा मंडळाने वीर नेताजी मंडळाचे कडवे आव्हान ३४-३३ असे मोडून काढले. पहिल्या डावात वीर नेताजीने आदित्य चव्हाण, ओम् गावडे, आदित्य मोरे यांच्या संयमी खेळाच्या बळावर हिंदमाता वर लोण देत १९-१६ अशी आघाडी घेतली होती. दुसऱ्या डावात हिंदमाताच्या विजय गोरे, वैभव शिंदे, विनीत कनोजिया यांनी कल्पक खेळ करीत सामन्याच्या शेवटच्या क्षणी सामना एका गुणाने आपल्या नावे केला.

या स्पर्धेत उद्घाटन लोहमार्ग पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या शुभहस्ते झाले. तदप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष विठ्ठलदास पै, सचिव वासुदेव सावंत, कोषाध्यक्ष विकास सावंत, प्रवीण राणे, विद्याधर घाडी आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेस काळाचौकी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनीष श्रीधनकर, मुंबई शहर कबड्डी असो.चे सचिव विश्वास मोरे, कबड्डीतील शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त राजेश पाडावे यांनी सदिच्छा भेट दिली.

## टीम इंडियाला मिळणार नवा फलंदाजी प्रशिक्षक
## सौराष्ट्राचे अष्टपैलू सीतांशू कोटक स्वीकारणार सूत्रे



प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी इंग्लंडविरूद्ध पांढऱ्या चेंडूची मालिका खेळणार आहे. येत्या २२ जानेवारीपासून टी-२० मालिकेला सुरूवात होणार आहे. या मालिकेत भारतीय संघात नवे फलंदाजी प्रशिक्षकही संघाबरोबर असणार आहेत. या मायदेशात होणाऱ्या मालिकेसाठी बीसीसीआयने नवे फलंदाजी प्रशिक्षक नेमले आहेत.

सौराष्ट्राचे अष्टपैलू खेळाडू सितांशु कोटक यांची फलंदाजी प्रशिक्षक म्हणून बीसीसीआयने निवड केली आहे. सितांशु कोटक यांनीही एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही, पण त्यांचा कोचिंगचा अनुभव चांगला आहे. भारताला इंग्लंडविरुद्ध पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळायची आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सितांशू कोटक टीम होणार आहेत. भारतीय संघाचे कोलकात्यात तीन दिवसीय शिबिर होणार असून त्यासाठी खेळाडू १८ तारखेपर्यंत तेथे पोहोचतील." भारतीय संघाच्या सपोर्ट स्टाफमध्ये सध्या मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, अभिषेक नायर (सहाय्यक प्रशिक्षक), रायन टेन डोशेट (सहाय्यक प्रशिक्षक), मोर्ने मॉर्केल (गोलंदाजी प्रशिक्षक) आणि टी दिलीप (क्षेत्ररक्षण प्रशिक्षक) आहेत.

**एकही आंतरराष्ट्रीय सामना न खेळणारे सितांशु कोटक**

*गुजरातमध्ये जन्मलेल्या कोटक यांनी आपल्या कारकिर्दीत एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. त्यांनी लिस्ट ए सामन्यांमध्ये ४२.३३ च्या सरासरीने ३०८३ धावा केल्या आहेत. क्रिकेट जगतात ते त्यांच्या उत्कृष्ट टेक्निकसाठी ओळखले जातात. १३० प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये त्यांनी ४१.७६ च्या सरासरीने ८०६१ धावा केल्या आहेत, ज्यात त्यांनी १५ शतकं झळकावली आहेत.कोटक यांच्या नावावर ९ टी-२० सामन्यात १३३ धावा आहेत. कोटक यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये ११ हजारांहून अधिक धावा केल्या आहेत. कोटक यांनी यापूर्वी इंडिया ए संघासह काम केलं आहे. त्यांनी व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्या सपोर्ट स्टाफसह काम केलं आहे. सितांशु कोटक यांचा कोचिंगचा अनुभव तगडा आहे. २०२० च्या रणजी ट्रॉफीमध्ये सितांशु हे सौराष्ट्रचे मुख्य प्रशिक्षक होते आणि त्यांचा संघ चॅम्पियनही झाला होता. २०१९ मध्ये राहुल द्रविड यांची जागा घेणारी व्यक्ती म्हणजे सितांशु कोटक. २०१९ मध्ये, जेव्हा राहुल द्रविड राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख बनले, तेव्हा भारत अ संघाच्या प्रशिक्षका पदाची जबाबदारी सितांशु कोटक यांच्याकडे आली. आता भारताच्या वरिष्ठ संघात सितांशु कोटक यांचा समावेश झाला आहे.*

*मुंबई: "भाऊ "ज बॉईज चे ,संस्थापक समाजसेवक संजय तातोबा कांबळे,आशुतोष विजय कांबळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या "भाऊ"ज बॉईज " दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन खासदार संजय भाऊ दिना पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी युवती सेना महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य राजोल पाटील,मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई चे प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगांवकर,राजेश हळदणकर , हर्ष कांबळे, मुरुगन अण्णा उपस्थित होते*



अवाडा ऑटर्स स्क्वॉश खुली स्पर्धा

## तारा भंडारेची काश्वी हरलाल्कावर चुरशीच्या लढतीत मात

प्रतिनिधी
■ मुंबई

ऑटर्स क्लब, वांद्रे येथे सुरू असलेल्या अवाडा ऑटर्स स्क्वॉश खुल्या स्पर्धेत 19 वर्षांखालील मुली गटात तारा भंडारे हिने काश्वी हरलाल्कावर रंगतदार लढतीत मात केली.

अचूक व चपळ ड्रॉप शॉट्सच्या जोरावर ताराने पहिले दोन गेम 11-7, 11-6 असे सहज जिंकले. मात्र, काश्वीने चुका टाळताना तिसरा गेम 11-8 असा जिंकत दमदार पुनरागमन केले, परंतु, ताराने चौथ्या गेममध्ये पुन्हा लय मिळवत 11-1 अशा फरकाने गेम जिंकत राऊंड ऑफ 16 फेरीत प्रवेश केला.

दुसऱ्या एका सामन्यात मान्या संघवीने समरा मुन्शीचा 11-1, 11-3, 11-1 असा सरळ गेममध्ये पराभव करत आपले वर्चस्व दाखवून दिले. दरम्यान, विनिशा शेट्टीने जाई लेंडे हिला 11-7, 11-8, 11-5 असे हरवत आगेकूच केली.

५वी अजित घोष ट्रॉफी महिला टी-२० स्पर्धा

## साईनाथ, भामा सी.सी.सह डॅशिंग आणि स्पोर्टिंग युनियन उपांत्य फेरीत




प्रतिनिधी
■ मुंबई

गतविजेत्या डॅशिंग क्रिकेट क्लबसह भामा सी. सी., साईनाथ आणि स्पोर्टिंग युनियन या संघांनी ५व्या अजित घोष ट्रॉफी महिला टी-२० स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. स्पर्धेतील शेवटच्या दोन साखळी लढतींमध्ये भामा सी. सी. ने डॅशिंगवर २५ धावांनी मात करत गटामध्ये अव्वल स्थान मिळवले. तर साईनाथने महाराष्ट्र यंगवर ३२ धावांनी विजय मिळवून पुढे कूच केली. साईनाथ पाठोपाठ स्पोर्टिंगने २ सामने जिंकले असल्याने त्यांचा प्रवेश या आधीच पक्का झाला होता. डॅशिंगने तसे पाहावयास गेले तर दोन लढती जिंकल्या असल्याने त्यांचा प्रवेशही निश्चित होता.उपांत्य फेरीमध्ये भामा विरुद्ध स्पोर्टिंग युनियन आणि डॅशिंग विरुद्ध साईनाथ अशा लढती होतील.

साईनाथ आणि महाराष्ट्र यंग ही लढत फार महत्त्वाची होती. कारण यात विजयी होणाऱ्या संघालाच आगेकूच करण्याची संधी होती. साईनाथने नाणेफेक जिंकून फलंदाजी घेतली आणि २० षटकात ३ बाद १५५ अशी चांगली धावसंख्या उभी केली. स्पर्धेत सातत्यपूर्ण खेळ करणारी सिम्रन डिमेलो (४९) आणि अष्टपैलू निधी घरत (नाबाद ४६) यांनी छान फलंदाजी केली. प्रतिस्पर्धी संघाच्या जैनी शाह (४२) आणि तितक्याच धावांची नाबाद खेळी करणारी कर्णधार सानया जोशी यांना आवश्यक धावगती राखता न आल्याने महाराष्ट्र यंग ५ बाद १२३ एवढीच मजल मारू शकला. श्रावणी पाटील (२१/२ बळी) आणि श्रीनी सोनी (३३/२ बळी) यांनी उत्तम मारा केला व महाराष्ट्र यंगच्या प्रगतीला खीळ घातली.

भामाची ७ बाद १४८ ही धावसंख्या डॅशिंगला पार करणे कठीण गेले. अष्टपैलू रिया साळुंखे हिने ४१ धावा करण्याबरोबर १८ धावात २ बळी घेत भामाच्या विजयात मुख्य भूमिका बजावली. तिला चांदनी कनोजिया (१४/२ बळी) आणि क्षेत्ररक्षकांची योग्य साथ लाभली.

**संक्षिप्त धावफलक**

*साईनाथ स्पोर्ट्स २० षटकांत ३ बाद १५५ धावा (सिम्रन डिमेलो ४९, निधी घरत नाबाद ४६, सेजल विश्वकर्मा नाबाद २१) विजयी विरुध्द महाराष्ट्र यंग २० षटकांत ५ बाद १२३ धावा (जैनी शाह ४२, सानया जोशी नाबाद ४२, श्रावणी पाटील २१ धावांत २ बळी, श्रीनी सोनी ३३ धावांत २ बळी) सामन्यात सर्वोत्तम : सिम्रन डिमेलो. भामा सी सी २० षटकांत ७ बाद १४८ धावा (हृदयेशा पाटील २६, रिया साळुंके ४१, नीलाक्षी तलाठी २५ धावांत २ बळी) विजयी विरुध्द डॅशिंग सीसी २० षटकांत ८ बाद १२३ धावा (दिया संघवी ३९, रिया साळुंके १८ धावांत २ बळी, चांदनी कनोजिया १४ धावांत २ बळी) सामन्यात सर्वोत्तम : रिया साळुंके*

## मालवणीच्या नियोजित थीम पार्कला 'भगवान परशुराम लोकशाही पार्क' असे नाव देण्याची नागरिकांची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई



मालाड, मालवणी येथील सात एकर भूखंड फर्निचर व्यवसायिकांकडून निष्कासित करून शासनाकडून तो महापालिकेला सुपूर्द केला. माजी पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या सहकार्याने दहा कोटी रुपयांचा निधी प्राप्त करून या भूखंडावर कुंपण भिंत व इतर संरचना उभारण्यात आल्या. पुढे, सिने अभिनेत्री व खासदार हेमा मालिनी, अमृता फडणवीस आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते उद्यानात झाडे लावण्याचा शुभारंभ करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात या ठिकाणी थीम पार्क उभारण्यासाठी भूमिपूजन करण्यात आले होते. मात्र, लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या कामाला पुढे गती देता आली नाही. मात्र या थीम पार्कला भगवान परशुराम थीम पार्क" असे नाव देण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. अशी माहिती माजी खा. गोपाळ शेट्टी यांनी दिली.

भगवान श्री परशुरामाने कोकण प्रदेशाची निर्मिती केली आहे, असे मानले जाते की परशुरामाने समुद्राला ४०० योजने मागे हटवून कोकणाचा भूप्रदेश निर्माण केला. त्यामुळेच परशुरामाला सप्त कोकणांचा आराध्य देव मानले जाते. संपूर्ण भारतात समुद्रालगतच्या राज्यांमध्ये भगवान श्री परशुरामाचे विशेष महत्व आहे कोकणातील चिपळूण येथे भगवान श्री परशुराम यांचे मोठे देवस्थान आहे आणि लाखो भाविक तेथे दर्शनसाठी भेट देतात.

उत्तर मुंबई मध्येही मोठ्या प्रमाणामध्ये कोकणवासीय राहतात. या पार्श्वभूमीवर माजी खा.गोपाळ शेट्टी यांनी या थीम पार्क चे नाव "भगवान परशुराम थीम पार्क" असे नामकरण सुचवण्यात आले होते, त्याला महापालिका आयुक्तांनी पत्राद्वारे तत्वतः मान्यता ही दिली आहे. असे शेट्टी यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत केंद्रीय मंत्री पियुष गोयलजी यांच्या विजयानंतर, परिसरातील काही लोकांनी थीम पार्कचे नाव बदलून " लोकशाही थीम पार्क" असे करण्याचा प्रस्ताव मांडला. यावर सर्वांनी विचारमंथन करून "भगवान परशुराम लोकशाही पार्क" असे नाव ठेवण्याचे ठरवले मालाडचा हा परिसर " मालवणी" या शासकीय नावाने ओळखला जातो. तथापि, मालवणी हा भाग एका समाजाच्या नावानेही ओळखला जातो, या अनुषंगाने सर्वांच्या सहमतीने या परिसराला" भगवान परशुराम" नाव देण्याचा निर्णय घेतला गेला होता.

विशेष म्हणजे या भागातील एका मैदानाला पूर्वी" टीपू सुलतान " असे बेकायदेशीर नाव देण्यात आले होते. शासनाच्या माध्यमातून त्याचे नाव बदलून" वीरगती अस्फाक उल्ला खान" असे करण्यात आले. त्याचप्रमाणे, दुसऱ्या मैदानाला " मदर तेरेसा " असे नाव देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, समतोल साधण्यासाठी आणि हिंदू समाजाच्या भावनांचा आदर करीत या सात एकर मैदानाला "भगवान परशुराम थीम पार्क" असे नाव देण्याचा निर्णय घेतला गेला. या भूखंडालगत ८०० चौरस मीटर जागा एका मंदिर ट्रस्टला सन 2022 च्या आधी देण्यात आली आहे. या जागेवर भव्य मंदिर उभारले जाईल आणि त्याच्या वरच्या मजल्यावर लग्न समारंभांसाठी परवडणाऱ्या दरात सुविधा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीही ट्रस्ट मार्फत व्यवस्था करण्यात येणार आहे. असेही शेट्टी यांनी सांगितले. केंद्रीय मंत्री आणि खासदार पियुष गोयल यांच्या नेतृत्वाखाली सर्व नागरिकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करूया. अशी मनीषा गोपाळ शेट्टी यांनी व्यक्त केली आहे.

## शिवसेना प्रमुखांच्या जयंतीनिमित्त 'शिवडी महोत्सव'

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पुरस्कृत शिवसेना माजी नगरसेवक सचिन पडवळ यांच्या माध्यमातून हिंदुहृदसम्राट मा.शिवसेना प्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त "बालविकास मित्र मंडळ व सिद्धी संस्कृती फाउंडेशन" यांच्या संयुक्त विद्यमाने बाल विकास मनोरंजन मैदान शिवडी येथे १५ ते २७ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत शिवडी महोत्सवाचं आयोजन करण्यात आले आहे.

काल या महोत्सवाचा शुभारंभ विभागप्रमुख आशिष चेंबुरकर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये कबड्डी स्पर्धेने करण्यात आला. या वेळी माजी नगरसेवक दत्ता पोंगडे, शाखाप्रमुख जयसिंग भोसले, बैजू हिंदोळे महिला विधानसभा सांघटिका लता रहाटे, उपविभाग संघटीका श्वेता राणे, महिला शाखा संघटीका कविता माने, शुभदा पाटील, शाखा समन्वयक भारती देवाडीगा, बाल विकास मंडळाचे संयोजक सल्लागार प्रकाश माने, अध्यक्ष मुकुंद परब, सरचिटणीस विकास मोरे हे देखील उपस्थित होते



*शिवडी महोत्सवात -१५ जाने. ते १९ जाने. कब्बडी स्पर्धा - कब्बडी असोसिएशन मान्यताप्राप्त मुंबई शहर "ब" गट वेळ - संध्या ७.०० ते १०.००, २१ जानेवारी रोजी "एकेरी नृत्य स्पर्धा" (शिवडी विधानसभा मर्यादित) २२ जाने. रोजी "ज्येष्ठ शिवसैनिक सन्मान सोहळा"(प्रभाग क्रमांक २०६ मर्यादित) २३ जाने. रोजी समूह नृत्य स्पर्धा, २४ जाने. रोजी पाककला स्पर्धा वेळ - संध्या ७.०० ते ८.३०, २५ जाने खेळ खेळूया पैठणीचा हळदी कुंकू समारंभ वेळ - संध्या ५.०० ते १०.००,- २६ जानेवारी रोजी चित्रकला स्पर्धा वेळ - संध्या ६.०० ते १०.००, २७ जाने. रोजी ऑर्केस्ट्रा (मराठी,हिंदी वाद्यवृंद) वेळ - संध्या.६.३० ते १०.००*

## एच/पश्चिम विभागातील वॉर्ड ऑफिसर व अभियंता यांच्यातील वादावर पडदा

प्रतिनिधी
■ मुंबई

पालिकेच्या एच पश्चिम विभागात वॉर्ड ऑफिसर व अभियंता संवर्गामध्ये सुरू असलेला वाद संपुष्टात आला असून आता चर्चेनंतर तात्काळ सहाय्यक अभियंता सचिन हणमदर यांचे कार्यालयाचे दालन उघडून देऊन त्यांना कार्यभार करण्यास सांगण्यात आले आहे. विनायक विसपुते, वॉर्ड ऑफिसर, एच/पश्चिम विभाग यांच्या मनमानी कारभारामुळे पश्चिम उपनगरातील अभियंता संवर्गामध्ये कमालीचा असंतोष निर्माण झाला होता त्याचे रूपांतर आंदोलनात झाले होते. सोमवार ०६/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता एच/पश्चिम विभागामध्ये प्रचंड निर्देशने करण्यात आली होती.

सहायक अभियंता सचिन हणमदर यांच्या सारख्या एच/पश्चिम विभाग कार्यालयातील कॅबीनला कुलूप लावून सुरक्षा रक्षकाकडून त्यांना कार्यालयांत येण्यापासून परावृत्त करण्यात आले होते. याचा म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई आणि म्युनिसिपल मजदूर युनियन, मुंबई कठोर शब्दात निषेध करण्यात आला होता.

सदर प्रकरणी संघटनेने शुक्रवार १० जानेवारी २०२५ रोजी महापालिका आयुक्त भूषण गगराणी साहेब यांची भेट घेऊन सर्व घटनाक्रम त्यांना विषद केला होता. काल १४ जानेवारी २०२५ रोजी उपायुक्त विश्वास मोटे साहेब (परि. ३) व सहाय्यक आयुक्त, एच / पश्चिम विभाग विनायक विसपुते आणि कार्याध्यक्ष अभि. रमेश भुतेकर-देशमुख, अभि. आनंद राय, म्युनिसिपल मजदूर युनियनचे सरचिटणीस वामन कविस्कर, चिटणीस श्री. रविंद्र पवार यांच्या समवेत सविस्तर चर्चा करून सन्माननीय तोडगा काढण्यात आला.व तात्काळ सहाय्यक अभियंता सचिन हणमदर यांचे कार्यालयाचे दालन उघडून देऊन त्यांना कार्यभार करण्यास सांगण्यात आले.

## बेस्टच्या वीज भरणा केंद्राच्या संख्येत वाढ!

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईला परिवहन सेवा देणाऱ्या बेस्ट उपक्रमाचे उत्पन्न कमी व खर्च जास्त होत असल्यामुळे उपक्रम डबघाइला आला आहे. पण बेस्ट चा वीज विभाग फायद्यात चालत होता तो ही आता तुटीत चालला आहे. बेस्ट मुंबईच्या शहर भागातील साधारण ११ लाख वीज ग्राहक आहेत. पण महिनाकाठी पाठवण्यात येणार वीज बिल घ्यायला बेस्ट कडे कर्मचारी वर्ग ही कमी आहे. त्यामुळे वीज भरणा केंद्रही कमी झाली आहेत. जी वीज भरणा केंद्र आहेत तिथे वीज ग्राहकांच्या वीज बिल भरण्यासाठी लांबच लांब रांगा लागलेल्या दिसतात. त्यामुळे ग्राहक मेटाकुटीला येत आहेत. वीज बिल भरणा केंद्र वाढविण्याची ते मागणी करीत आहेत.

उत्तर (North) विभागातील बेस्टचे एकूण 56 वीज बिल भरणा केंद्र आहेत, पण त्यापैकी फक्त 40 वीज बिल भरणा केंद्र सद्या चालू आहेत.ते पण काही आठवड्यातून दोन किंवा तीन दिवसच चालू असतात. तर दक्षिण(south) विभागात एकूण 54 वीज बिल भरणा केंद्र आहेत,त्यापैकी फक्त 18 वीज बिल भरणा केंद्र सध्या चालू आहेत.ते सुद्धा आठवड्यातून दोन किंवा तीन दिवसच चालू असतात. बेस्टचे मुंबई मध्ये विद्युत बिल भरणा केंद्र उत्तर आणि दक्षिण मिळून 110 केंद्र आहेत त्यापैकी फक्त 58 केंद्र सद्या चालू आहेत.

विद्युत पुरवठा विभागातील बेस्टचे आर्थिक उत्पन्न वाढवणारे विभाग म्हणून बेस्ट मध्ये वीज ग्राहक विभाग आहे त्यामध्ये मीटर वाचक,बिल वाटणारे बिल वितरक आणि विद्युत बिल घेणारे रोख भरणा केंद्रावरील लिपिक कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात कमी झाला असल्याने बेस्ट कडे वीजग्राहक पैसे भरण्यासाठी येत आहेत पण ते घेण्यासाठी माणसे नाहीत.

सद्या बेस्ट मध्ये विद्युत पुरवठा विभागातील 9 विभाग असून त्यामध्ये चुनाभट्टी पासून ते कुलाबा बॅकबे पर्यंत 11 लाख वीज ग्राहक वर्ग आहेत.त्यांचे प्रथम दैनंदिन मीटर वाचन होते,त्यानंतर त्यांचे बिल छपाई होऊन बिल वितरण होते आणि त्यानंतर ग्राहक बिल भरण्यासाठी बेस्टच्या वीज बिल भरणा केंद्रावर येत असतात. मीटर वाचक 450 होते सद्या 150 पर्यंत कर्मचारी शिल्लक आहेत. बिल वितरक एकूण 400 पर्यंत होते सद्या 180 पर्यन्त कर्मचारी शिल्लक आहेत. रोख भरणा केंद्रावर एकूण 190 कर्मचारी होते सद्या 58 कर्मचारी शिल्लक आहेत.MERC नियमानुसार ARR मध्ये बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागात कामगार भरती करण्यासाठी परवानगी दिली असताना सुद्धा गेले वर्षभर झाले बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागात अश्या आर्थिक उत्पन्न वाढविणाऱ्या विभागात प्रशासन कर्मचारी भरती करत नसल्याचे दिसून येत आहे.

महत्वाची माहिती अशी मिळते की, बेस्टच्या वीज भरणा केंद्रावर येणारी रोख कॅश जवळपास 20 कोटी रुपये गेल्या 10 दिवसापासून कुलाबा आगार येथील बेस्टच्या रोख विभागात पडून आहेत,सदर रक्कम बँक मध्ये घेत नाही त्यामुळे ती तशीच रोख विभागात पडून आहे, त्याचे येणारे व्याज देखील बुडत आहे.आणि असे प्रकार गेल्या तीन वर्षापासून सतत घडत आहेत, पूर्वी ज्या बँक मध्ये बेस्ट पैसे भरायला जाते त्या बँकेतून जेव्हा बेस्टला सांगितले जाते तेव्हाच ते पैसे भरले जातात. तोपर्यंत ते पैसे तसेच बेस्टच्या कुलाबा आगारात रोख विभागात पडून असतात.

याचे अजून दुसरे एक कारण सांगितले जाते की, साधारण तीन वर्षापूर्वी बेस्टच्या कुलाबा आगाराच्या बाजूला bank of india ची शाखा होती आणि बेस्टचा बहुतेक सर्व आर्थिक कारभार तेथूनच चालायचा पण बेस्टचे तत्कालीन महाव्यवस्थापक लोकेश चंद्रा असताना सदर बँकेचा करार पुढे न चालू ठेवता ती जागा एका हॉटेल व्यवसायिकाला भाडेतत्वावर दिली आहे.त्यामुळे सदर बँक इतर ठिकाणी स्थलांतर झाली पण त्यांनी आता बेस्टचे पैसे घेण्यास नकार दिला. असे समजते.

## दिव्यांची सोय करुन दिल्याबद्दल आ. सुनील राऊत यांचा सत्कार





प्रतिनिधी
■ मुंबई

कांजूर विभागातील एकवीरा नगर, शास्त्रीनगर, पंचशील नगर, मोहट्टा देवी परिसरातील नागरिकांना अंधारातून चाचपडत कांजूर बाजारपर्यंत जाणे, वयोवृध्द नागरिकांना कोळाखातून उपचारासाठी रुग्णालयात जावे लागत होते. तसेच नागरिकांना परिवार सोसायटीच्या मैदानात फिरावयास यावयाचे असल्यास त्यांना काळोखाशी सामना करावा लागत असे. शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवणीसाठी याच काळोखातून जाणे-येणे होत असे. आमदार सुनिल राऊत यांनी परिस्थितीची पाहणी केल्यानंतर तातडीने म.रा. वि. मंडळातून तीन विजेचे खांब बसवून घेतले व त्यावर दिवाबत्तीची सोय करुन विभाग प्रकाशाने उजळून निघाला. नागरिकांनी आमदारांचा जाहिर सत्कार केला.

ततप्रसंगी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना अध्यक्ष बाबा कदम यांनी त्यांचे आभार मानले. त्यावेळी विद्युत मंडळाचे अधिकारी दास साहेब, अनंत पाताडे, दिपक सावंत, रवि महाडिक, सचिन चोरमुले, तानाजी मोरे, सुधाकर पेडणेकर, मामा मंचेकर, दत्ता पालेकर, विश्वास तुपे, दिपाली पाटील, मामी मंचेकर, योगेश पेडणेकर, मामा पाटील, गीते साहेब, किशोर कांबळे, इ. कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडणूक लढवायची तर दोनपेक्षा जास्त मुलं हवीत

**अमरावती:** आंध्र प्रदेशमध्ये आता एक अनोखा नियम लागू होत आहे. खरंतर आतापर्यंत लोकसंख्या नियंत्रित आणण्यासाठी कमी मुलं जन्माला घालण्यासाठी धोरणं अवलंबवली जात होती. परंतु आंध्रप्रदेशमध्ये चक्क जास्त मुलं जन्माला घालण्यासाठी सरकारकडून प्रोत्साहन दिले जात असल्याचं समजते. विशेष म्हणजे आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी याबाबत माहिती दिली आहे. त्यांनी म्हटले की, कोणताही व्यक्ती सरपंच, नगरपालिकेचा नगरसेकव किंवा महापौर तेव्हाच बनू शकतो, जेव्हा त्याला दोन पेक्षा अधिक मुलं असतील. त्यांनी संकेत दिला की, यामुळे लोकसंख्येतील घसरण रोखली जाईल. नायडू म्हणाले की, ते लोकांना जास्त मुलं जन्माला घालण्यास प्रोत्साहित करण्यासंबंधी धोरणं आणतील. नरविरपल्ले येथे मीडियाशी बोलताना म्हटले, एक काळ होता जेव्हा जास्त मुलं असणाऱ्या व्यक्तिला पंचायत किंवा स्थानिक नगरपालिका निवडणूक लढण्याची परवानगी नव्हती. आता मी हे म्हणतोय की कमी मुलं असणारे व्यक्ति निवडणूक लढवू शकणार नाहीत, असे नायडू म्हणाले.



# ‘युद्धबंदी’वरून नेतन्याहू मंत्रिमंडळात फूट!

## करार मंजुरीसाठी घेणार मतदान

**वृत्तसंस्था**
**लंडन**

अखेर तब्बल १५ महिन्यानंतर इस्रायल-हमास युद्धबंदी करारावर दोन्ही बाजूंनी सहमती झाल्याचे अमेरिकेचे मावळते राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी जाहीर केले. मात्र इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी अद्याप युद्धबंदी कराराला सहमती दर्शवलेली नाही. युद्धबंदी करार अद्याप अंतिम झालेला नाही, असे वृत्त 'टाईम्स ऑफ इस्रायल'ने दिले आहे.

इस्रायली मंत्रिमंडळ लवकरच युद्धबंदीवर मतदान घेणार आहे. दरम्यान, नेतान्याहू यांनी हमासवर युद्धबंदीच्या अटींचे पालन न केल्याचा आरोप केला आहे. इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने आज



सांगितले की, हमास शेवटच्या क्षणी झालेल्या संघर्षातून मागे हटत नाही तोपर्यंत गाझा युद्धबंदी कराराला मंजुरी देण्यासाठी त्यांचे मंत्रिमंडळ बैठक घेणार नाही. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने हमासवर "शेवटच्या क्षणी सवलती मिळविण्याच्या" प्रयत्नात कराराच्या काही भागांपासून माघार घेतल्याचा आरोपही केला आहे. इस्रायली मंत्रिमंडळ आज या कराराला मान्यता देणार होते.

युद्धबंदी झाली असल्याचे जाहीर केले, परंतु इस्रायलने अद्याप त्याची पुष्टी केलेली नाही. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी अद्याप युद्धबंदीवर सहमती दर्शवलेली नाही. इस्रायली मंत्रिमंडळ लवकरच युद्धबंदीवर मतदान करू शकते. दरम्यान, नेतान्याहू यांनी हमासवर युद्धबंदीच्या अटींचे पालन न केल्याचा आरोप केला आहे. जोपर्यंत मध्यस्थ हमासच्या बाजूने सर्व अटी मान्य करत नाहीत तोपर्यंत युद्धबंदी लागू होणार नाही, असा आग्रह नेतान्याहू यांनी धरला आहे.

एकीकडे जगभर इस्रायल-हमास युद्धबंदी करारावर झाला असल्याची चर्चा सुरु असतानाच इस्रायलने गाझावर पुन्हा एकदा हवाई हल्ला केला आहे. युद्धबंदी करारानंतर इस्रायलने गाझा पट्टीत ४५ हून अधिक पॅलेस्टिनींना ठार झाल्याचा दावा स्थानिक नागरिक करत आहेत. १५ महिन्यांच्या युद्धानंतर हमास आणि इस्रायलमध्ये युद्धबंदीचा करार झाल्याची मध्यस्थांनी पुष्टी केल्यानंतर गाझामधील पॅलेस्टिनी लोकांनी आनंदोत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.

'टाईम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, युद्धबंदी करार अद्याप अंतिम झालेला नाही. दरम्यान, युद्धबंदीचे कट्टर विरोधक असलेले अतिउजवे इस्रायलचे अर्थमंत्री बेझालेल स्मोट्रिच यांनी युद्धबंदीचा इस्रायली समाजावर होणाऱ्या नकारात्मक परिणामावर एक नवीन विधान जारी केले आहे. त्यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे की, "आपण दुर्दैवी दिवसांच्या मध्यभागी आहोत, सर्व बंधकांना आपल्याकडे परत पाहण्याची इच्छा आहे. या करारासाठी इस्रायलला किती मोठी किंमत मोजावी लागेल. मला ठाम विश्वास आहे की बहुसंख्य जनता या कराराचा तिरस्कार करेल."

यापूर्वीही नेतन्याहू यांनी युद्धबंदी करारावर असहमती व्यक्त केली होती. बुधवारी (दि. १५) रात्री उशिरा स्थानिक माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, हमाससोबतचा युद्धविराम करार अंतिम करण्याचे काम सुरू आहे.

## अदानींविरुद्धच्या अहवालाने खळबळ माजवणारी ‘हिंडेनबर्ग रिसर्च’ कंपनी बंद

### संस्थापकांची घोषणा

**वृत्तसंस्था**
**वॉशिंग्टन**

भारतीय व्यावसायिक गट अदानी समूहाबाबतचा अहवाल देऊन खळबळ माजवणारी हिंडेनबर्ग रिसर्च कंपनी बंद झाली आहे. कंपनीचे संस्थापक नॅथन अँडरसन यांनी बुधवारी याची घोषणा केली.

‘हिंडेनबर्ग रिसर्च’ ही कंपनी २०१७ मध्ये सुरू झाली होती. नॅथन अँडरसन यांनी कंपनी बंद करण्यामागील कोणतेही विशिष्ट कारण सांगितलेले नाही. त्यांनी सांगितले की, कंपनी बंद करण्याचा निर्णय खूप चर्चा आणि विचारमंथनानंतर घेण्यात आला.

संस्थापक नॅथन अँडरसन यांनी सांगितले की, गेल्या वर्षाच्या अखेरीस, मी माझ्या कुटुंबाला, मित्रांना आणि आमच्या टीमला सांगितले होते की मी हिंडेनबर्ग रिसर्च बंद करण्याचा निर्णय घेत आहे. आम्ही आखलेल्या कल्पना पूर्ण केल्यानंतर आज तो दिवस आला आहे. जेव्हा मी कंपनी सुरू केली तेव्हा मला शंका होती की मी हे करू शकेन की नाही. कारण मला कोणताही अनुभव नव्हता. या क्षेत्रात माझे कोणीही नातेवाईक नाहीत. मी सरकारी शाळेत शिकलो आहे. मी हुशार पण नव्हतो. मला कोणते योग्य कपडे घालायचे हे देखील माहीत नव्हते. मी गोल्फ खेळू शकत नाही, किंवा मी ४ तासांच्या झोपेवर दिवसभर काम करू शकणारा अतिमानव नाही, असे सांगत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**‘...त्यावेळी माझ्याकडे एकमेव पर्याय होता’**

मी नोकरी करत असताना एक चांगला कर्मचारी होतो, परंतु त्यापैकी बहुतेक नोकऱ्यांमध्ये माझ्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. जेव्हा मी हे काम सुरू केले तेव्हा माझ्याकडे पैसे नव्हते. कंपनीचे काम सुरू असताना माझ्यावर ३ वेळा खटला भरण्यात आला. त्यावेळी माझ्याकडे असलेले सर्व पैसेही संपले. जर मला जागतिक दर्जाचे व्हिसलब्लोअर वकील ब्रायन वूड यांचा पाठिंबा मिळाला नसता, त्यांनी माझ्याकडे आर्थिक संसाधनांचा अभाव असूनही केस चालवली नसती, तर मी सुरुवातीच्या टप्प्यातच अपयशी ठरलो असतो. माझे एक नवजात बाळ होते आणि त्यावेळी मला घराबाहेर काढण्याचा सामना करावा लागला होता. मी घाबरलो होतो, पण जर मी शांत राहिलो तर मी तुटून पडेन हे मला माहित होते. माझ्याकडे एकमेव पर्याय होता तो म्हणजे पुढे जात राहणे.

**‘आम्ही आमच्या कामाने काही साम्राज्यांना हादरवून टाकले’**

आपण सर्वांनी अचूकतेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि पुराव्याच्या आधारे आपले शब्द ठरवण्यासाठी खूप मेहनत घेतली. कधीकधी याचा अर्थ असा होतो की मोठे यश मिळवावे लागते आणि आपल्यापैकी कोणापेक्षाही मोठ्या लढाया लढाव्या लागतात. फसवणूक, भ्रष्टाचार आणि नकारात्मकता अनेकदा जबरदस्त वाटते.

### भारतासोबतचा पंगा महागात पडला

## ट्रुडोंची राजकारणातून निवृत्ती

**वृत्तसंस्था**
**ओटावा**

खलिस्तानी समर्थक हरदीप सिंह निज्जर याच्या हत्येप्रकरणी भारतावर कॅनडाच्या जस्टिन ट्रुडो यांनी गंभीर आरोप केले होते. या प्रकरणावरुन दोन्ही देशातील संबंध बिघडले होते. दरम्यान, आता भारताविरोधात आरोप करणे जस्टिन ट्रुडो यांना महागात पडल्याचे दिसत आहे. पक्षाने नेता निवडल्यानंतर पंतप्रधान ट्रुडो यांनी अलीकडेच कॅनडाचे पंतप्रधानपद सोडण्याची घोषणा केली होती. आता त्यांनी राजकारणातून निवृत्तीची घोषणा केली आहे.

ट्रुडो म्हणाले की, ते कॅनडातील आगामी सार्वत्रिक निवडणुका लढवणार नाहीत आणि राजकारणही सोडू शकतात, हा निःसंशयपणे ट्रुडोंच्या आतापर्यंतच्या राजकीय




कारकिर्दीतील सर्वात मोठा निर्णय आहे. “पंतप्रधान ट्रुडो येत्या निवडणुकीत उभे राहणार नाहीत,” असा दावा कॅनडाच्या ग्लोबल न्यूजने केला. ट्रुडो म्हणाले, “मला माहित नाही की मी पुढे काय करेन, खरे सांगायचे तर, माझ्याकडे त्याबद्दल विचार करण्यासाठी जास्त वेळ नाही, मी ते काम करण्यावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले आहे.” “मी एका असाधारण महत्त्वाच्या वेळी कॅनेडियन लोकांनी मला जे करण्यासाठी निवडले आहे ते मी करत आहे, असंही ते म्हणाले.

## मला प्रत्येक देशात माझं मूल हवंय...

### आधीच 87 मुलं असणाऱ्या ‘स्पर्म डोनर’ची अनोखी इच्छा

**वृत्तसंस्था**
**लॉस एंजेलिस**

जगातील सर्वात प्रसिद्ध स्पर्म डोनर म्हणून ओळखला जाणारा काइल गोर्डी वर्षाच्या अखेरीस जगभरात 100 मुलांचा बाप होण्याच्या मार्गावर आहे. आतापर्यंत, लॉस एंजेलिसमध्ये राहणाऱ्या काइलने गर्भधारणेसाठी संघर्ष करणाऱ्या महिलांना मोफत सेवा दिली आहे ज्यामुळे आतापर्यंत 87 मुले झाली आहेत. न्यू यॉर्क पोस्टनुसार, काइल प्रेग्नंट नाऊ या वेबसाइटच्या आधारे मोफत सेवा देतो. नुकतंच त्याला आपण वर्षाच्या अखेरपर्यंत 100 मुलांचा आकडा ओलांडणार असल्याचं समजलं आहे. यानंतर हा टप्पा गाठणाऱ्या चार लोकांच्या एका विशेष गटात तो सामील होणार आहे. स्वीडन, नॉर्वे, इंग्लंड आणि स्कॉटलंडमध्ये 14 प्रलंबित गर्भधारणेसह, काइलने दावा केला आहे



की, गरजूंना मदत करण्याच्या त्याच्या मोहिमेची सुरुवात करत आहे.

स्वयंघोषित 'स्पर्म डोनेशन सीईओ' काइलने आपण अनेक महिला ज्यांना कुटुंब सुरु करण्याचा निर्णय घेतला त्यांना मदत केल्याचा अभिमान असल्याचं म्हटलं आहे. त्याला आता टेलिग्राम फाऊंडर पॅवेल दुरोव ज्याची 100 जैविक मुलं आहेत त्याचा रेकॉर्ड मोडायचा आहे.

काइल गोर्डी याने कोणताही ठराविक क्रमांक ठरवलेला नाही, पण जोपर्यंत आपल्या सेवेची गरज आहे तोपर्यंत देत राहणार असल्याचं म्हटलं आहे. "आता हे सर्व अशक्य आहे असं वाटणाऱ्या या सर्व महिलांना कुटुंब सुरु करण्यासाठी मदत केली याचा मला आनंद आहे," असं तो म्हणाला आहे.

दरम्यान आता थोड्या काळासाठी विश्रांती घेतल्यानंतर गोर्डीला आता 2025 मध्ये जागतिक पातळीवर पोहोचायचं आहे. जपान, आयर्लंड, कोरियासारख्या देशांमध्ये त्याला जायचं आहे. "मी अद्याप त्या देशांमध्ये डोनेशनसाठी पोहोचू शकलो नाही. कोणाला माहिती? 2026 पर्यंत प्रत्येक देशात माझं एक मूल असू शकतं," असं तो पुढे म्हणाला.

इतक्या मुलांचा बाप असतानाही आपण खरं प्रेम मिळवण्यासाठी संघर्ष करत असल्याचं म्हटलं आहे. यश मिळत नसल्यानेच आपण स्पर्म डोनेशनकडे वळल्याचं त्याने सांगितलं आहे. "मला काही महिलांनी संभाव्य नातेसंबंधात रस दाखवला असला तरी, पुढे काहीच होत नाही," असं दुःख त्याने व्यक्त केलं. सध्या सुरु असलेल्या स्पर्म डोनेशन प्रक्रियेदरम्यान एखादं अर्थपूर्ण नातं निर्माण होईल अशा अशा त्याला आहे. "मला आयर्लंडची पत्नी असली तरी हरकत नाही. माझ्या एका मुलाची आई डब्लिनची आहे आणि ते आयर्लंडला खूप भेट देतात. म्हणून किमान मला माहित आहे की माझे काही कुटुंब तिथे आधीच आहे," असं तो म्हणाला.

## पान 1 वरुन...

### केंद्राची 8 व्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी

हे अंदाजे 4.8 लाख रुपयांपर्यंत वाढू शकते. जर 8वा वेतन आयोग जानेवारी 2026 मध्ये लागू झाला, तर केंद्रीय कर्मचाऱ्यांचे किमान वेतन 34,560 रुपये असेल असा अंदाज आहे. जर आपण वर्ष 2004 जोडले तर, 25 वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांची पहिली तुकडी 2029 मध्ये निवृत्त होईल. आता समजा 8वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर, लेव्हल-1 कर्मचाऱ्याचा मूळ पगार 34,560 रुपये झाला, तर त्याच्या रकमेच्या 50% रक्कम 17,280 रुपये आहे. यानुसार, कर्मचाऱ्याला पेन्शन म्हणून 17,280 रुपये + DR रक्कम मिळेल. तथापि, केवळ क्वचित प्रसंगीच एखादा कर्मचारी, लेव्हल-1 वर नोकरीत रुजू झाल्यानंतर, सेवानिवृत्तीपर्यंत त्याच स्तरावर राहील. पदोन्नती आणि इतर नियमांनुसार ही पातळी वेळोवेळी वाढत राहते. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पेन्शन म्हणून जास्त रक्कम मिळेल. त्याचबरोबर लेव्हल-18 कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन 4.80 लाख रुपये असेल. या एकूण 2.40 लाख रुपयांच्या 50% रक्कम + DR पेन्शन म्हणून दिली जाईल. एप्रिल 2025 पासून 8 वा वेतन आयोग लागू होण्याची फारशी आशा नाही, कारण आतापर्यंत सरकारने यावर कोणताही मोठा निर्णय घेतलेला नाही. अशा परिस्थितीत 1 जानेवारी 2026 पासून ते लागू होण्याची शक्यता आहे. 8 वा वेतन आयोग लागू झाल्यावर, विशेष फिटमेंट फॅक्टरच्या आधारे सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात सुधारणा केली जाईल. समजा, सध्याच्या 7व्या वेतन आयोगाअंतर्गत वेतन सुधारणेसाठी 2.57 चा फिटमेंट फॅक्टर लागू केला गेला आहे. काही मीडिया रिपोर्ट्सच्या आधारे, सरकार 8 व्या वेतन आयोगाच्या अंतर्गत 1.92 च्या घटकाशी तडजोड करू शकते. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, सरकार किमान 2.86 च्या उच्च फिटमेंट फॅक्टरची निवड करेल.

### रस्त्याचं खराब बांधकाम करणं हा अजामिनपात्र गुन्हा ठरवा

वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचं लक्ष्य आहे. मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार 2023 मध्ये देशात पाच लाख रस्ते अपघात झाले. त्यामध्ये 1 लाख 72 हजार लोकांचा मृत्यू झाला. यामधील ६६.४ टक्के लोक हे म्हणजेच 1 लाख 14 हजार लोक हे 18 ते 45 वर्षांचे होते. तर 10 हजार मुले होती. नितीन गडकरी यांनी सांगितले की, 55 हजार लोकांचा मृत्यू हा हेल्मेट न घातल्यामुळे आणि 30 हजार लोकांचा मृत्यू हा सीट बेल्ट न लावल्यामुळे झाला. महामार्ग मंत्रालयाकडून महामार्गांवरील ब्लॅक स्पॉट दुरुस्त करण्यासाठी 40 हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत, अशी माहितीही नितीन गडकरी यांनी दिली.

### नवाबावर जीवघेणा हल्ला

उद्देशाने सैफ अली खानच्या घरी प्रवेश केला. चोरी करण्याच्या प्रयत्नात ही घटना घडली असावी. आरोपी हा आप्तकालीन परिस्थितीत बाहेर पडण्याच्या मार्गाने त्याच्या घरात पोहोचला. तो जिन्यांवरुन 12 व्या मजल्यावर गेल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. सैफच्या घरातील मोलकरणीने जेव्हा चोराला पाहिलं, तेव्हा तिने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. आवाज ऐकून झोपेत असलेला सैफ तिथे आला आणि त्याच क्षणी चोराने त्याच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. मध्यरात्री अडीच वाजताच्या सुमारास ही घटना घडली. सैफ अली खान हा वांद्रे पश्चिमेतील उच्चभ्रू सोसायटीत राहतो. सैफ अली खानचे घर १२ व्या मजल्यावर आहे. त्याच्या इमारतीत प्रवेश करण्यापूर्वी सुरक्षा तपासणी केली जाते. यात एखाद्या घरात जाण्यापूर्वी तुम्हाला मालकाची परवानगीही घ्यावी लागते. तसेच तुमच्या नावाची नोंदणीही केली जाते. या इमारतीत इतकी काटेकोर सुरक्षा आणि सीसीटिव्हीची पाळत असतानाही हा हल्ला कसा घडला, असा प्रश्न उपस्थितीत केला जात आहे. तसेच हा हल्लेखोर जेव्हा इमारतीत शिरला तेव्हा आणि इमारतीतून बाहेर आला, त्यावेळी त्याला कोणीही पाहिले कसं नाही, तो पळून जाण्यात यशस्वी कसा झाला, असे प्रश्नही उपस्थित होत आहे. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी सैफ अली खानच्या घरातील कर्मचाऱ्यांचीही चौकशी सुरु केली आहे. सैफच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीला पोलीस ठाण्यात आणून तिची चौकशी केली जात आहे. जेव्हा अज्ञात व्यक्ती घरात शिरली, तेव्हा मोलकरणीने सर्वांत आधी त्याला पाहिलं होतं आणि आरडाओरडा केला होता. त्यांचा आवाज ऐकल्यानंतर सैफ तिथे आला. त्यानंतर दोघांमध्ये हाणामारी झाली. यावेळी मोलकरणीच्या हातालाही दुखापत झाली. इमारतीच्या मुख्य गेटजवळील सीसीटीव्हीमध्ये कोणीही येताना किंवा जाताना दिसलं नाही. ही घटना घडली तेव्हा सैफ, करीना आणि त्यांची दोन्ही मुलं घरातच होती. सैफवर लिलावती रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती आता स्थिर आहे. त्याच्या शरीरावर एकूण सहा वार झाले असून त्यातील दोन वार खोलवर असल्याचं कळतंय. सैफवरील शस्त्रक्रिया पूर्ण झाली असून त्याला गुरुवारी रात्रीपर्यंत डिस्चार्ज मिळण्याची शक्यता आहे. सैफच्या कुटुंबातील सर्व सदस्य सुरक्षित असून पोलीस घटनेचा तपास करत असल्याची माहिती, सैफच्या टीमकडून देण्यात आली.

## महाराष्ट्र देशाची स्टार्टअप राजधानी 1 लाख 57 हजार स्टार्टअप

**पान 1 वरुन..**

महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित ‘राष्ट्रीय स्टार्टअप दिवस’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. ऐ आय (AI) तंत्रज्ञानाच्या यावेळी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन मुख्यमंत्री यांनी केले.यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, विविध क्षेत्रांतील 1000 स्टार्टअप या कार्यक्रमात उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, नवउद्योजक आणि महिला उद्योजकांच्या नवकल्पना सक्षम करून महाराष्ट्राची उन्नती करण्यात येणार आहे. देशात स्टार्टअप सुरू झाले तेव्हा 471 स्टार्ट अप होते आज देशात एक लाख 57 हजार आहेत. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त मला अभिमानाने सांगावेसे वाटते की महाराष्ट्र केवळ भारताच्या स्टार्टअप क्रांतीत सहभागी नाही तर त्याचे नेतृत्व करत आहे. राज्यात 26 000 स्टार्ट अप आहेत. आपण असे अभियान राबवित आहोत की ज्यामध्ये महिला स्टार्टअप मध्ये सर्व पदांवर असतील. देशात जास्त महिला डायरेक्टर असलेले महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे. स्टार्टअपमध्ये महाराष्ट्र पहिल्या सात राज्यात आहे असेही फडणवीस म्हणाले.

## ‘आयआयएम संबलपूर’चा ड्युअल डिग्री पर्यायासह बिझनेस ॲनॅलिटिक्समध्ये एमबीए अभ्यासक्रम

**नवी दिल्ली**

नावीन्य, सर्वसमावेशकता, तसेच सचोटीसाठी ओळखल्या जाणाऱ्या प्रमुख व्यवस्थापन संस्थांपैकी एक आयआयएम संबलपूरने त्याच्या दिल्ली कॅम्पसमध्ये बिझनेस ॲनालिटिक्समधील पहिला पूर्ण-वेळ एमबीए अभ्यासक्रम सादर केला आहे.

उच्च CAT टक्केवारी असलेले, STEM शैक्षणिक पार्श्वभूमी असलेले उमेदवार हे वर्षभराच्या संबंधित अनुभवासह प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करू शकतात. या संस्थेने थायलंड येथील एशियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (AIT), यांच्याशी एक सामंजस्य करारही केला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर आधारित, आंतरविद्याशाखीय शिक्षण देणे सोयीचे ठरणार आहे.

एशियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीचा (एआयटी) मास्टर्स इन बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (एमबीए) प्रोग्राम थायलंडमधील एमबीए प्रोग्राममध्ये सातत्याने सर्वोच्च स्थानावर आहे. 2024 मध्ये हा कार्यक्रम आशियामध्ये #23 क्रमांकावर होता आणि QS ग्लोबल एमबीए रँकिंगद्वारे जागतिक स्तरावर टॉप 200 मध्ये होता. आयआयएम संबलपूरचे संचालक प्रा.महादेव जैस्वाल म्हणाले, "बिझनेस ॲनालिटिक्समध्ये एमबीएचा शुभारंभ हा आयआयएम संबलपूरच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.प्रो. जैस्वाल पुढे म्हणाले, " IIM संबलपूरने आधीच अशा प्रकारे दोन दुहेरी पदव्या ऑफर केल्या आहेत: सोर्बोन बिझनेस स्कूल (पॅरिस)च्या सहकार्याने फिनटेक मॅनेजमेंटमध्ये एमबीए आणि बोर्डो युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ मॅनेजमेंट यांच्या सहकार्याने कार्यकारी पीएच.डी आणि डीबीए प्रोग्रामची व्यवस्था केली आहे.

## ‘अलमट्टी’ची उंची वाढवण्याच्या निर्णयाला स्थगिती द्या!

### राजू शेट्टींची केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाकडे मागणी

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

केंद्र सरकार व केंद्रीय जल आयोगाने कर्नाटक राज्य सरकारच्या अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याच्या निर्णयाबाबत कठोर भुमिका घेऊन सदर निर्णयास स्थगिती देण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील व केंद्रीय जल आयोगाचे अध्यक्ष डॉ. मुकेश कुमार सिन्हा यांचेकडे केली.

केंद्रीय जल आयोगाचे अध्यक्ष डॉ. मुकेश कुमार सिन्हा म्हणाले की, कर्नाटक राज्य सरकारकडून अशा प्रकारचा अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याचा





कोणताही प्रस्ताव अद्याप आला नाही. तसा प्रस्ताव आल्यास याबाबतचा सखोल अभ्यास करून कर्नाटक व महाराष्ट्र राज्य सरकार यांच्याशी व विविध तज्ञांशी बोलून स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून पुरामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची दक्षता जल आयोगाकडून घेतली जाईल. कर्नाटक राज्य सरकार अलमट्टी धरणाची उंची 524.256 मीटरपर्यंत वाढविण्याचे नियोजन करत आहे. या निर्णयामुळे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा, वारणा, दुधगंगा व पंचगंगा नदीकाठच्या गावांना मोठा फटका बसणार आहे. सांगली, कोल्हापूर व कर्नाटक सीमाभागातील बेळगांव व बागलकोट जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्रात असणारी जमीन पुराच्या पाण्याखाली जाणार असून नागरी वस्तीलाही याचा फटका बसणार आहे.

## ब्लू ओरिजिनच्या ‘न्यू ग्लेन रॉकेट’चे यशस्वी प्रक्षेपण

**न्यूयॉर्क**

ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉनचे संस्थापक अब्जाधीश जेफ बेझोस यांची स्पेस कंपनी ब्लू ओरिजिनने गुरुवारी न्यू ग्लेन रॉकेटची यशस्वी चाचणी घेतली. अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यातून स्थानिक वेळेनुसार पहाटे दोन वाजता रॉकेटचे प्रक्षेपण करण्यात आले. रॉकेटने पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवले आहे. यापूर्वी त्याचे प्रक्षेपण पुढे ढकलण्यात आले होते.

रॉकेटचा वापर करून एक प्रोटोटाइप उपग्रह कक्षेत ठेवण्यात आला. प्रक्षेपणानंतर अवघ्या 13 मिनिटांत याने आपले मिशन पूर्ण केले. या प्रचंड रॉकेटची लांबी 98 मीटर आहे. अंतराळवीरांना चंद्रावर नेण्यासाठी त्याची रचना करण्यात आली आहे.

## अमेरिकेने 3 भारतीय आण्विक संस्थांवरील बंदी उठवली

### बंदी 20 वर्षे लागू होती

**वृत्तसंस्था**
**वॉशिंग्टन**

अमेरिकेने बुधवारी तीन भारतीय आण्विक संघटनांवरील 20 वर्षांची बंदी उठवली. यामध्ये भाभा अणुसंशोधन केंद्र (BARC), इंदिरा गांधी सेंटर फॉर ॲटोमिक रिसर्च (IGCAR) आणि इंडियन रेअर अर्थ (IRE) यांच्या नावांचा समावेश आहे. त्याचबरोबर अमेरिकेने राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भात 11 चिनी संस्थांना प्रतिबंध यादीत समाविष्ट केले आहे. युनायटेड स्टेट्स ब्युरो ऑफ इंडस्ट्री अँड सिक्युरिटी (BIS) ने याची पुष्टी केली आहे.

अमेरिकन NSA जेक सुलिव्हन यांच्या 6 जानेवारीला भारत दौऱ्यानंतर अमेरिकेने हा निर्णय घेतला आहे. सुलिव्हन यांनी दिल्ली आयआयटीमध्ये सांगितले होते की, भारतीय



अणुसंस्था आणि अमेरिकन कंपन्यांमधील सहकार्याला बाधा आणणारे नियम अमेरिका हटवेल.

ते म्हणाले होते की, सुमारे 20 वर्षांपूर्वी माजी राष्ट्राध्यक्ष बुश आणि भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी अणु कराराच्या दूरदर्शी कल्पनेची पायाभरणी केली होती, जी आता आपल्याला पूर्णतः प्रत्यक्षात आणायची आहे. वास्तविक, भारताने 11-13 मे 1998 रोजी राजस्थानमधील पोखरण येथे अणुचाचणी केली होती. ही चाचणी ऑपरेशन शक्ती म्हणून ओळखली जात होती. या चाचण्यांमुळे अनेक देशांनी भारतावर आर्थिक निर्बंध लादले होते. त्यानंतर अमेरिकेने 200 हून अधिक भारतीय संस्थांवर निर्बंध लादले. US NSA जॅक सुलिवन यांनी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांची दिल्लीत भेट घेतली. मनमोहन सरकारच्या काळात ऐतिहासिक करार झाला मनमोहन सिंग यांनी जुलै 2005 मध्ये अमेरिकेला भेट दिली होती. यावेळी त्यांनी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांना आण्विक करारासाठी सहमती दिली. मात्र, यासाठी अमेरिकेने भारताकडून दोन अटी ठेवल्या होत्या.

पहिला- भारत आपल्या लष्करी आणि नागरी आण्विक क्रिया वेगळे ठेवेल. दुसरे- आण्विक तंत्रज्ञान आणि साहित्य दिल्यानंतर भारताच्या अणु केंद्रांवर आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी (IAEA) द्वारे देखरेख केली जाईल.